विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची
संशोधन पत्रिका

# अर्थमीमांसा

भारतीय सौर शके १९३७

(जानेवारी-जून २०१६/ खंड ९, अंक १)

❑ प्रमुख संपादक ❑

दि.व्यं.जहागिरदार

❑ सल्लागार मंडळ ❑

श्रीनिवास खांदेवाले
प्रमोद लाखे
प्रशांत हरमकर
जनार्दन काकडे

❑ संपादकीय पत्रव्यवहार ❑

दि. व्यं. जहागिरदार
''व्यंकटेश'', १२, गुलमोहर कॉलनी,
कॅम्प, अमरावती - ४४४ ६०२
दूरध्वनी (०७२१)-२६६१८५१

## अनुक्रमणिका

- Perspective on Feminism
  - S.L. Pedgaonkar.................... १
- महाराष्ट्राच्या मानव विकासावर परिणाम करणाऱ्या निवडक निर्धारकांचे विश्लेषण
  - समीत माहोरे, धीरज कदम........... १३
- नोबेल लॉरेट जॉन नॅश-गोष्ट एका शापित गंधर्वाची
  - दि.व्यं.जहागिरदार ................. २४
- स्त्री सक्षमीकरणाचे स्वरूप व अर्थव्यवस्थेतील भूमिका
  - वर्षा गंगणे ............................ २८

### -केळकर समितीचा अहवाल(२०१३)-

- केळकर समिती अहवाल : प्रादेशिक विकासाचा मार्गदर्शक दस्तऐवज
  - विनायक श्रीधर देशपांडे.............. ३४
- विदर्भाच्या विकासासाठी केळकर समितीने केलेल्या शिफारशी
  - किशोर एम. गोमेकर................ ४४
- केळकर समितीचा अहवाल - प्रादेशिक विकासाची व्यूहनीती
  - वैशाली देशमुख...................... ५१
- Comparative Appraisal of the Report on High Level Committee on Balanced Regional Development Issues in Mah.
  - Manjusha Musmade ...............६०
- महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकास प्रश्नावरील उच्चस्तरीय समितीच्या प्रमुख निष्कर्ष व शिफारशींचा मागोवा.
  - विजय रमाकांत रोटे ...............६९
- महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमता व उपाय - विदर्भ राज्य व केळकर समितीच्या विशेष संदर्भात
  - श्रीनिवास खांदेवाले ..................७६
- औद्योगिकरणाच्या संदर्भात केळकर समितीच्या शिफारशी
  - जे.व्ही.गायकवाड ...................८३

### ग्रंथ परिचय

- 'महामंदी समजून घेतांना'
  - राजश्री रायभोग .....................९०

# विदर्भ अर्थशास्त्र परिषद कार्यकारिणी
## (२०१५-१६)


- कार्याध्यक्ष
  डॉ.सौ. मुक्ता जहागिरदार
- अध्यक्ष
  डॉ. विनायक देशपांडे
- उपाध्यक्ष
  डॉ. सुरेश जगताप
- कोषाध्यक्ष
  डॉ. गौतम कांबळे
- सचिव
  डॉ.राजेश चव्हाण (अमरावती विभाग परिक्षेत्र)
  डॉ. गणेश मायवाडे (नागपूर विभाग परिक्षेत्र)
- प्रमुख संपादक - 'अर्थमीमांसा'
  डॉ. दि.व्यं. जहागिरदार
- जिल्हानिहाय प्रतिनिधी :
  डॉ. प्राची देशपांडे (नागपूर शहर)
  डॉ. संगीता कालमोरे (नागपूर ग्रामीण)
  डॉ. पी.बी.तिरले (चंद्रपूर)
  प्रा. आर.बी.महेशकर (गडचिरोली )
  डॉ. वर्षा गंगणे (गोंदिया)
  प्रा. एस.बी.भुरे (भंडारा)
  प्रा. एस.बी.बोंडे (वर्धा)
  प्रा. राजश्री रायभोग (अमरावती )
  डॉ. प्रभाकर आठवले (अकोला )
  प्रा. दिलीप महाजन (बुलढाणा)
  डॉ. उषा पाटील (यवतमाळ)


आजीव सदस्यता शुल्क : रू. १000/- आहे. ही रक्कम सचिव डॉ. राजेश चव्हाण, प्रभारी प्राचार्य, कढी महाविद्यालय, परतवाडा यांचेकडे ''विदर्भ अर्थशास्त्र परिषद'' या नावाने ड्राफ्टने पाठवावी.

**ICSSR** च्या पश्चिम विभागीय केंद्रातर्फे ''अर्थमीमांसा'' या संशोधनपर पत्रिकेस अनुदान प्राप्त झाले आहे.


- अक्षर जुळवणी व मुद्रक :
  कॉम्प्यूटर-नेटवर्क (नरेंद्र पांढरीकर)
  अमरावती. मो. ९८५०२८३२४६
  email : narendrapandharikar@gmail.com


**: स्वागत मूल्य :**

१) परिषद सदस्य - १00 रू.
२) शैक्षणिक संस्था - १५0 रू.

# संपादकीय .....

'अर्थमीमांसा' खंड ९, अंक १ आपल्यापुढे सादर करतांना मला आनंद होत आहे. विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे माजी कार्याध्यक्ष व अध्यक्ष आणि वर्तमान कार्याध्यक्ष, अध्यक्ष, सचिव आणि कार्यकारिणीचे सदस्य व आजीवन सदस्यांच्या पाठिंब्यामुळे आणि सद्भावनांमुळे हा अंक सिद्ध होऊ शकला याची मला पूर्णत: जाणीव आहे. हा अंक यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस या गवातील बी.बी. आर्ट्स, एन.बी. कॉमर्स आणि बी.पी. सायन्स कॉलेज येथे होत असलेल्या परिषदेच्या ४० व्या वार्षिक अधिवेशनात विमोचित होत आहे ही घटना आपल्या सर्वांना आनंददायी वाटावी अशीच आहे. परिषदेतर्फे यापूर्वी प्रसिद्ध झालेल्या अर्थमीमांसा या संशोधनपर पत्रिकेप्रमाणेच ही संशोधनपर पत्रिका देखील आपल्या पसंतीस उतरेल असा माझा विश्वास आहे.

गेल्या काही वर्षांपासून स्त्री पुरूष समानतावादी चळवळीचा विकास तसेच विश्लेषणाचे अध्ययन मोठ्या प्रमाणावर केले जात आहे. या संदर्भात डॉ.पेडगावकरांचा 'Perspective on Feminism' या अंकात समाविष्ट केला आहे. डॉ.समीत माहोरे आणि धीरज कदम यांनी संयुक्तपणे लिहलेल्या 'महाराष्ट्राच्या मानव विकासावर परिणाम करणाऱ्या निवडक निर्धारकांचे विश्लेषण' या लेखात महाराष्ट्रातील ३५ जिल्ह्यातील मानव विकासावर विचाराधीन चलांचा प्रभाव आहे का हे प्रतिमानाद्वारे तपासण्याचा प्रयत्न केला आहे. गेल्या वर्षी प्रसिद्ध गणितज्ञ व अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक प्राप्त जॉन नॅश यांचा मृत्यू झाला. त्यांना श्रद्धांजली वाहणारा दि.व्यं.जहागिरदार यांचा 'नोबेल लॉरेट जॉन नॅश-गोष्ट एका शापित गंधर्वाची' हा लेख आहे. वर्षा गंगणे यांचा 'स्त्री सक्षमीकरणाचे स्वरूप व अर्थव्यवस्थेतील भूमिका' हा लेख सदर अंकात प्रसिद्ध केला असून तो पहिल्या लेखाला पूरक आहे.

महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या केळकर समितीचा अहवाल सर्वसामान्य नागरिकांसाठी २०१४ मध्ये उपलब्ध झाला. या अहवालाबाबत आपणास असणारे कुतूहल लक्षात घेता या अहवालावर सात लेख या अंकात प्रसिद्ध केले आहे. केळकर समितीचे सदस्य डॉ.विनायक देशपांडे यांनी आपल्या 'केळकर समिती अहवाल : प्रादेशिक विकासाचा मार्गदर्शक दस्तऐवज' या लेखात हा अहवाल मागास प्रदेशांना विकासाचा मार्ग दाखविणारा असल्याचे मत व्यक्त केले आहे. किशोर गोमेकर यांनी विदर्भाच्या विकासासाठी केळकर समितीने ज्या शिफारशी केल्या आहेत त्यांचा चिकित्सक मागोवा घेतला आहे. डॉ. वैशाली देशमुख यांनी केळकर समितीच्या अहवालात सुचविलेल्या प्रादेशिक विकासाची व्यूहनीती मराठवाडा, खान्देश व विदर्भाचे संदर्भात आपल्या 'केळकर समितीचा अहवाल-प्रादेशिक विकासाची व्यूहनीती' या लेखात विषद केली आहे. डॉ.मंजूषा मुसमाडे यांनी आपल्या Comparative Appraisal of the

Report on High Level Committee on Balanced Regional Development Issues in Maharashtra या लेखात अहवालामधील निष्कर्ष तसेच शिफारशी स्पष्ट करतांना अहवालातील काही मर्यादा स्पष्ट केल्या आहेत. प्रा. रमाकांत रोटे यांनी केळकर समिती बाबत समितीने स्वीकारलेल्या विकासाची व्यूहरचना थोडक्यात सांगून समितीने केलेल्या शिफारशींचा आढावा घेतला आहे. डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांनी महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमतेबाबत विवेचन करतांना विकासाच्या गृहितकांचे चांगल्या प्रकारे विश्लेषण केले आहे. केळकर समितीच्या शिफारशी द्वारा प्रादेशिक समानता निर्माण होईल असे चित्र समोर येत असले तरी तसे होण्याची शक्यता नाही असे त्यांनी लेखात म्हटले आहे. डॉ.जे.व्ही.गायकवाड यांनी महाराष्ट्रातील औद्योगिक असमतोल स्पष्ट करून विदर्भ व मराठवाड्यातील औद्योगिक विकासासाठीच्या धोरणावर प्रकाश टाकला आहे.

अतुल कहाते यांच्या 'महामंदी समजून घेतांना' या पुस्तकाचा परिचय प्रा.राजश्री रायभोग यांनी करून दिला आहे.

अर्थमीमांसेचा दोन अंक वर्षाभरातून प्रसिद्ध होणार आहेत. लेखकांनी त्यासाठी वर्षभर आपले लेख पाठवावेत. मात्र हे लेख काळजीपूर्वक तपासून घ्यावेत व संदर्भग्रंथांचा उल्लेख योग्य पद्धतीने करावा. अर्थमीमांसेला जरी ICSSR द्वारा आर्थिक सहाय्य मिळाले असले तरी पुरेशा उत्पन्नासाठी जाहिराती प्राप्त करणे आवश्यक आहे. त्यासाठी संपूर्ण वर्षासाठी सहा जाहिराती हव्यात. त्या मिळविण्यासाठी प्रयत्नांची गरज आहे. तसेच महाविद्यालयांच्या ग्रंथालयांना अर्थमीमांसेचे अंक विकता येतील. कार्यकारिणीच्या सदस्यांनी आपापल्या जिल्ह्यात या दृष्टीने प्रयत्न करावा (या बाबत संपादकाशी संपर्क साधावा). हा अंक सिद्ध करतांना सल्लागार मंडळाचे तसेच कार्याध्यक्ष, अध्यक्ष व सचिवांचे सहकार्य मिळाले. विशेषतः डॉ. प्रशांत हरमकरांची अंकाच्या सिद्धतेत मदत झाली.

या अंकातील सर्व लेखकांनी निर्धारित वेळेत लेख पाठविल्याबद्दल त्यांचे आभार. कॉम्प्यूटर नेटवर्कचे नरेंद्र पांढरीकर यांनी हाही अंक सुबकपणे वेळेत तयार करून दिला त्याबद्दल त्यांचेही आभार.

नववर्षाच्या सर्वांना शुभेच्छा !

दिनांक : २१ जानेवारी, २०१६
स्थळ : अमरावती.

**(दि.व्यं.जहागिरदार)**
प्रमुख संपादक - 'अर्थमीमांसा'

ISSN 2320-0197

# Perspective on Feminism

**S.L. Pedgaonkar**
Pune.

Feminism as a theoretical framework of women's movements, has exposed and challenged the traditional thinking of women's role in society and family. The term feminism usually refers to its most general sense to political activities by women and feminist theories like other political philosophers provide intellectual tools by which historical agents can examine the injustices to control and build argument to support their particular demands for change. Feminist theories apply their tools to building knowledge of women's oppression and based on that knowledge to developing strategies for resisting subordination and improving women's lives.(McCann and kim 2010 introduction P1).

Feminist scholars have divided the feminist movement into three waves. The first wave movement refers mainly to women's suffrage movement in the nineteenth and twentieth century, the second wave refers to women's liberalization movement beginning in 1960's and third wave refers to the movement renamed in the 1990's.

The second wave is characterized by different ideologies like liberalism and Marxism, while the third wave encompasses the psychoanalytic frame work and the post modernist revolutions. The ideological stands determine the content of argument and direction of reforms/remedies sought. In this paper an attempt is made to discuss mainly the Marxists and post modernists versions of feminism.. An attempt is also made to see the impact of these ideologies on the society on the course of the movement.

**Liberal Feminism :**

Liberal Feminism asserts the equality of men and women through political and legal reforms. Liberal theory gives importance to individual freedom and action. Liberal feminism is extension of liberal philosophy to the cause of sexual inequality and the associated problems of women's subjugation. Democracy is the means to solve.

Liberal feminism believes that "female subordination is rooted in a set of customary and legal constraint that blocks women's entrance in the so called public world". They strive for sexual equality via down to earth political and legal reforms' (Tong Rosemarie (1989).

Agenda of liberal feminism consists of reproductive and abortion rights, education, and healthcare sexual and domestic violence. Most of these problems can be voiced and solved, it is believed through political participation of women and hence the movement concentrate on voting rights of female folk. The agenda also includes equal pay for equal work.

Liberal feminism is associated with the names of eminent scholars and liberal thinkers like Mary WollstonecCraft( 1759 -1797) J.S. Mill (1806-1873) Martha Nussbaum (1946- ).

Mary Wollstonecraft in her celebrated work"'. A vindication of the rights of woman" argued that we cannot defend being in favour of rights of men without taking a similar interest in the rights of women ( Sen ( 2009p116 )

The liberal feminism is criticized on the ground that unless the social structure is changed the institutional changes like women's suffrage, are insufficient to emancipate women, other points of criticism include their concentration on middle class white women. In spite of all these criticism it should be acknowledge that feminism has benefitted from Human Rights Movement that s integral part of liberal thought Marxist feminism.

In the 1970 and 1980 most feminist theory was addressed to a single basic question how can we account for women's sub ordination. It was natural to look at Marxism for answer to this question as exploitation is the major occupation of Marxist thought. Marxism did not provide direct answer to this question of women's suffering but was to be developed and expanded to include focus on gender question. Throughout 1970's and 1980's feminist sought in a variety of ways to expand and modify or reformulate Marxian ideas giving rise to number of debates often referred to as patriarchy debates (Stevi Jackson 1995 p.1 3)

Marxist feminist recognized male domination as a systematic feature of modern society. Many of these thinkers argued that rather than being rooted, like class in relation of production, women's subordination was either a consequence of specific relations of reproduction or was primarily ideological.

Some of these theories related to women's labour as cause of exploitation while others preferred to blame capitalist system for women's subordinate position. It was realized that mere forces of production or economic base could not

explain this new form of exploitation and it was therefore necessary to hold both capitalist and patriarchal forces responsible for women's subordination Marxists tried to concentrate on women's work, domestic, as well as outside, to find the causes of low wages even zero wages for the domestic work.

The capitalist wage system or exploitation of labour in production was linked to female domestic work. Capitalists, it was argued could increase their surplus by benefitting from unpaid domestic labour, as this was taken into consideration in fixing subsistence wages of the bread winner labour. Thus, the surplus created from domestic work which is essential for reproduction of labour that determines subsistence wages is appropriated by the capitalist system. Sylvia Walby(1986) has discussed the domestic labour debate that raised the issues as whether the "home work" produced surplus value' in what sense house work or its products had a value and whether that value was embodied in the labour power of house wife's husband and realized through his wage(Walby(1986) quoted by Stevi Jackson p 16)

The logic of appropriation was not convincing as it did not explain what determines the value of domestic labour. Another point of criticism is that, for most Marxists it was unthinkable that the working class men might be exploiters on in their own homes.

French feminists notably Delphy evolved another approach to female house work. According to Delphy the peculiarities of home work arise from social relations within which it is preformed. She argues that these relations are patriarchal and within families men systematically exploit and benefit from women's labour within the domestic mode of production (Delphi 1976,77, 84 quoted by Stevi Jackson p17) Thus the Marxist concept of mode of production is used intelligibly by moulding it to domestic mode of production, to show the origin of exploitation. Delphi argues that within domestic mode of production men constitute a class of exploiters while women are the exploited class.

Another explanation in Marxist mode is given by Walby who deals with both patriarchy and capitalism as roots of female exploitation. She argues " the patriarchal division of labour in the household does not completely determine the form of patriarchal relations in a patriarchy societies. Other set of patriarchal relations also have significance (Walby in Polity Readerp17). Patriarchal mode of production and capitalism interact on the "paid work" of female labour force. The control of women's access to paid work is maintained primarily by patriarchal relations in the work place and in the state as well as those in the house hold. The forms of control

include non admittance of women to many attractive jobs and restrictions of entry in certain professions and jobs relegating women to part time jobs and restrictions on their working hours in the name of safety.

The state is site of patriarchal relations which is necessary to patriarchy as a whole, the state represents patriarchal as well as capitalists unpaid domestic services for a male. She argues that state should be viewed as capitalist since it is acting to maintain the capitalist mode of production. (McIntosh quoted by Walby p.25)

Capitalism she maintains benefits from availability of women reserve army of labour.

Ken kusterer (1995) has proposed a reconstruction of Marxist theory termed as domestic mode or production theory.

According to this theory women's subjugation is rooted not in capitalism,which it long predates, but in patriarchy not in wage relation between capitalism and workers to which gender is irrelevant but in domestic relations between men and women not in work place where sexism is but one of many forms of division and discrimination but in patriarchal household where gender roles are essence of labour. (kusterer p.240)

The theory is based on the fact that most wide spread mode of production in the third world is household production of use values for consumption and accumulation.

To understand author's argument it is necessary to assume that household consumption is also production and this, the author claims is in line with Marxian concept.

The domestic or patriarchal mode of production is defined then, as that system of household labour in which household members produce use values for direct consumption or accumulation with in the household. It is an exploitative mode of production because the labour is almost wholly produced by female dependents.

Engels , In"Origin of Family Private property and the State" recognized the inferior position of women and attributed it to the institution of private property.For Engels,then women's participation in the labour force was the key to their emancipation (Heidi Hartmann in McCann-Kim(2010) p170).

Dalla-Costa uses feminist understanding of housework as real work to claim legitimacy for it under capitalism by arguing that is should be wage work women should demand wages for house work rather than allow themselves to be forced into the traditional labour force. Where doing"a double day" women would still provide housework services to capital for free as well as wage labour. (ibid 171) Marxist analysis highlights women's

oppression in capitalist societies , but it is criticized on the ground that " They given no clues about why women are subordination to men inside and outside the family and why it is not the other way around. Marxist categories like capital itself are sex blind. (ibid p173).

The term post modernism has now come to designate be wildering diverse array of cultural practices writers artist thinker and theoretical account of late modernity. It also refers to a more general sense of radical change in the way of thinking; we have inherited from European enlightenment (Patricia Waugh in Stevi Jackson p177)

The term post modernism was first used in 1950's by critic concerned to describe what they perceived in the new kinds of literary experience.

Post modernism is mainly based on the works of Foucault, Dderrda and Lyotord.

Some of the characteristics features of post modernism given below will help to understand its relation and importance in the feminist discourse

* Post modernism is a reaction to the modernist thought that claims that knowledge and truth can be sought on the basis of rationality.
* Knowledge and truth based on rationality is not universal as believed by Enlightenment- theory but is situated and conditional. It is not objective but subjective.
* Post modernists do not believe in grand narratives as bunch of general theory to look at problems in hand, such as Dialectical materialism of Marx.
* Post modernists think that all knowledge is constructed and reflects relations of power.
* Knowledge is not for universal truths but comes from deconstruction, and reconstructions based on observation and discourse through language games. The focus is on relativity and receptiveness on ideas of difference, plurality, fragmentation, non totality aesthetic self fashioning contingency and language games.

Perhaps post modernism is best thought of as a "Mood" arising out of sense of collapse of all these foundation of modern thought which seems to guarantee a reasonably stable sense of truth knowledge self and value.

Susan Hekman (1994) has explained affinity between post modernism and feminism by high lighting rationality he maintain.

Engles, in origin of family and state, 'recognise the inferior position of women. For Engels, then, Women's participation in the labour force was the key to their emancipation (Heidi Hartmann in

McCann-Kim p170)

Dulla - Costa uses feminist understanding of housework as real work to claim legitimacy for it under capitalism, by arguing that it should be wage work. Women should demand wages for housework rather than allow themselves to be forced in to the traditional labour force where doing a double day women would still provide her work services to capital for freeas well as wage labour (ibid p171) Marxist analysis highlights women's oppression in capitalist societies, but it is criticised on the ground that "They give no clues about why women are subordinated to men inside and outside the family and why it is not the other way round. Maxist categories like capital itself, are sex blind. (Hartmann, P 173)

**Post Modern Feminism :**

The term post modern feminism has now come to designate bewildering diverse array of cultural practices, writers, artists, thinkers and theoretical accounts of late modernity, It also refers to a more general sense of radical change in the way of thinking we have inherited from European Enlightenement. (Patricia Walby in SteviJackson)

The term post modernisation was first used in 1050s by Critics concerned to describe what they perceived in the new kinds of literary experience.

Post modernism is mainly based on the works of Foucault, Derrida and Lyotord.

Some of the characteristic features of post modernism given below will help to understand its relation, to and importance in the feminist discourse.

1. Post modernism is a reaction to the modernist thought that knowledge and truth can be sought on the basis of rationality,
2. Knowledge and truth on the basis of rationality is not Universal as believed by Enlightenment theory, but is situated and conditional. It is not objective but subjective
3. Post modernist do not believe in grand narrative as bunch of general theory to looks at problems in hand such as dialectical materialism of Marx.
4. Post modernists think that all knowledge is constructed and reflect relations of power.
5. Knowledge is not for universal truths but comes from destruction, 'reconstruction' based on observation and discourse through language games. The focus is on relativity and receptiveness and ideas of difference, plurality, fragmentation, non totality aesthetic self fashioning contingency and language games.

Perhaps, post modernism is best thought of as a 'mood' arising out of sense or collapse of all these foundations of

modern thought which seems to guarantee a reasonably stable sense of truth, knowledge, self and value.

Susan Hekman (1994) has explained affinity between post modernism and feminism by highlighting rationality. She maintains"feminist attack on rationality is more radical than the post modern critique. It defines causes whereas, the post moderns are only dealing with symptoms" (Polity Reade rp50)'. The fact that women are identified with the irrational and men with the rational is a system of the underlying problem that of, all dualisms of enlightenment thought are defined by the basic masculine / feminine dualism. Much of the work of the contemporary feminist has been aimed at of separating biological sex from imposed gender rules in the linguistic practice.

Enlightenment, reason and rationality have been defined in exclusively masculine terms. She mentions the term of 'man of reason'.

The association of masculine with rationality, the feminine with irrationality in the history of western thought have been discussed extensively. The exclusion of women from the political sphere is rooted in this concept of rationality. Since women are not rational they are not allowed to participate in the realm that is the highest expression of man's rationality: politics. (Public man, private woman (1981) quoted by Hartmann in Polity Reader P.55)

The duality of rationality emotion poses problems for feminist epistemology. It may be solved if man of reason includes women but then feminist identity is challenged.

The critical question in relation between feminism and post modernism would seen to be whether it is possible to preserve the emancipatory ideals of modernity which seem necessary to the very endeavour of feminist, while dispersing with the absolute experimental foundations, which have been thoroughly challenged. Feminist of post modernism remain deeply divided, most are either for or against it.

It may be clear in the following discussion that there are two divisions of post modernism a strong version and weak version. The weak version may support emancipatory ideas, strong post modernism following Nietscze, rejects any claim of knowledge which makes an explicit appeal to some grand narrative such as dialectical of the spirit, hermeneutic of meaning, the emancipation of rational or working subject or creation of wealth (Lyotard (1984) quoted by Patricia Waugh P. 182)

What makes Rorty strong in his post modernism, however, is his insistence that society can only be transformed without violence through vocabularies rather than something for scientific proof or metaphysical certainly or a structural

analysis of economic or social inequality (ibid p183)

Unlike strong post modernism the weak versions may accept that human need to invest in grand narratives through its proponents may reject mono casual varieties and insist that all knowledge is embedded or situated in particular cultures or cultural traditions.

In its communitarian aspects 'weak' post modernism is becoming increasingly attractive to feminist, as a way of dealing with impasse of strong forms.

Seyla Benjhabib (1990) represents the model of weak feminism. she (nevertheless) insists on the need to sustain a commitment to enlightenment models of rationality as a regulative principle guiding our inquiries and beliefs. She argues for the need also to continue envisage the possibility of Uptopia and, therefore progress as an inspiration for political practice. (ibid p190)

Benhabib seems to suggest that we need both a contextual sense of our perspective from the place in the world where we find ourselves but also the discipline of imagining that world from outside but with ourselves inside it, an attenuated version of view from nowhere (Waugh, P 190)

Post modernist thoughts give a powerful analysis of gender difference. the radical questioning of the gender divide can be found in the writings of Jadith Butler. In 'gender trouble' (1990), Butler points out that the gender not follow automatically from sex, then there is no reason to believe that there are inevitably only two genders. The presumption of a binary gender system implicitly retains the belief in a mimetic relation to sex, where gender mimics sex or is otherwise restricted by it. Butler (1990), quoted by Stevi Jackson (P 136)

In her later work she shows that what is called gender identity is a performative accomplishment compelled by social sanction and taboo. Its very character as performative resides the possibility of contesting its reified status. (Butler (1997) in McCann-Kim p .420)

Taking the clue from Simone de Beauvoir, that woman and by extension any gender is an historical situation rather than a natural fact. Butler examines the ways in which gender is constructed through specific corporeal acts and possibility of cultural transformation of gender through such acts.

The body is not a self identical materiality but it is historically transformed into gender. To be female is a facticity which has no meaning, but to be a woman is to have become a woman to compel the body to conform to an historical idea of'women' to include the body to become a s cultural sign to materialise itself in obedience to an historically delimited possibility and to do this as a sustained and repeated corporeal

project. Hence as a strategy of survival gender is a performance with clearly punitive consequences.

The heterosexuality based system of marriage which requires reproduction of human beings in certain generated modes.Feminist cultural anthropology and kinship studies have shown (as quoted by Butler) how cultures are governed by conventions that not only regulated and guarantee the production, exchange and consumption of material goods, but also reproduce the bond of kinship itself. which require taboos and punitive regulation or reproduction to effect that end, The incest taboo works to guarantee the challenging of sexuality into various modes of heterosexual marriage (Cf Butler ibid, p 424)

Butler explains the institutionalisation of gender through culture through act. Acts are shared experience and collective action. The act one does, the act that one performs is in a sense an act that has been going on before one arrived at the scene. Hence gender is an act which has been rehearsed much as a script survives the particular actors who make use of it, but which require individual actors in order to be actualised and reproduced as reality once again. (ibid P. 425)

Butler states that gender cannot be understood as a role, but is performative act broadly constructed which presupposes the social fiction of its own psychological inferiority become performing one's gender wrong irritates a set of punishments. Butler concludes that theory which presupposes sexual difference as necessary and invariant will clearly improve upon human discourses which conflate the universal with masculine and appropriate all of culture or masculine property (ibid 429)

Luce Irigaray is one of the theorist most passionately interested in difference. Irigaray's work can be read as positive reaction to the crisis of modernity (RosiBraidotti in Polity Reader, P.62)

Irigaray is critical to the negative way in which female sexuality is discussed in traditional literature i.e. using the masculine parameters. She tries to give new meaning to women's sexuality by replacing the nothingness by two symbols of two lips which keep women in contact with herself, although it would be impossible to distinguish exactly what "parts" are touching each other (ibid, p 386)

Irigaray describes woman's inferior position in patriarchal society in terms of use value for man, exchange value among men. She continues, "This makes her the guardian of matter whose price will be determined by "subjects" workers tradesman consumers according to their standard of their work and their need desire (ibid, p 64)

The women's movement is for

Irigary the privileged space of elaboration of new discursive practices, which enables the political evolution of feminism (ibid)

Irigaray addresses the question of relationship between equality and difference. She emphasizes difference as equality would move female to masculinity. Women's movement are essential if women are to speak of their desires and to shatter the silence about exploitation (ibid - P65)

In Donna Haraway's' Manifesto for Cyborg', we see conflation of the organic and inorganic of science with art and of fictionality with fact in a strong reconstructive post modernist, feminist version of Lyotord reading of science (Patricia Waugh, P 186)

Haraway informs that Cyborg is a cybernetic organism, a hybrid machine and organism a creature of fiction.

The Cyborg is offered a way out of dualism modernity in which women have always discovered themselves on weaker or neglected side. The Cyborg is intended to explode the delusion s of the Cartesian rational subject in search for a bedrock of knowledge located in autonomous and unitary consciousness, which thus out to be nothing more than on endless, fictional project (ibid, p.187)

The cyborg is another image of the post modern sublime of the radical alterity which seduces with utopian promise, yet presents enormous problems for feminist politics.

Yet another contribution of Haraway is her doctrine of embodied objectively that accommodates paradoxical and critical feminist science project. 'Feminist objectivity means quite simply knowledge' (Haraway in Polity Reader, 378)

Critics like Meagham Morris have argued that post modern feminism through anti essentialism negates the very basis of politics based on gender difference.

Secondary, Feminism in its post modernist form distances from material basis of life.

**Impact of Feminism :**

Feminist thought and movement have wide ranging impact on global thinking gender, acquisition of knowledge and lots of changes in the social political development thinking and profound changes in legal and state policy. The success of these changes is limited by the place of attitudinal changes that are slow.

The liberal feminism is instrumental in recognising the human rights to female. It has been recognised that man includes woman, in extending the human rights. A lot of policy changes in law, the extension of welfare schemes to women is major outcome of liberal feminism.

Marxian feminism - is instrumental in effecting changes in employment and earning of female labour. Equality of wages

and equality of opportunity of employment is the outcome of Maxist feminism. The concept of female employment has gained currency. Policy changes affecting health employment. Political participation decision making material welfare that are showing impact of Marxian feminism.

Post modernist women's movement has by far the largest impact as it is touching all spheres of knowledge and practice. Post modernism has revolutionised thinking in all spheres of knowledge and given the local dimension to each. The concept of equality is broadened to include all walks of life. There is free discussion of women's sexuality and body. The very foundations of gender like heterosexuality and patriarchy are challenged.

Post modernism is instrumental in expanding female presence in all spheres of human activity. This is brought by legislative changes and policy changes at all levels of government.

Post modernism is also responsible for focusing on the disparities of regional, racial, caste of women and hence the need for different aspect of female question. Feminism is not non homogenous, it includes Dalit feminism, Adivasi feminism, South Indian, North Indian Feminism,

Yet another change brought about by post modernism is our attitude to LGBT.Several legislative changes are brought to bring these minorities in the mainstream.

Imprints of post modernism are seen in all art forms like literature and paintings and cinema and TV. Mass Media is focusing on female question.

At the same time there is a dark side as of revival of fundamentalism and reaction from traditional social structure of Jat Panchayat and lot of moral policing.

**References :**


1) Stevi Jackson;Jenkien Jones(2011)- "ContemporaryFeminist theories" Rawat, New Delhi.
2) Stevi Jackson (2011) "- Feminist Social Theory" in Jackson and Jones (2011)
3) Stevi Jackson( 2011) -" Theorizing Gender and sexuality" in Jackson -jones
4) Partricia Waugh (2011)-"Postmodernism and Feminism " in Jackson-Jones
5) Irene Tinter (1990) -" Persistent Inequalities- women and world Poverty" Oxford New Delhi
6) Ken Kusterer (1995)-" The Imminent Demise of Patriarch" in Tinter
7) (1994") The Polity Render in Gender studies"
8) Polity press
9) Sylvia Walby (1994) - "Towards a theory of Patriarchy" in Polity Reader
10) Susan Heckman (1994) -" The feminist critique of rationality" in Polity Reader
11) Rosi Braidotti (1994) -" Radical philosophies of sexual difference - Luce Irregaray"in Polity Reader
12) Seyala Benhabib (1994) -" Feminism and the question of post modernism" in Polity Reader

13) Tong Rosemarie (1989) -" Feminist Thought- A Contemporary Introduction" Unwin Hunman Ltd Quoted in Wikipedia
14) Irengbam Arun( 2011) -" Gender Studies-A Survey"Maxofor Books New Delhi.
15) Carole Mccan and Seung Kyung Kim -" Feminist Theory Render Local and global Perspetives" - Rout ledge
16) Semone de Beauvoir (2010) - ":The second sex introduction" in feminist theory Render
17) Heidi Hartmann (2010) -" The Unhappy marriage of maximise and Feminism" in Feminist TheoryReader
18) Montaque Witing (2010) - "One is not Born as woman" in Feminist of Theory Reader
19) Donna Haraway (2010) - Situated Knowledge" in Feminist TheoryReader
20) Luce Irigaray (2010) -" Sex which is not one" in Feminist Theory Reader
21) Judith Butler (2010) - --"Per formative Acts and Gender" in Feminist Theory Reader
22) Sen Amartya(2009)-"The Idea Of Justice "Peguin Allen Alwin


◆◆◆

**(श्रद्धांजली)**

## प्रोफेसर टी.एस. पपोला (१९४१-२०१५)

२३ नोव्हेंबर २०१५ रोजी श्रम अर्थशास्त्राचे गाढे अभ्यासक टी.एस.पपोला यांचे दु:खद निधन झाले. मृत्यसमयी त्यांचे वय ७४ होते. पपोला यांनी जवळपास ५० वर्षे अर्थशास्त्राचे अध्ययन-संशोधन केले. त्यांनी लखनौ विद्यापीठ, इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ मॅनेजमेंट (अहमदाबाद), गिरी इन्स्टीट्यूट ऑफ डेव्हलपमेंट स्टडीज, इन्स्टीट्यूट फॉर स्टडीज इन इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट इ. विविध संस्थांमध्ये अध्यापन केले. त्यांच्या नावावर २० पेक्षा अधिक पुस्तके असून शंभराहून जास्त शोध निबंध आहेत. त्यांचा आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेशी (ILO) अत्यंत जवळचा संबंध होता आणि भारतात व विदेशातही अनेक अभ्यास केले होते.

मजूरीचे सिद्धांत, मजूरीची रचना, वेतन भेदन, श्रमबाजार, अनौपचारिक क्षेत्र, लिंगभेदन, ग्रामीण औद्योगिकरण हे त्यांच्या संशोधनाचे प्रमुख विषय होते. गेल्या काही वर्षांपासून त्यांनी अतिदूर पसरलेल्या पर्वतीय क्षेत्रासाठी विकास कार्याच्या व्यूहरचनेबाबत संशोधन सुरू केले होते. पपोला यांनी आपल्या आयुष्यात संस्थांचीही उभारणी केली. लखनौची गिरी इन्स्टिट्यूट ऑफ डेव्हलपमेंट स्टडीज ही संस्था आणि दिल्लीची इन्स्टिट्यूट ऑफ ह्युमन डेव्हलपमेंट संस्था, अशा दोनही संस्थांच्या उभारणीत त्यांचा मोठा वाटा होता. इंडियन सोसायटी फॉर लेबर एकॉनोमिक्सचे ते अनेक वर्षे सचिव व नंतर अध्यक्ष होते. इंडियन एकॉनोमिक असोसिएशनच्या, विशाखापट्टणम (२००५) येथे झालेल्या वार्षिक अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. त्यांचे अध्यक्षीय भाषण शास्त्रीय पद्धतीचे व परिपूर्ण स्वरूपाचे होते. इथे एक वैयक्तिक गोष्ट सांगता येईल. इंडियन एकॉनोमिक असोसिएशनच्या २००५ च्या वार्षिक अधिवेशनात उद्घाटन प्रसंगी माझ्या 'Economics of Newspaper Industry - A Case study of Vidarbha' या पुस्तकाचे विमोचन अध्यक्ष पपोला यांचे हस्ते झाले. आरबीआय चे गर्व्हनर रेड्डी हे उद्घाटक होते

टी.एस.पपोला यांच्या निधनामुळे श्रम अर्थशास्त्राचा एक विद्वान प्राध्यापक व संशोधक आणि संस्था उभारण्यात रूची असणाऱ्या अर्थतज्ञास आपण सर्व मुकलो आहोत. त्यांना विनम्र श्रद्धांजली.

दि.व्यं.जहागिरदार
सपांदक - 'अर्थमीमांसा'

# महाराष्ट्राच्या मानव विकासावर परिणाम करणाऱ्या निवडक निर्धारकांचे विश्लेषण

**समित माहोरे**
सहायक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर

**धीरज कदम**
सहायक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर

**प्रस्तावना :**

अलिकडच्या काळात आर्थिक विकासाचे मापन करण्यासाठी सकल राष्ट्रीय उत्पादनाऐवजी मानव विकास निर्देशांकाला अधिक महत्त्व देण्यात येत आहे. मानव विकास हा प्रत्यक्षपणे व्यक्तीगत घटकांच्या सामाजिक, आर्थिक निर्देशकांशी निगडीत आहे आणि व्यक्तिगत घटकांच्या नियोजनात त्याला अत्यंत महत्त्व आहे. समाजातील प्रत्येक घटकाला आरोग्यपूर्ण, समृध्द आणि चांगल्या जीवनमानाची अपेक्षा असते. किंबहुना त्यांचा तो अधिकार असावा. त्याअनुषंगाने संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (UNDP) ने मानव विकासाला मानवासमोरील पर्यायांच्या विस्ताराच्या स्वरूपात परिभाषित केले. मानवी निवडीशी संबंधी मुलभूत तीन पैलूं, दीर्घ व निरोगी आयुष्य, ज्ञान विस्तृत करण्याची इच्छा व योग्य जीवनमान जे विकासाच्या सर्वच स्तरांवर स्वीकार्य आहे याचा मानव विकास निर्देशांकात समावेश करण्यात आला आहे.

नियोजनाच्या आरंभापासूनच प्रादेशिक समतोल विकासाच्या प्रश्नाने अभ्यासक, राजकीय नेते, अर्थतज्ज्ञ अशा विविध घटकांचे लक्ष आकृष्ट केलेले दिसून येते. या अनुषंगाने नियोजन आयोग, विविध वित्त आयोग आणि आता 'नीती (NITI) आयोग' समतोल प्रादेशिक विकासाचे उद्दीष्ट साध्य करण्याला महत्त्व देत आहेत. प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न आंतरराष्ट्रीय, आंतरराज्यीय तसेच राज्यांतर्गत स्तरावर देखील दिसून येतो. या विषयाकडे अलिकडे अभ्यासकांद्वारे मानव विकासाच्या परिप्रेक्षातून पाहिले जात आहे.

महाराष्ट्राचा विचार करता महाराष्ट्राची निर्मितीच विदर्भ व मराठवाडयाला सामाऊन घेतांना समतोल विकासाच्या आश्वासनाने झालेली दिसते. तथापि गेल्या पाच दशकात सामाजिक, आर्थिक, राजकीय अशा विविध स्तरावर उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत विदर्भ व मराठवाडयाची स्थिती अत्यंत मागासलेली आहे. त्यामुळे मागास प्रदेशातील जनतेत मोठया प्रमाणात असंतोष वाढतो आहे. महाराष्ट्राच्या प्रादेशिक असमतोलाच्या स्वरूपाचे अध्ययन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने विविध समित्या नेमल्या. त्यामध्ये दांडेकर समिती (१९८४), निर्देशांक व अनुशेष समिती (१९९४), व अलिकडील केळकर समिती (२०१३) यांचा समावेश आहे. मागास प्रदेशातील विकासाचा अनुशेष दूर करण्यासाठी तिनही प्रदेशांसाठी १९९४ मध्ये स्वतंत्र वैधानिक विकास मंडळांची स्थापना देखील केली. तथापि मागास प्रदेशांचा विकास अनुशेष कमी न

होता वाढतच गेल्याचे अनेक अभ्यासातून दिसून येते. विशेष म्हणजे प्रगत आणि मागास प्रदेशातील विकासाच्या असमतोलाची दरी त्या त्या प्रदेशांच्या मानव विकासामध्ये देखील प्रतिबिंबित होतांना दिसते. प्रस्तुत शोध निबंधाचा उद्देश मानव विकास निर्देशांकाची जी उत्पन्न आणि उत्पन्नेतर निर्धारके (determinants)आहेत, त्यांचा महाराष्ट्रातील प्रगत व मागास प्रदेश तसेच जिल्हे यांच्या मानव विकासावरील सापेक्ष प्रभावाचे प्रतिपगमन विश्लेषणाद्वारे मापन करणे तद्वतच त्या निर्धारकांचा परस्परांरील प्रभावांचे अध्ययन करणे आहे. जेणेकरून प्रगत आणि मागास प्रदेशांच्या मानव विकासातील अंतर कमी करण्यासाठी योग्य व्यूहनीतीवर आधारित धोरण ठरविण्याला साहाय्य होईल.

**पूर्व साहित्याचा आढावा :**

सिडीकट अॅडेयेमी व इतर (SidikatAdeyemi and et.al) (२००६) यांनी आपल्या अध्ययनात उप-सहारा आफ्रिकेमधील तिरकस छेदक (cross country data) माहितीच्या आधारे बहुस्तरीय प्रतिपगमन विश्लेषण तंत्राचा वापर करून तेथील मानव विकासाच्या निर्धारकांचे परीक्षण केले आहे. त्यांच्या अध्ययनाचे निष्कर्ष दर्शवितात की, त्या भागातील मानव विकासाला नकारात्मकरित्या प्रभावित करणारे प्रमुख घटक म्हणजे, नैसर्गिक आपत्ती, बाहय ऋण संकट, समष्टीस्तरीय आर्थिक अस्थिरता, प्रतिकूल आंतरराष्ट्रीय व्यापार, स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा अभाव आणि AIDS/HIV प्रादुर्भाव हे आहेत. या अध्ययनाद्वारे उप-सहारा आफ्रिकेमधील मानव विकासाच्या उन्नयनासाठी काही संभाव्य उपायदेखील सूचविले आहेत. ते म्हणजे मानवी सुरक्षिततेची तरतूद, मानवी सशक्तीकरण, स्थिर समष्टिस्तरीय आर्थिक धोरणाची निर्मिती, विदेशी कर्जाची माफी, भ्रष्टाचार-विरोधी आंदोलन आणि AIDS/HIV संदर्भात दक्षता, व्यवस्थापन आणि उपचार करणे.

जीत बहादूर सपकोटा (२०१४) यांनी आपल्या अध्ययनात, काही आधारसंचरनात्मक चलांचा जसे, विजेची उपलब्धता, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि रस्त्यांची घनता यांचा मानव विकास निर्देशांक व त्याच्या तीन पैलूंवरील प्रभावाचे परीक्षण केले. त्यासाठी त्यांनी ९१ विकसनशील देशांशी संबंधीत १९९५ ते २०१० या कालावधीमधील पॅनल डेटाचा उपयोग केला. GMM (General Methods of Moments) च्या गतिमान पॅनल अनुमानाचे स्पष्ट निष्कर्ष असे होते की, तिनही आधारसंरचनात्मक चलांचा HDI वर लक्षणीय सकारात्मक प्रभाव होता. यावरून मानव विकासासाठी आधार संरचनेचा विकास हा अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

चेलिया आणि शनमुगम (Chelliah and Shanmugam ) (२०००) यांनी तामिळनाडु मधील उत्पन्न स्तरातील आंतर-जिल्हा उच्चावचने आणि मानव विकास यांचे विश्लेषण केले. या अध्ययनानुसार उत्पन्नातील विषमता ही मानव विकास निर्देशांकातील विषमतेपेक्षा खूप अधिक होती. निम्न उत्पन्न गटांतील जिल्हे प्रामुख्याने निम्न औद्योगिक विकास, निम्न कृषी उत्पाकता, निम्न दर्जाचा मानव विकास आणि लोकसंख्येमध्ये SC/ST चे प्रमाण अधिक असणारे व उच्च अर्भक मृत्यूदर असणारे होते.

गॅरी बेकर (१९९९) यांनी आपल्या अध्ययनात लोकसंख्येची घनता आणि आर्थिक विकास यांच्यातील संबंधावर प्रकाश टाकला. त्या

संदर्भातील त्यांच्या अध्ययनाचे प्रमुख निष्कर्ष म्हणजे- १) लोकसंख्या वाढ ही उत्पाकता कमी करु शकते. कारण जमीन व इतर नैसर्गिक संसाधनांच्या अधिक सधन वापरामुळे उत्पादनात ऱ्हासमान उत्पत्ती नियम क्रियान्वित होतो. तथापि दुसऱ्या बाजूला उच्च लोकसंख्या विशेषीकरणाला प्रोत्साहीत करते, ज्ञानातील गुंतवणूक वाढवते आणि मोठया व अधिक महत्त्वाच्या शहरांमध्ये केंद्रित होते. त्यामुळे अधिक लोकसंख्या व प्रतिव्यक्ती उत्पन्न यांच्यातील नक्त किंवा अंतिम संबंध हा मानवी भांडवलातील प्रोत्साहन व ज्ञानाच्या विस्ताराचा सकारात्मक प्रभाव; नैसर्गिक संसाधनांच्या घटत्या प्रतिफलाच्या नकारात्मक प्रभावापेक्षा किती मजबूत आहे यावर अवलंबून राहील. अंतिमत: वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येसोबत जगातील लोकसंख्येला मिळणाऱ्या वाढत्या प्रतिफलाचे संभाव्य महत्त्व लोकसंख्या आणि प्रति व्यक्ती उत्पन्नातील संबंधाबाबत पुनर्विचाराचे समर्थन करते.

**शोध निबंधाची सैध्दांतिक चौकट व संशोधन पध्दती :**

प्रस्तुत अध्ययन विविध शासकीय अहवाल व प्रकाशने तसेच इतर स्त्रोतांपासून संकलीत केलेल्या द्वितीयक सामग्रीवर आधारित आहे. पूर्व संशोधनाच्या आढाव्यावरून हे स्पष्ट होते की, वेगवेगळया प्रदेशातील मानव विकासाच्या असमतोलावर प्रभाव टाकणारे विविध घटक आहेत. याठिकाणी महाराष्ट्रातील एकूण ३५ जिल्हयांदरम्यान मानव विकासातील असमतोलाला प्रभावित करणाऱ्या काही महत्त्वाच्या निर्धारकांची चर्चा करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. मानव विकासातील असमतोलाचे मापन करण्यासाठी मानव विकास निर्देशांक (HDI), उत्पन्नेतर मानव विकास निर्देशांक (NIHDI) आणि प्रति व्यक्ती जिल्हा उत्पन्नाचा (PCDI) विचार करण्यात आला आहे.

मानव विकासातील असमतोलाला प्रभावित करणारे प्रमुख घटक म्हणून सामाजिक आधारसंरचना, औद्योगिकरण आणि लोकसंख्येची घनता यांचे परीक्षण करण्यात आले आहे. आधारसंरचनेवरील खर्च मानवी विकासाचा स्तर उंचावण्याला मदत करते. औद्योगिकरणसुध्दा रोजगार संधींची निर्मिती, श्रमिक कौशल्यात वाढ आणि मानवी भांडवलाची कार्यक्षमता यांच्या माध्यमातून लोकांचे उत्पन्न वाढवण्यास मदत करते. तसेच असे सुध्दा आढळून आले आहे की, ज्या भागामध्ये/ प्रदेशामध्ये लोकसंख्येची घनता अधिक असते तेथे मानवी भांडवलाची उत्पादकता देखील अधिक असते. परिणामत: लोकसंख्येची घनता मानवी भांडवलातील गुंतवणूकीतील वाढीसह मानव विकासाला प्रोत्साहित करते. (Garry S. Becker, 1999) प्रस्तुत अध्ययनामध्ये HDI, NIHDI आणि PCDI साठी वर्ष २०११-१२ च्या माहितीचा उपयोग करण्यात आला आहे. तसेच सामाजिक आधारसंरचना, औद्योगिकरणाचे प्रमाण आणि लोकसंख्येची घनता या चलांचा HDI, NIHDI आणि PCDI वरील प्रभावांचे अध्ययन करण्यात आले आहे. त्यासाठी तीन प्रतिपगमन प्रतिमानांची (Regression Models) निर्मिती करण्यात आली आहे आणि या तिनही प्रतिमानांचे अनुमान सामान्य न्यूनतम वर्ग पध्दतीने(OLS- Ordinary Least Square Medhod) करण्यात आले आहे.

**प्रतिमान (Model)**

निर्दिष्ट प्रतिमांनामध्ये महाराष्ट्रातील ३५ जिल्हयांच्या मानव विकासावर वर नमुद केलेल्या चलांचा सार्थक प्रभाव आहे का हे तपासण्यावर भर दिला आहे.

$$HDI_i = f(SII_i, PDI_i, INDI_i) \text{ ------- (i)}$$

$$NIHDI_i = f(SII_i, PDI_i, INDI_i) \text{ ------ (ii)}$$

$$PCDI_i = f(SII_i, PDI_i, INDI_i) \text{ ------ (iii)}$$

बहुरेषीय संबंधासह (with multiple linear relationship such as)

$$HDI_i = B_1 + B_2SII_i + B_3PDI_i + B_4INDI_i + e_i \text{ ---- (iv)}$$

$$NIHDI_i = a_1 + a_2SII_i + a_3PDI_i + a_4INDI_i + {}_i \text{ ---- (v)}$$

$HDI_i$ - जिल्हाचा मानव विकास निर्देशांक

$NIHDI_i$ - जिल्हाचा उत्पन्नेतर मानव विकास निर्देशांक

$PCDI_i$ - जिल्हयाचे प्रति व्यक्ती उत्पन्न

$SII_i$ - जिल्हयाचा सामाजिक आधारसंरचना निर्देशांक

$PDI_i$ - जिल्हयाचा लोकसंख्या घनता निर्देशांक

$INDI_i$ - जिल्हाचा औद्योगिकरण निर्देशांक

$i = 1, 2, 3, \ldots\ldots, 35$

**चल व माहिती स्त्रोतांची वैशिष्टये :**

प्रस्तुत अध्ययनासाठी मानव विकास निर्देशांक (HDI ) उत्पन्नेतर मानव विकास निर्देशांक (NIHDI) आणि प्रति व्यक्ती जिल्हा उत्पन्न (PCDI )ही तीन आश्रित चले म्हणून विचारात घेतली आहेत, तर सामाजिक आधार संरचना निर्देशांक, लोकसंख्या घनता निर्देशांक आणि औद्योगिकरण निर्देशांक या तीन चलांना स्वतंत्र चल (independent variable) म्हणून विचारात घेण्यात आले आहे.

**मानव विकास निर्देशांक :**

प्रस्तुत अध्ययनामध्ये मानव विकास निर्देशांकाच्या मापनासाठी HDI च्या तीन पैलूंशी संबंधीत निर्देशांकाचा जसे -

i) जन्माच्या वेळी अपेक्षित आयुर्मान

ii) शैक्षणिक निर्देशांक यासाठी साक्षरता दर व शाळेची समायोजित माध्य वर्षे (adjusted mean years of schooling)

iii) उत्पन्न निर्देशांक यासाठी शुध्द प्रति व्यक्ती जिल्हा उत्पन्न इ. उपयोग करण्यात आला.

प्रत्येक निर्देशांकचे मापन घटक भिन्न असल्यामुळे, माहितीचे सामान्यीकरण करून HDI चे मापन करण्यात येते. अपेक्षित आयुर्मान, शिक्षण व उत्पन्नाशी संबंधीत स्वतंत्र निर्देशांक एका सामान्य (HDI) निर्देशांकात परिवर्तीत करण्यासाठी पुढील सूत्राचा उपयोग होतो.

$$\text{पैलू निर्देशांक} = \frac{\text{वास्तविक मूल्य} - \text{न्यूनतम मूल्य}}{\text{अधिकतम मूल्य} - \text{न्यूनतम मूल्य}}$$

उपरोक्त पैलू निर्देशाकांत चलांची न्यूनतम व अधिकतम मूल्ये २०१२ च्या महाराष्ट्र मानव विकास अहवालात नमुद केल्याप्रमाणे घेतली आहेत. HDI चे मूल्य काढण्यासाठी तिन्ही पैलूंच्या सामान्यीकृत निर्देशाकांच्या मूल्यांचे समांतर माध्य विचारात घेण्यात आले आहे.

**उत्पन्नेतर मानव विकास निर्देशांक :(NIHDI)**

प्रस्तुत शोध निबंधचा उद्देश महाराष्ट्रातील विविध जिल्हयातील मानव विकासावर मानव विकास निर्देशांकाला विचारात घेण्यात आलेल्या उत्पन्न व उत्पन्नेतर चलांच्या प्रभावाचे परीक्षण करणे असल्यामुळे मानव विकासाच्या उत्पन्नेतर दोन पैलूंच्या (शिक्षण व आरोग्य) आधारे उत्पन्नेतर मानव विकास निर्देशांकाचे मूल्य विचारात घेण्यात आले आहे. त्यासाठी पुढील सूत्राचा उपयोग करण्यात आला आहे .

$$NIHDI = (\tfrac{1}{2}\text{ Health Index} + \tfrac{1}{2}\text{ Education Index})$$

**प्रति व्यक्ती जिल्हा उत्पन्न : (PCDI)**

समाजातील व्यक्तींच्या जीवनमानाची कल्पना येण्यासाठी मानव विकास निर्देशांकात प्रति व्यक्ती उत्पन्न हा महत्वाचा निर्देशक आहे. या ठिकाणी प्रति व्यक्ती जिल्हा उत्पन्न विचारात घेऊन उपरोक्त पैलू निर्देशांकाच्या आधारे उत्पन्न निर्देशांक परिकलीत करण्यात आले आहे.

त्यासाठी पुढील सूत्राचा उपयोग करण्यात आला -

$$\text{उत्पन्न निर्देशांक} = \frac{\text{वास्तविक प्रति व्यक्ती जिल्हा उत्पन्न} - \text{न्यूनतम प्रति व्यक्ती जिल्हा उत्पन्न}}{\text{महत्तम प्रति व्यक्ती जिल्हा उत्पन्न} - \text{न्यूनतम प्रति व्यक्ती जिल्हा उत्पन्न}}$$

**सामाजिक आधारसंरचना: (Social Infrastructure)**

सामाजिक आधारसंरचनेची सर्वसामान्य व्याख्या करणे अवघड आहे. सामान्यत: शाळा, शाळांमध्ये विविध स्तरांवर उपलब्ध सोईसुविधा, महाविद्यालये, विद्यापीठे, खेळांची मैदाने, उद्याने, दवाखाने, प्राथमिक आरोग्य केंद्रे, त्यामधील खाटांची संख्या, डॉक्टर्स इ. सामाजिक आधार संरचनेअंतर्गत येतात. प्रस्तुत विश्लेषणामध्ये विद्यार्थी - वर्गखोल्या प्रमाण, पिण्याच्या पाण्याची सुविधा आणि मुले व मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहांची उपलब्धता या निर्देशकांच्या आधारावर शैक्षणिक आधार संरचना निर्देशांक परिकलीत करण्यात आला आहे. त्यासाठी २०१२ मध्ये प्रकाशित UNICEF च्या शैक्षणिक विकास निर्देशांक, महाराष्ट्र २०११-१२ च्या अहवालातील माहितीचा आधार घेण्यात आला आहे. त्याबरोबरच, एकूण रूग्णालयांची संख्या, चिकित्सालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे यांच्या सरासरी उपलब्धतेच्या आधारे आरोग्य आधारसंरचना निर्देशांक परिकलीत करण्यात आला आहे. अंतिमत: शैक्षणिक व आरोग्य अशा दोन्ही आधारसंरचना निर्देशांकाच्या सामान्यीकृत मुल्यांची सरासरी म्हणजे सामाजिक आधारसंरचना निर्देशांक होय.

**लोकसंख्येची घनता (Population Density)**

लोकसंख्येची घनता म्हणजे प्रति वर्ग चौ. कि.मी. परिक्षेत्रामध्ये राहणाऱ्या लोकांची सरासरी

संख्या होय. याठिकाणी २०११च्या जनगणना माहितीच्या आधारे विविध जिल्हयांसाठी लोकसंख्या घनता निर्देशांक परिकलीत करण्यात आला आहे.

**औद्योगिकरण (Industrialisation) :**

औद्योगिक क्षेत्र प्रामुख्याने वस्तुनिर्माणी व विविध वस्तुंच्या उत्पादनाशी संबंधीत असते. औद्योगिकरण निर्देशांक परिकलीत करण्यासाठी महाराष्ट्राच्या आधारसंरचना सांख्यिकीय माहितीचा उपयोग करण्यात आला आहे.

**माहितीचे विश्लेषण व चर्चा :**

मानव विकास निर्देशांकावरील सामाजिक आधार संरचना निर्देशांक (SII), लोकसंख्या घनता निर्देशांक (PDI) आणि औद्योगिकरण निर्देशांक (INDI) या तीन स्वतंत्र चलांच्या प्रतिपगमन विश्लेषणाच्या निष्कर्षांची चर्चा पुढील तक्ता क्रमांक १ च्या साहाय्याने करण्यात आली आहे.

**तक्ता क्र.१**

**मानव विकास निर्देशांकावरील निर्धारकांच्या प्रतिपगमन विश्लेषणाचे निष्कर्ष**

| py (Variable) | Lkgxqkkad ¼Coefficient½ | T- lka[;dhph.kh ¼T-Statistic½ | lHkkO; eqY; Prob. Value |
|---|---|---|---|
| fLFkjkad ¼Constant½ | 0.666 | 42.244 | 0.000 |
| lkekftd vk/kkj lajpuk funsZ'kkad (SII) | 0.87 | 1.699 | 0.099 |
| Ykksdla[;k ?kuRk funsZ'kkad ¼PDI½ | 0.38 | 3.404 | 0.002 |
| vkS|ksfxdj.k funsZ'kkad ¼INDI½ | 0.115 | 3.029 | 0.005 |
| F- Statistics | 16.324 | | |
| R- Squared | 0.612 | | |
| Adjusted R Squared | 0.575 | | |
| Durbin - Watson Test | 1.975 | | |

उपरोक्त विश्लेषणावरून असे निदर्शनास येते की, महाराष्ट्रातील ३५ जिल्हयांच्या संदर्भातील HDI वर तीन चलांचा i) सामाजिक आधारसंरचना निर्देशांक (SII), ii) लोकसंख्या घनता निर्देशांक (PDI) व iii) औद्योगिकरण निर्देशांक (INDI) यांचा संभाव्य परिणाम धनात्मक व सांख्यिकीयदृष्टया लक्षणीय आहे.

त्याचबरोबर लोकसंख्या घनता आणि औद्योगिकरण यांच्यात १ प्रतिशत सार्थकता पातळीवर धनात्मक व सांख्यिकीयदृष्टीने लक्षणीय सहसंबंध आहे. तर सामाजिक आधारसंरचनेचा औद्योगिकरणाशी सहसंबंध १० प्रतिशत सार्थकता पातळीवर लक्षणीय आहे. विश्लेषणावरून असेही स्पष्ट होते की, सामाजिक आधारसंरचनेतील १ मात्रा बदल मानव विकासात ०.८७ मात्रेने धनात्मक बदल घडवून आणते, लोकसंख्या घनतेमधील एक मात्रा धनात्मक बदल, मानव विकास निर्देशांकात ०.३८ मात्रांची सुधारणा घडवून आणतो. तर औद्योगिकरणातील एक मात्रा बदलाला मानव विकास निर्देशाकांद्वारे दिला जाणारा प्रतिसाद ०.११५ मात्रा आहे. प्रतिमानाची स्पष्टीकरणात्मक शक्ती ०.६१२ आहे, जे स्पष्ट करते की, उपरोक्त तीन

चले विविध जिल्हांच्या मानव विकासाला ६१ प्रतिशत पर्यंत निर्धारीत करते. ज्या जिल्हयांमध्ये सामाजिक आधार संरचना उत्तम आहे, औद्योगिकरणाचे प्रमाण अधिक आहे आणि लोकसंख्येची घनता अधिक आहे, त्यांचा HDI क्रम देखील वरचा आहे.

उपरोक्त प्रतिमानासाठी t सांख्यिकीचे मूल्य (PDI व INDI या दोन चलांसाठी) २ पेक्षा अधिक आहे, जे प्रतिमानातील चलांच्या सापेक्ष महत्वाला निर्धारीत करते. तथापि सामाजिक आधारसंरचनेसाठी सांख्यिकीचे मूल्य २ पेक्षा कमी असल्यामुळे त्यामध्ये त्रुटीचा अंश अधिक असल्याने ते सापेक्षत: कमी महत्वपूर्ण असल्याचा निष्कर्ष निघतो.

उपरोक्त तक्ता क्रमांक १ मध्ये R वर्ग (R squared) आणि समायोजित R वर्ग (adjusted R squared) चे मूल्य दर्शविले आहे. R वर्ग हा प्रतिपगमन प्रारूपाद्वारे स्पष्ट केलेल्या आश्रीत चलातील तफावतीचे प्रमाण आहे. R वर्गाचे मूल्य जर कमी असेल तर ते प्रारूप तथ्यावर योग्यप्रकारे लागू होत नसल्याचे निदर्शक आहे. समायोजित R वर्ग, प्रतिमान योग्य प्रकारे लागू होण्यासाठी, (Goodness of fit of the model) R वर्गाला अधिक अचूकपणे प्रतिबिंबीत करून दुरूस्त करण्याचा प्रयत्न करते. वरील विश्लेषणात R वर्ग आणि समायोजित R वर्गाचे मूल्य अनुक्रमे ०.६१२ आणि ०.५७५ आहे. शिवाय त्रुटीची सहनशीलता (Tolerance) शुन्याच्या जवळ नसून ०.५ पेक्षा अधिक आहे. त्यामुळे उच्च बहुसहसंबंधीतता (High multicollinearity) नाही आणि प्रतिपगमन सहसंबंधाचा प्रमाप विभ्रम फुगलेला नसेल. अतिउच्च तफावत विस्तार घटक (VIF - Variance Inflation Factor) २ पेक्षा कमी आहे त्यामुळे बहुसहसंबंधीततेच्या समस्येपासून (Multicollinerity problem) हे प्रतिमान मुक्त आहे. प्रस्तुत प्रतिमानासाठी डर्बन वॉटसन चाचणी (Durbin

**तक्ता क्र.२**

**उत्पन्नेतर मानव विकास निर्देशांकावर निर्धारकांच्या प्रतिपगमन विश्लेषणाची निष्कर्ष**

| py (Variable) | Lkgxq.kkad ¼Coefficient½ | T- lka[;dh pkp.kh ¼T-Statistic½ | lakHkO; ewY; Prob. Value |
|---|---|---|---|
| fLFkjkad ¼Constant½ | 0.882 | 76.863 | 0.000 |
| lkekftd vk/kkj lajpukfun'kkd (SII) | 0.070 | 0.365 | 0.718 |
| Ykksdla[;k ?kurk fun'kkd ¼PDI½ | 0.286 | 1.705 | 0.098 |
| vkS|ksfxdj.kfun'kkd ¼INDI½ | 0.226 | 1.140 | 0.263 |
| F- Statistics | 2.571 | | |
| R- Squared | 0.199 | | |
| Adjusted R Squared | 0.122 | | |
| Durbin - Watson Test | 1.975 | | |

Watson Test)चे मूल्य १.९७५, म्हणजेच जवळपास २ च्या बरोबर आहे,जे क्रमिक सहसंबंध नसल्याचे निदर्शक आहे.

तक्ता क्रमांक २ मधील विश्लेषणावरून दिसून येते की, फक्त लोकसंख्या घनतेचाच उत्पन्नेतर मानव विकास निर्देशांका (NIHDI) वर १० प्रतिशत सार्थकता पातळीवर धनात्मक आणि सांख्यिकीयदृष्ट्या लक्षणीय प्रभाव दिसून येतो. परंतु सामाजिक आधारसंरचना आणि औद्योगिकरणाचा उत्पन्नेतर मानव विकास निर्देशांकावर (NIHDI) लक्षणीय प्रभाव दिसून येत नाही. लोकसंख्या घनतेमधील १ मात्रा बदल उत्पन्नेतर मानव विकास निर्देशांकात ०.२८६ मात्रा धनात्मक बदल घडवून आणते. तर सामाजिक आधारसंरचना आणि औद्योगिकरण हे उत्पन्नेतर घटक मानव विकास निर्देशांकावर (NIHDI) सांख्यिकीयदृष्ट्या लक्षणीय प्रभाव टाकणारे घटक नसल्याचे निदर्शनास येते. प्रारूपामधील प्रत्येक चलांचे सापेक्ष महत्त्व निर्धारीत करण्यासाठी t सांख्यिकीय चाचणी साहाय्यक ठरते. t सांख्यिकीय चाचणीचे मूल्य २ पेक्षा अधिक किंवा – २ पेक्षा कमी (ऋणात्मक असल्यास) असायला हवे. वरील प्रारूपात तिन्ही चलांसाठी t सांख्यिकीय चाचणीचे मूल्य २ पेक्षा कमी आहे. तसेच R वर्ग आणि समायोजीत R वर्गाचे मूल्य अनुक्रमे ०.१९९ आणि ०.१२२ आहे. म्हणजेच प्रारूपातील चलांचा निर्धारण गुणांक अत्यंत कमी आहे.

उत्पन्नेतर मानव विकास निर्देशांकाचे (NIHDI) प्रतिपगमन प्रारूप सांख्यिकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण नसल्याचे निष्कर्षावरून स्पष्ट होते. याचाच अर्थ उत्पन्नेतर मानव विकास निर्देशांक वा शैक्षणिक व आरोग्य निर्देशांक प्रत्यक्षपणे सामाजिक आधारसंरचना, लोकसंख्येची घनता आणि औद्योगिकरणावर लक्षणीयरित्या अवलंबून नाही. त्यामुळे प्रति व्यक्ति जिल्हा उत्पन्न आणि उपरोक्त तीन निर्धारकांमधील संबंध प्रतिपगमन विश्लेषणाच्या आधारे तपासण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्याचे निष्कर्ष पुढील तक्ता क्रमांक ३ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

**तक्ता क्र. ३**

**प्रति व्यक्ति उत्पन्नावर निर्धारकांच्या प्रतिपगमन विश्लेषणाचे निष्कर्ष**

| py (Variable) | Lkgxqkad ¼Coefficient½ | T-lka[;dhpkp.kh ¼t-Statistic½ | laHkO; eqY; Prob. Value |
|---|---|---|---|
| fLFkjkad ¼Constant½ | 0.239 | 7.734 | 0.000 |
| lkekftd vk/kkj lajpukfunsZ'kkad (SII) | 0.265 | 2.130 | 0.041 |
| Ykksdla[;k ?kurk funsZ'kkad ¼PDI½ | 0.241 | 2.214 | 0.034 |
| vkS|ksfxdj.kfunsZ'kkad ¼IDI½ | 0.534 | 4.148 | 0.000 |
| F- Statistics | 20.340 | | |
| R- Squared | 0.663 | | |
| Adjusted R Squared | 0.631 | | |
| Durbin - Watson Test | 2.139 | | |

तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, सामाजिक आधार संरचना, लोकसंख्येची घनता आणि औद्योगिकरणाचा प्रति व्यक्ति जिल्हा उत्पन्नावर धनात्मक आणि सांख्यिकीयदृष्टया लक्षणीय प्रभाव आहे. प्रति व्यक्ति जिल्हा उत्पन्न जिल्हयाच्या मानव विकास निर्देशांकात जीवनमानाचे प्रतिनिधित्व करते. SII, PDI आणि INDI चा प्रति व्यक्ति जिल्हा उत्पन्नावरील प्रभाव हा अनुक्रमे ५, ५ व १ प्रतिशत सार्थकता पातळीवर सांख्यिकीयदृष्टया लक्षणिय आहे. सामाजिक आधासंरचनेतील एक मात्रा बदल प्रति व्यक्ति जिल्हा उत्पन्नात ०.२६५ मात्रा धनात्मक बदल घडवून आणतो. त्याचप्रमाणे लोकसख्येची घनता आणि औद्योगिकरणातील एक मात्रा बदल प्रति व्यक्ति उत्पन्नामध्ये अनुक्रमे ०.२४१ आणि ०.५३४ मात्रा धनात्मक बदल घडवून आणते.

उपरोक्त प्रतिपगमन प्रारूपामध्ये सर्वच तीन्ही चलांसाठी t सांख्यिकी चाचणीचे मूल्य २ पेक्षा अधिक आहे जे प्रतिमानातील चलांची सबळ समर्पकता दर्शविते.

तक्तावरून दिसून येते की, R वर्ग आणि समायोजित R वर्गाचे मूल्य अनुक्रमे ०.६६३ व ०.६३१ आहे. यावरून या तीन चलांद्वारे प्रति व्यक्ति जिल्हा उत्पन्नाच्या ६६ प्रतिशत निर्धारणांचे स्पष्टीकरण मिळते.

उपरोक्त विश्लेषणासाठी क्षम्यता (Tolerance) ०.५ पेक्षा अधिक आहे. त्यामुळे उच्च बहुसहसंबंधीततेची (High Multicollinearity) समस्या नसून, प्रतिपगमन सहगुणांकाचा संभाव्य विभ्रम (Standard error) वाढणारा नसेल. अत्याधिक तफावत वृध्दी घटक (VIF-Variance Inflation Factor) फक्त १.५२५ आहे. म्हणजेच २ पेक्षा कमी असल्यामुळे बहुसहसंबंधीत्वाची संख्या ग्राहय नाही. डर्बिन वाटसन चाचणीचे मूल्य २.१३९ म्हणजेच २ च्या जवळपास आहे, जे क्रमिक सहसंबंध (serial correlation) नसल्याचे दर्शक आहे. परंतु वास्तविक मुल्य २ पेक्षा अधिक असल्याने ते निम्न ऋणात्मक सहसंबंधाला दर्शवते.

**निष्कर्ष व ध्वन्यर्थ :**

प्रस्तुत विश्लेषणाचे मानव विकास निर्देशांक (HDI), उत्पन्नेतर मानव विकास निर्देशांक (NIHDI) म्हणजेच मानव विकासाचे शैक्षणिक व आरोग्यविषयक सामाजिक घटक आणि प्रति व्यक्ति उत्पन्न (PCI) या आर्थिक घटकावर सामाजिक आधारसंरचना, लोकसंख्येची घनता आणि औद्योगिकरण या प्रमुख तीन निर्धारकांचा काय व किती परिणाम होतो याचे प्रतिपगमन विश्लेषण प्रारूपाद्वारे अध्ययन करण्यात आले आहे.

उपरोक्त सर्वच प्रारूपांच्या विश्लेषणावरून असे दिसून येते की, सामाजिक आधारसंरचना, लोकसंख्येची घनता आणि औद्योगिकरण ही चले मानव विकास निर्देशांक व विशेषत: त्याच्या आर्थिक पैलूंचे निर्देशक असलेल्या प्रति व्यक्ति जिल्हा उत्पन्नावर, धनात्मक व सांख्यिकीयदृष्टया लक्षणीय प्रभाव टाकतात.

विशेषत: मानव विकास निर्देशांकाच्या आर्थिक पैलूंचे म्हणजेच प्रति व्यक्ति जिल्हा उत्पन्नाच्या ६६ प्रतिशत निर्धारणाचे स्पष्टीकरण या तीन चलांद्वारे मिळते.

तथापि, उत्पन्नेतर मानव विकास निर्देशांक (NIHDI) म्हणजेच मानव विकासाच्या शैक्षणिक व आरोग्य निर्देशांकावर मात्र या तीन चलांचा प्रभाव

सांख्यिकीयदृष्टया लक्षणीय दिसून येत नाही. याचाच ध्वन्यर्थ असा आहे की, मानव विकासाच्या शैक्षणिक व आरोग्य विषयक पैलूंवर प्रभाव टाकणारे घटक अनेक असून आपण विचारात घेतलेल्या तीन घटकांव्यतिरिक्त इतर घटक हे अधिक महत्त्वपूर्ण आहेत.

विश्लेषणावरून असे लक्षात येते की, एकंदर महाराष्ट्राच्या मानव विकासावर परिणाम करणाऱ्या आपण विचारात घेतलेल्या तीन चलांपैकी (निर्धारकांपैकी) सामाजिक आधारसंरचना निर्देशांकाचा सहगुणांक सर्वाधिक ०.८७ आहे. त्यामुळे गुणात्मक सामाजिक आधारसंरचनेची निर्मिती व त्याचबरोबच समान तत्वावर त्यापर्यंत सर्वाची पोहच निर्माण होणे महत्त्वाचे आहे. विशेषत: महाराष्ट्रातील ज्या जिल्हयांमध्ये मानव विकास निर्देशांक कमी आहे. जसे गडचिरोली, हिंगोली, नंदुरबार, उस्मानाबाद, गोंदिया, वाशिम, परभणी, इ. जिल्हयांमध्ये सामाजिक आधार संरचना निर्मितीवर भर देणे अत्यावश्यक आहे. सामाजिक आधार संरचना आणि औद्योगिकरण यांच्यातील सहसंबंध ५ प्रतिशत सार्थकता पातळीवर लक्षणीय नाही. त्यामुळे या जिल्हयांमध्ये औद्योगिकरण वाढवण्यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न करण्याची गरज आहे.

**References :**


1. Chaudhary, M. Q.(2013). Determinants of Human Development Disparities: A Cross District Analysis of Punjab, Pakistan. Lahor, Pakistan .
2. Conceicao, P. A. (2009*). Measuring Subective Wellbeing: A Summary Review of the Literature. Office of Development Studies, UNDP. New York, USA.
3. Gary S. Becker, E. L. (1999). Population and Economic Growth. American Economic Association, 145-149.
4. Institute of Applied Manpower Research. (2011). India Human Development Report 2011: Towards Social Inclusion. New Delhi: Oxford.
5. Robert Costanza, M. H. (2009, January). Beyond GDP : The Need for New Measures of Progress. Boston University, the Pardee Papers/no. 4. Boston, Massachusetts: Boston University. Retrieved from http://www.bu.edu/pardee/files/documents/PP-004-GDP.pdf
6. Sapkota, J. B. (2014). Access to Infrastructure and Human Development : cross-country evidence. In K. H., Perspectives on the Post-2015 Development Agends. Tokyo: JICA Research Institute. Retrieved from www.isanet.org: http://web.isanet.org/Web/Conferences/FLACSO-ISA%20BuenosAires%202014/Archive/bb9e1108-343d-4858-bf00-e208135b6f7c.pdf
7. Shanmugam, R. J. (2000). Some Aspects of Inter District Disparities in Tamil Nadu. 38th Annual Conference of the Indian Econometric Society. Chennai.
8. Sidikat L. Adeyemi, G. T. (2006, December). Determinants of Human Development in Sub-Saharan Africa. African Journal of Economic Policy, 15-34.

9. UNDP. (2014). Human Development Report 2014. New York: United Nations Development Programme.

10. UNICEF, G. M. (2012). Educational Development Index Maharashtra 2011-12.Mumbai: Government of Maharashtra.

◆◆◆

## Appendix : Data

| District | Rank | HDI | NIHDI | Income Index | Social Infrastructure | Population Density | Industrialization |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Ahmednagar | 18 | 0.72 | 0.894 | 0.372 | 0.406 | 0.025 | 0.113 |
| Akola | 17 | 0.722 | 0.921 | 0.324 | 0.242 | 0.032 | 0.049 |
| Amravati | 22 | 0.701 | 0.909 | 0.288 | 0.223 | 0.021 | 0.042 |
| Aurangabad | 14 | 0.727 | 0.883 | 0.414 | 0.392 | 0.037 | 0.130 |
| Beed | 26 | 0.678 | 0.879 | 0.274 | 0.287 | 0.022 | 0.015 |
| Bhandara | 20 | 0.718 | 0.903 | 0.349 | 0.245 | 0.028 | 0.011 |
| Buldana | 24 | 0.684 | 0.903 | 0.246 | 0.250 | 0.025 | 0.037 |
| Chandrapur | 19 | 0.718 | 0.883 | 0.39 | 0.216 | 0.016 | 0.022 |
| Dhule | 27 | 0.671 | 0.866 | 0.282 | 0.209 | 0.027 | 0.037 |
| Gadchiroli | 34 | 0.608 | 0.838 | 0.148 | 0.208 | 0.001 | 0.001 |
| Gondiya | 21 | 0.701 | 0.909 | 0.288 | 0.231 | 0.023 | 0.007 |
| Hingoli | 33 | 0.646 | 0.860 | 0.223 | 0.113 | 0.022 | 0.004 |
| Jalgaon | 16 | 0.723 | 0.889 | 0.392 | 0.496 | 0.037 | 0.101 |
| Jalna | 29 | 0.663 | 0.861 | 0.266 | 0.474 | 0.024 | 0.029 |
| Kolhapur | 6 | 0.77 | 0.918 | 0.475 | 0.492 | 0.055 | 0.226 |
| Latur | 28 | 0.663 | 0.890 | 0.21 | 0.261 | 0.035 | 0.021 |
| Mumbai | 2 | 0.841 | 0.935 | 0.463 | 0.402 | 2.537 | 0.230 |
| Mumbai (Sub) | 1 | 0.841 | 0.935 | 0.654 | 0.402 | 2.650 | 0.467 |
| Nagpur | 5 | 0.786 | 0.933 | 0.493 | 0.392 | 0.051 | 0.206 |
| Nanded | 30 | 0.657 | 0.875 | 0.22 | 0.245 | 0.032 | 0.025 |
| Nandurbar | 35 | 0.604 | 0.786 | 0.24 | 0.189 | 0.026 | 0.006 |
| Nashik | 9 | 0.746 | 0.885 | 0.468 | 0.756 | 0.041 | 0.240 |
| Osmanabad | 31 | 0.649 | 0.866 | 0.214 | 0.221 | 0.019 | 0.007 |
| Parbhani | 25 | 0.683 | 0.870 | 0.31 | 0.193 | 0.029 | 0.009 |
| Pune | 3 | 0.814 | 0.924 | 0.595 | 0.324 | 0.068 | 0.651 |
| Raigarh | 7 | 0.759 | 0.910 | 0.456 | 0.229 | 0.038 | 0.157 |
| Ratnagiri | 12 | 0.732 | 0.911 | 0.376 | 0.383 | 0.016 | 0.037 |
| Sangli | 11 | 0.742 | 0.906 | 0.414 | 0.403 | 0.033 | 0.101 |
| Satara | 10 | 0.742 | 0.911 | 0.405 | 0.536 | 0.028 | 0.060 |
| Sindhudurg | 8 | 0.753 | 0.918 | 0.424 | 0.108 | 0.012 | 0.012 |
| Solapur | 13 | 0.728 | 0.897 | 0.391 | 0.462 | 0.028 | 0.442 |
| Thane | 4 | 0.8 | 0.902 | 0.597 | 0.634 | 0.138 | 1.000 |
| Wardha | 15 | 0.723 | 0.907 | 0.355 | 0.238 | 0.017 | 0.013 |
| Washim | 32 | 0.646 | 0.897 | 0.147 | 0.029 | 0.022 | 0.008 |
| Yavatmal | 23 | 0.7 | 0.887 | 0.325 | 0.385 | 0.017 | 0.034 |

(श्रद्धांजली)

# नोबेल लॉरेट जॉन नॅश–गोष्ट एका शापित गंधर्वाची

**दि.व्यं.जहागिरदार**
मुख्य संपादक – 'अर्थमीमांसा'
अमरावती.

**१) प्रस्तावना :**

शनिवार दि.२३ मे २०१५ रोजी टॅक्सी अपघातात प्रसिद्ध गणितज्ञ जॉन नॅश यांचा अमेरिकेत मृत्यू झाला. त्यांची पत्नी एलिसिया ह्यांही त्या गंभीर अपघातात मृत्यू झाल्याने अनेकांना एक प्रकारचा धक्का बसला. मृत्युसमयी नॅश यांचे वय ८६ वर्षाचे होते. इ.स. १९९४ रोजी त्यांना अर्थशास्त्रातील अत्यंत प्रतिष्ठेचे नोबेल प्राईस प्राप्त झाले होते व याचवर्षी (२०१५) जागतिक पातळीवर गणितातील सर्वोच्च समजले जाणारे एबल पारितोषकही त्यांना मिळाले होते. नॉर्वेमध्ये मिळालेले हे पारितोषिक स्वीकारून नॅश आपल्या न्यूजर्सी येथील घरी परतत होते. तेव्हा अपघात झाला.

जॉन नॅश यांचे चरित्र सॅल्विया नासर या न्यूयॉर्क टाईम्सच्या आर्थिक विषयावर लिखाण करणाऱ्या वृत्तपत्र प्रतिनिधीने १९९८ मध्ये प्रसिध्द केले. तेव्हापासून नॅश प्रसिद्धीच्या झोतात आलेत. नासर ह्या स्त्री लेखिकेने त्यांच्या जीवनावर लिहिलेले A Beautiful mind हे पुस्तक मूळातूनच वाचावे इतके अप्रतिम आहे ! त्यात वर्णिलेल्या विविध घटना व असंख्य पात्रे पाहून आपण थक्क होतो. कोणाला प्रसिद्ध व्यक्तीचे चरित्र लिहावयाचे असेल त्याने या पुस्तकाचे पारायण केले पाहिजे. या पुस्तकात ५० प्रकरणे असून प्रत्येक प्रकरणांच्याबाबत दिलेले संदर्भ मोजले तर ते जवळपास दोन हजारांपेक्षा जास्त भरतील ! त्यांच्या जीवनावर A Beautiful mind या नावाने अत्यंत दर्जेदार व उत्कृष्ट चित्रपटही जवळपास इ.स.२००० मध्ये निघाला होता. त्या चित्रपटात रसेल क्रो यांनी नॅशची भूमिका साकारली होती. ते अत्यंत बुद्धिमान असून त्यांना पॅरेनाईड स्किझोफ्रेनिया हा मानसिक आजार झाला होता. अनेक वेळा त्यांना रुग्णालयातही भरती केले आहे. सॉल्विया नासर या विदुषीने या कादंबरीला जी प्रस्तावना लिहिली त्यात अखेरीस ती लिहते, "It is a story of mistry of the human mind in three acts : genius, madness, reawakening" चित्रपटाचा नायक रसेल क्रो यांना नॅश एका भेटीत म्हणाले होते की, 'तुम्हाला मानसिक रुग्णाची भूमिका करावी लागली. मी मात्र ते सर्व भोगले'.

बहुधा इ.स. २००३ मध्ये आयआयटी मुंबई व्दारा आयोजित एका कार्यक्रमासाठी नॅश मुंबईला आले होते. उद्घाटनाचा कार्यक्रम ताजमहल हॉटेलात होता. त्याबाबतची छोटीशी बातमी टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रात वाचल्यावर स्वत: मी त्या कार्यक्रमाला गेलो होतो. तेथे नॅश यांना पाहण्याचा व ऐकण्याचा दुर्मिळ योग आला होता. भारतातील

(कै) डॉ. श्रीराम अभ्यंकर यांचा नॅश यांच्याशी परिचय होता. अमेरिकन विद्यापीठात ते दोघेही एकाचवेळी संशोधन-अध्यापन करीत होते. ते दोघेही गणितज्ञ म्हणून सुविख्यात होते. तसेच अमेरिकेत स्थायिक झालेले भारतीय अर्थतज्ज्ञ डॉ. अविनाश दीक्षित यांचाही नॅश यांच्याशी घरगुती पातळीवर स्नेह होता. दिक्षीतांनी एकदा नॅश यांना डिनरसाठी निमंत्रित केले. त्यावेळी नॅश यांनी होकार देऊन आपल्या मुलालाही सोबत आणतो असे सांगितले. ही आठवण नॅशचे चरित्र लिहिणाऱ्या नासर यांनी सांगितली आहे.

**२) जीवन प्रवास :**

जॉन नॅशचा जन्म १३ जून १९२८ रोजी ब्ल्यूफिल्ड मधील एका छोट्या हॉस्पिटलमध्ये झाला. लहानपणापासून तो आईच्या फार जवळ असे. त्याची आई केवळ गृहिणी नव्हती. तिला इतरांना शिकवणे आवडत असे. शाळेत तो सर्वसाधारणच होता. चौथीच्या अहवालात (report card) त्याला गणितात सर्वांत कमी गुण मिळाले होते. पण त्याला पुस्तके वाचण्याची व प्रयोग करण्याची सुरुवातीपासून आवड होती. अर्थात त्याला मित्रांची फारशी आवड नव्हती. मात्र त्याच्या आईवडिलांना तो हुशार वाटे, वयाच्या १३ व्या वर्षी त्याने बेल यांनी लिहिलेले Men of Mathematis हे पुस्तक वाचले. प्रसिद्ध गणितज्ञ फेरमॅटच्या एका प्रमेयाची त्याने सिद्धता दर्शवून दिली. तेथून तो गणिताकडे वळला तो अखेरपर्यंत ...... मागे न फिरता तो पुढे जातच राहिला. उच्च शिक्षणासाठी हॉवर्ड, प्रिन्सस्टन सारख्या विद्यापीठांमध्ये त्याला फेलोशिप मिळाल्या होत्या पण त्याने प्रिन्सस्टनची निवड केली. ते न्यूजर्सीचे भागात स्थित होते. प्रिन्सस्टन मध्ये त्यावेळी जॉन नॉन न्यूमन हे जागतिक कीर्तीचे गणितज्ञ होते. ते विद्यार्थ्यांचे रोल मॉडेल होते. न्यूमन आणि मॉर्गस्टन यांनी संयुक्तपणे १९४४ मध्ये गेम थिएरीवर क्रांतिकारक ग्रंथ प्रसिद्ध केला होता. न्यूयॉर्क टाईम्सच्या पहिल्या पानावर त्या ग्रंथाचा उल्लेख झाल्याने न्यूमन प्रसिद्धीच्या झोतात आले होते. वयाच्या २२ व्या वर्षी (इ.स. १९५०) नॅश त्यांनी गणित विषयात पीएच.डी. प्राप्त झाली. त्यांचा विषय होता:'Equilibrium points in N-persons Games'. नंतर त्यांनी डिफरन्शिल इक्वेशन्सवरही भरीव कार्य केले. गणितात त्यांना एम्बेंडींग थियरी स्पष्ट करुन अनेक कूट प्रश्न सोडविलेत. त्याचा विवाह एलीसियाशी झाला. त्यांना मुले झालीत. पण १९५९ मध्ये त्यांच्या कुटुंबावर वज्राघात झाला. त्यांना स्किझोफ्रेनियाचा आजार झाल्याचे स्पष्ट झाले. त्यांचे व्यक्तिमत्त्व दुभंगले. जवळपास २३-२४ वर्षे त्यांना ह्या आजाराने छळले. पत्नीशी घटस्फोट झाला तरीही एलीसियाने आजारपणात त्यांची काळजी घेतली. १९८५ च्या सुमारास ते पुन्हा प्रिन्सस्टन विद्यापीठात दाखल झालेत. १९९४ मध्ये अर्थशास्त्रात त्यांना अन्य दोघांसह एकत्रितपणे नोबेल घोषित झाले. गणितातील अनेकांना अर्थशास्त्रात नॅशला नोबेल कसे मिळाले तर अर्थशास्त्रातील काहींना या गणितज्ञास अर्थशास्त्रात नोबेल का दिले असा प्रश्न पडला होता. येथे एक गमतीदार गोष्ट सांगता येईल. नोबेल प्राईझ देणाऱ्या कमिटीला प्रश्न पडला होता की प्रत्यक्ष पारितोषिक स्वीकारताना नॅश सामान्यपणे व्यवहार करतील की नाही ? ते परंपरेप्रमाणे अभिवादन करणे, छोटेखानी भाषण देणे करू शकतील की नाही ? अर्थात त्यांचीही शंका शंकाच राहिली. नॅशने सर्व प्रथा पूर्णपणे पाळल्यात. नॅश यांचा मानसिक

आजार वंशपरंपरा तर नाही ना ? कारण त्यांच्या मुलालाही हा आजार असून नॅश पतिपत्नी त्यांची देखभाल करीत होत्या. त्याचे आजारपण, अपघातात झालेल निधन, मुलालाही झालेला तसलाच आजार पाहता त्यांचे जीवन ग्रीक ट्रॅजिडी तर नाही ना ?

**३) अर्थशास्त्रातील कामगिरी :**

अर्थशास्त्रात खेळ सिद्धांताची कल्पना प्रथमत: अंदाजे ७० वर्षापूर्वी जॉन न्युमन यांनी वापरली होती. या सिद्धांतात विविध संस्था, व्यक्ती, कंपन्या किंवा देश विशिष्ट स्थितीत परस्परांशी कसे वागतील, कसे निर्णय घेतील, कोणत्या योजना आखतील याचा अभ्यास केला जातो. खेळ वा गेम ही शास्त्रीय गणिती संकल्पना आहे. दोन किंवा अधिक व्यक्ती/संस्था एकत्र येऊन परस्परांत कसे वागायचे वा कोणते निर्णय घ्यायचे किंवा कोणती व्यूहरचना आखायची याबाबत जी योजना आखतात त्याला खेळ म्हणतात. यात भाग घेणाऱ्यांना खेळाडू वा Players म्हणतात. खेळाडूच्या प्रत्येक चालीस Move म्हणतात तसेच प्रत्येकास आपली व्यूहरचना ठरविण्याचे स्वातंत्र असते विशिष्ट योजना किंवा व्यूहरचना आखून खेळाडूस किती फायदा होईल हे स्पष्ट केले जाते.

जेव्हा कोणताही खेळाडू स्वत: चा फायदा वाढवू शकत नाही. (दुसऱ्या खेळाडूच्या व्यूहरचनेबाबत) तेव्हा झालेल्या संतुलन अवस्थेला नॅश संतुलन (Nash Equilibrium ) म्हटले जाते. या संतुलनास अभ्यासक सहकार संतुलनही म्हणतात. प्रत्येक खेळाडू हा दुसऱ्या खेळाडूचा वा समाजाच्या कल्याणाचा विचार न करता स्वत:पुरती, स्वत:ला फायदेशीर व्यूहरचना वापरतो. थोड्याशा स्पष्टीकरणाने ही कल्पना स्पष्ट करता येईल. A पेढी वा firm समजा ती पेढी जी व्यूहरचना वापरते तिला $P_A$ म्हणता येईल तर B पेढी जी व्यूहरचना वापरेल तिला $P_B$ म्हणू. जर A पेढी आपल्या व्यूहरचनेवर ($P_A$) ठाम असेल तसेच B पेढी ही देखील स्वत:च्या व्यूहरचनेवर ($P_B$) कायम असेल तर या संतुलनास नॅश संतुलन म्हणता येईल. म्हणजे प्रतिपक्षाने स्वीकारलेल्या व्यूहरचनेमुळे संबंधित पेढीच्या फायद्यात वाढ होणार नाही. ज्यावेळी खेळात खेळाडू दोनापेक्षा जास्त होतील. तेव्हा हे गणित बरेच क्लिष्ट होत जाईल हे नक्की.

खेळ सिद्धांताचे दोन मुख्य प्रकार सांगता येतात. पहिल्या प्रकाराला सिक्वेन्शियल गेम म्हणतात तर दुसऱ्या प्रकाराला सायमलटेनियस गेम. बुद्धिबळाचा खेळ हा पहिल्या प्रकारचे उदाहरण आहे जर अ आणि ब राष्ट्रांपैकी अ ने ब राष्ट्रावर हल्ला केला तर ब राष्ट्राला स्वतंत्र व्यूहरचना वापरता येईल. त्यानंतर पुन्हा अ ला वेगळी व्यूहरचना वापरता येईल. जर त्यांच्या लक्षात आले की आता दुसरी कोणतीही व्यूहरचना वापरून आपला अधिक फायदा होणार नाही तर तेथे नॅश संतुलन झाले. गेम थियरीच्या दुसऱ्या प्रकारात सर्वच खेळाडू एकाचवेळी आपली चाल सुरू करतात. त्यांना दुसऱ्यांच्या व्यूहरचनेची कल्पना नसते. जर नॅश संतुलन होणार असेल तर सर्व खेळाडूंना सर्वाचा फायदा अधिक होईल अशी नीती कोणताही खेळाडू आखू शकणार नाही.

खोळ सिध्दांताचा प्रभाव अर्थशास्त्र, युध्दशास्त्र, जाहिरात जग, विमा उद्योग, मानसशास्त्र इ. अनेक क्षेत्रांवर पडला आहे. अर्थशास्त्रात असे मानले जाते की अनेक नव्या उद्योगांमध्ये अल्पाधिकारी (Oligopoly) स्थिती असते. म्हणजे मूठभर उत्पादक असतात. यांना स्पर्धेक कंपन्या

म्हणतात. त्यांनी भांडण्यापेक्षा सहकार्यावर भर दिला व त्याव्दारे नॅश संतुलनाची कास धरली तर त्याचा फायदा कंपन्यांना व ग्राहकांनाही होऊ शकतो. म्हणजे खेळ सिध्दांताने व्यापारातील स्पर्धा किंवा शस्त्रात्रे खरेदीतील स्पर्धा याचे धोके सांगून सहकार्यावर भर दिला आहे. मुक्त व्यापाराचे धोरण स्वीकारुन जर अ आणि ब या दोन देशांनी सहकार्यावर आधारित संतुलन स्वीकारले (आयातीवरील कर रद्द केले) तर या व्यूहरचनेमुळे दोघांचाही फायदा होऊ शकतो. पण धूर्तपणे त्यांनी जर आयात मालावर नियंत्रणे आणली म्हणजे नॅश संतुलनापासून ते दूर गेलेत तर दोनही देशांचे हितावर प्रतिकूल परिणाम होईल. दोना किंवा अधिक देश खेळ सिध्दांताचा वापर करुन सर्वांसाठी फायदेशीर धोरण ठरवू शकतील. प्रत्यक्षात या सिद्धांताचा देशांनी वापर केला का याचे विश्लेषण झाले पाहिजे.

**४) उपसंहार :**

विसाव्या शतकातील अत्यंत जिनियस असणाऱ्या जॉन नॅश या गणितज्ञाचे जीवन व कार्य याचा अभ्यास अधिक काळजीपूर्वक केला पाहिजे. अर्थशास्त्रातील सैध्दान्तिक प्रश्नांमधील अडचणी खेळ सिध्दान्ताव्दारे सोडविल्या जाऊ शकतात म्हणून अर्थशास्त्राच्या अभ्यासकांनी नॅशचे ऋण मान्य केले पाहिजेत. त्याला जो मानसिक आजार झाला होता त्यामुळे सर्वच विषयांच्या अभ्यासकांना त्यांच्याविषयी कणव वाटणे स्वाभाविक आहे. नॅशला असा भास होई की त्याला अंतराळातून काही आदेश–सूचना येतात. परग्रहावरची माणसे आपल्याला त्रास देतात असे तो म्हणे. वास्तविक तो प्रखर बुद्धिमत्तेचा गणितज्ञ होता. पण आजाराने त्याचे व्यक्तिमत्त्व दुभंगले. एक दोन वर्षे नाही तर तब्बल २२–२३ वर्षे. मात्र साठी ओलांडल्यावर तो मानसिक दृष्ट्या स्थिर झाला. औषधोपचारांमुळे तो बरा झाला पण तो पूर्वीसारखा होऊ शकला नाही. म्हणूनच सुरवातीस त्याला शापीत गंधर्वाची उपमा दिली आहे. अर्थशास्त्र व गणितात त्याने आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर अढळ स्थान प्राप्त केले आहे.

◆◆◆

# स्त्री सक्षमीकरणाचे स्वरूप व अर्थव्यवस्थेतील भूमिका

**वर्षा गंगणे**
सहयोगी प्राध्यापिका, अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
एम. बी. पटेल महाविद्यालय,देवरी, जि. गोंदिया

**१) प्रस्तावना :**

महासत्ता होण्याच्या वाटेवर चालणाऱ्या भारत देशाला स्त्रीसक्षमीकरण्याची नव्याने गरज वाटावी हाच मुळात चिंतेचा विषय आहे. स्त्री सक्षमीकरणाचा स्वतंत्रपणे विचार करावा लागणे हे स्त्रियांचे दुय्यमत्व सिद्ध करण्यास पुरेसे आहे.

*लेकीचा गं जन्म घातला कुण्या येडयानं*
*माझे गं सखी बाई बैल राबतो भाडयानं*

'विद्या व्यवहारे' लिखीत स्त्रीविषयक वास्तव मांडणाऱ्या या ओळी स्त्रियांची स्थिती स्पष्ट करण्यास पुरेशा बोलक्या आहेत.

स्त्रीसक्षमीकरणाचा मुद्दा केवळ भारतापुरता सिमित नाही कारण आज प्रगत म्हणविणाऱ्या व आर्थिक भरारीचे बळ गाठणाऱ्या देशातील स्त्रियांनाही आपल्या आस्तित्वासाठी व हक्कांसाठी लढा पुकारावा लागला होता. ज्याचे पडसाद संपूर्ण जगावर उमटले व स्त्रीशक्तीला एक नवी दिशा मिळाली. ज्याचे रूपांतर हळूहळू स्त्रीसक्षमीकरण, स्त्रीसशक्तीकरण, स्त्रीवाद, स्त्री-पुरूष समानता, यासारख्या मुद्दयांमध्ये झाले. ८ मार्च हा महिला दिन घोषित झाला व समस्त स्त्रियांचे प्रश्न व्यासपीठावरून बोलले जाऊ लागले.

जागतिक पातळीवर स्त्रीसक्षमीकरणाची वाटचाल सुरू झाली कारण स्त्रियांच्या दुय्यमतेचा प्रश्न हा जवळ-जवळ सर्वच देशांतील स्त्रियांचा प्रश्न होता. स्त्रीविषयक समस्या व अडचणीचा प्रश्न सोडविण्यासाठी जागतिक परिषदांचे आयोजन करण्यात आले. त्यातून स्त्रियांच्या अनेक प्रश्नांवर चर्चा करून त्यावर विचारमंथन करण्यात येऊ लागले.

**जागतिक परिषद व उद्देश**

| क्र. | जागतिक परिषद | साल | स्थान | उद्देश |
|---|---|---|---|---|
| १. | पहिली जागतिक परिषद | १९७५ | मेक्सिको | विकास, शांतता व समता |
| २. | दुसरी जागतिक परिषद | १९८५ | नैरोबी | स्त्रियांचा आवाज उंचावणे |
| ३. | तिसरी जागतिक परिषद | १९८५ | कोपेनहेग | लैंगिक शोषण, घर कामास वेतन देणे. स्त्री अभ्यास |
| ४. | चौथी जागतिक परिषद | १९९५ | बीजींग | जगातील सर्व प्रश्न स्त्रियांचे (जागतिकीकरणाचा परिणाम) |

वरील परिषदांचा आढावा घेतल्यास स्त्रियांच्या विविध समस्या व प्रश्नांवर प्रकाश टाकण्यास सुरूवात झाली असे म्हणता येईल.

भारतात १९४५ ते १९७५ या काळात स्त्रियांचा लढा तिच्या आस्तित्वासाठी होता. स्वत:ची स्वतंत्र ओळख निर्माण करण्यासाठी तिची धडपड सुरू होती. मी कोण ? माझे अधिकार कोणते ? याची चर्चा व जाणिव यातून स्त्रीवादी चळवळी वाढू लागल्या. त्यातून भगिनी भावाची संकल्पना पुढे आली. स्त्री घटक म्हणून त्यांचे संघर्ष एकाच पातळीवरचे असू शकतात. त्यात आर्थिकतेचा मुद्दा सर्वात प्रबळ आहे हे सत्य लक्षात आले व इथूनच स्त्री सक्षमीकरणाची सुरूवात झाली. व्यक्तीगत ते राजकीय हा स्त्रीस्वतंत्र्याचा प्रवास सुरू झाला. राजकारणात प्रवेश केल्याविशाय, पद मिळविल्याशिवाय स्त्रीसुधारणा विषयक कायदे व अधिकार अंमलात आणता येणार नाही ही भावना वाढीस लागली व त्यातून स्त्रीकार्यकर्त्या तयार होण्याचा कार्यक्रम सुरू झाला.

**स्त्रीसक्षमीकरण म्हणजे काय ?**

स्त्रीसक्षमीकरण ही व्यापक संकल्पना असून ती जाणीवपूर्वक घडवून आणण्याची प्रक्रिया होय, वैचारिक सक्षमतेच्या अभावी स्त्रीला दुर्बल घटक ठरविले गेले.

**व्याख्या :**

१. स्त्रीव्यक्तीमत्व विकासात समान संधी देणे म्हणजे स्त्रीसक्षमीकरण
२. स्त्रियांना सक्षम व सुदृढ बनवून तिला सर्वांगिण विकासाची संधी मिळवून देणे म्हणजे स्त्रीसक्षमीकरण होय.
३. स्त्रियांमध्ये सकारात्मक मानसिकता विकसित करणे म्हणजे स्त्री सक्षमीकरण होय.
४. स्त्रियांच्या निर्णय क्षमतेत वाढ करून तीला माणूस म्हणून जगण्याचे अधिकार बहाल करणे म्हणजे स्त्रीसक्षमीकरण होय.

घरात आणि घराबाहेर स्वत:च्या जीवनावर स्त्रीचे पूर्ण नियंत्रण असणे हा अर्थ स्त्रीसक्षमीकरणात अभिप्रेत असतो. स्त्रीचे कर्तेपण हिरावले जाणार नाही तसेच ती प्रक्रिया कोणत्या दिशेने, कोणत्या माध्यमातून कीती वेगाने व्हावी, तिचे अग्रक्रम काय असतील ? याचे निर्णय स्त्री करेल. वर्ग, जात, वंशभेद, भाषा, ग्रामिण-शहरी भेद, दुष्काळ, सुकाळ, अल्पसंख्य या व अशातऱ्हेच्या भेदांमूळे स्त्री सबल, सक्षम होण्यापासून वंचित अथवा या घटकांच्या प्रतिकूलतेची शिकार म्हणून ती दुर्बल, सामर्थ्यहिन राहत असेल तर सक्षमीकरणासाठी संरचना, समस्या व सामाजिक अभिसरणाची प्रणाली यांचेच सबलीकरण करावे लागेल असे ठामपणे म्हणता येईल.

**भारतीय अर्थव्यवस्थेत स्त्रीसक्षमीकरणाची भूमिका :**

भारताच्या एकूण लोकसंख्येचा जवळ-जवळ ५० प्रतिशत वाटा स्त्रियांचा असायला हवा. अर्थात पुरूषांच्या बरोबरीत आहे. तरी देखील स्त्रियांचे सक्षमीकरण हा गंभीर होत जाणारा प्रश्न व्हावा ही विसंगतीच म्हणावी लागेल. भारताच्या अर्थव्यवस्थेच्या योग्य विकासासाठी स्त्री-सक्षमीकरणाची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण आहे. अर्थव्यवस्थेच्या विभिन्न क्षेत्रात स्त्रिया मोठया संख्येने व सक्षमपणे कार्य करतांना दिसून येतात. काही क्षेत्रात तर स्त्रियांच्या कार्याचा वाटा पुरूषांच्या कार्यापेक्षा अधिक आहे. ज्यामूळे एकूण उत्पन्नात

पडणाऱ्या भरीचे श्रेय स्त्रियांनाच अधिक दयावे लागेल. अर्थव्यवस्थेतील काही ठळक क्षेत्रे आणि त्यातील स्त्रियांची भूमिका यावरून हे स्पष्ट करता येईल.

**१.कृषीक्षेत्र :**

भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असणाऱ्या कृषी क्षेत्रात आजही ५४ प्रतिशत लोकसंख्या कार्य करते. कृषी क्षेत्रात मोठया प्रमाणात स्त्रिया कार्य करतात. शेतीची अनेक कामे स्त्रिया करतात. ज्यात पेरणी, निंदण, कापणी. कापूस वेचणे, चहाची पाने तोडणे, सोयाबीन निसणे, खुरपणी करणे, भाजीपाला लागवड करणे इ. एकूण कृषीकार्यात ७० प्रतिशत कार्याचा भार स्त्रियांद्वारे उचलला जातो. त्यामूळे शेतीक्षेत्र, वनउत्पादन विषयक कार्य जे शेतीशी संलग्न करण्यात आले आहे. त्यात स्त्रियांचा वाटा अधिक आहे. त्यामूळे स्त्रियांचे सक्षमीकरण म्हणजे कृषीचे सक्षमीकरण हे नविन घोषवाक्य (Slogan) तयार झाले आहे. स्त्रियांचा विकास झाल्यास कृषीक्षेत्रातील उत्पादन व उत्पनात वाढ होण्यास मदत होईल. कृषीक्षेत्रातून स्त्री वर्ग वजा केल्यास कृषी व्यवस्था कोलमडून पडेल.

**२. औद्योगिक क्षेत्र :**

देशाच्या आर्थिक विकासात औद्योगिक क्षेत्राचे महत्व अनन्यसाधारण आहे. स्त्रियांच्या औद्योगिक क्षेत्रातील भूमिकेचा विचार करतांना लघुउद्योग, कुटिरउद्योग व स्वयंरोजगाराचा विचार करणे अनिवार्य आहे.

आज देशात २५ लाखांपेक्षा अधिक निर्माणी महिला चालवित आहेत. २००४-०५ या वर्षात देशातील एकूण लहान व मध्यम उद्योगांमध्ये १०.११ प्रतिशत उद्योग स्त्रिया चालवित होत्या पण २००५-०६ साली हे प्रमाण कमी होउन ९.४६ प्रतिशत झाले. मोठमोठया कंपन्यांमध्ये उद्योगविषयक निर्णय घेण्यात १४ प्रतिशत स्त्रियांचा समावेश आहे. विविध सर्वेक्षणांनूसार पुरूषांच्या तुलनेत स्त्रिया योग्य निर्णय घेतात ज्याचा उद्योगाच्या विकासावर पुरोगामी परिणाम होतो. उद्योगांच्या माध्यमातून स्त्रियांना रोजगाराच्या विविध संधी मिळतात. प्रक्रिया उद्योगात स्त्रियांचा वाटा फार मोठा आहे. त्यातून उद्योगांचा विकास होतो, पर्यायाने स्त्रियांच्या व देशाच्या विकासात भर पडते. जलद आर्थिक विकास हा जलद औद्योगिकरणावर अवलंबून असतो. त्यामूळे अधिकाअधिक स्त्रीघटकांच्या मदतीने औद्योगिक विकास घडवून आणण्याचे प्रयत्न होणे गरजेचे आहे.

**३.अधिकोषण क्षेत्र :**

अधिकोषण क्षेत्रात स्त्रियांना कामाच्या अनेक संधी आहेत. अनेक स्त्रिया अधिकोषात उच्च पदांवर कार्यरत आहेत. ग्रामिण क्षेत्रात बचतगट व स्वयंसहायता गटाच्या माध्यमातून अनेक स्त्रिया अधिकोषांच्या संपर्कात आल्या आहेत. ज्यामूळे त्यांना अधिकोषांविषयी ज्ञान व माहिती मिळते. कर्ज विषयक माहिती, बचतविषयक माहिती, बचतींचे स्वरूप व फायदे इत्यादी मुळे आर्थिक व्यवहार करणे सुलभ होते. अधिकोषण क्षेत्रातील महत्वाचे निर्णय घेण्याची पात्रता व कार्यकुशलता स्त्रियांमध्ये असल्यामुळे व तिला या क्षेत्रात संधी मिळाल्यामुळे या क्षेत्रात मोठया प्रमाणात स्त्रिया येऊ लागल्या आहेत व त्यांची सक्षमीकरणाच्या दिशेने वाटचाल सुरू झाली आहे.

**४. तांत्रिक क्षेत्र :**

मानसिकदृष्टया स्त्री हा सक्षम घटक आहे हे वारंवार सिद्ध झाल्यामूळे ते सर्वमान्य झाले आहे.

त्यामूळे तांत्रिक क्षेत्रातील सर्व कार्ये ती सहजपणे हाताळू शकते हे सत्य मान्य करावे लागते. या क्षेत्रात ती अधिक पुढे जाऊ शकते. संगणक ते रडार या विविध प्रांतात ती आपल्या कार्यांचे ठसे उमटवित आहे. पण सामाजिक चौकटीच्या बंधनात तिला बांधून ठेवण्याचे प्रयत्न अजूनही सातत्याने सुरू आहेत.

पण, काळ बदलला तसा "Quality is our culture" ही संकल्पना आता रूढ झाली आहे. माहिती तंत्रज्ञानाची युक्ती ही या काळाची शक्ती आहे. इंटरनेटच्या वापरात स्त्रियांची संख्या झपाटयाने वाढते आहे. व्यावसायिक प्रशिक्षण क्षेत्रात, इलेक्ट्रीकल्स, इलेक्ट्रॉनिक्स, संगणक या क्षेत्रात मुलींच्या शिक्षणाचे व प्रवेशाचे प्रमाण अधिक आहे. जी सक्षमीकरणाची नांदी आहे. भारताला जागतिक पातळीवर, उच्च स्तरावर नेण्याचे स्वप्न तांत्रिक क्षेत्रातील स्त्रियांच्या वाढत्या सहभागामूळे साकार होईल.

**५. वैज्ञानिक क्षेत्र :**

विविध संशोधन व अध्ययन क्षेत्रात स्त्रियांचे वाढते प्रमाण प्रगतीच्या दृष्टीने महत्वाचे असते वैज्ञानिकतेची कास धरण्यात स्त्रियांचा सहभाग अत्यंत महत्वाचा ठरतो त्यादृष्टीने अनेक स्त्रियांची कार्ये उल्लेखनीय आहेत, जसे अंतराळात गेलेली कल्पना चावला, एवरेस्ट सर करणारी बचेंद्री पाल व विविध क्षेत्रात संशोधन करणाऱ्या अनेक नामवंत स्त्रिया, यांच्या कार्यामुळे व अथक प्रयासामुळे खऱ्या अर्थाने स्त्रियांचे सक्षमीकरण होण्यास प्रेरणा मिळते.

सेवाक्षेत्रात स्त्रियांचा वापर वाढल्यास सक्षमीकरणाचे उद्देश साध्य करणे सहज साध्य होईल त्यासाठी वैज्ञानिक दृष्टीकोनात आपोआप वाढ होईल. आज सेवाक्षेत्रातील उद्योगांचे प्रमाण ४९ प्रतिशत आहे ज्यात स्त्रियांना भरपूर, संधी आहे त्याचा फायदा घेणे ही काळाची गरज आहे. स्त्रियांना प्रेरित केल्यास व संधी मिळाल्यास नवनवीन संशोधन करून वैज्ञानिक दृष्टीकोन स्विकारणे व स्विकारण्यास भाग पाडणे हे कार्य स्त्रिया सहजपणे करू शकतात. पण अजूनही या क्षेत्रात स्त्रियांचे प्रमाण पाहिजे तेवढे नाही. एकूण स्त्रियांपैकी केवळ १२ प्रतिशत स्त्रिया या क्षेत्राशी संबंधित आहेत.

**६. सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्र :**

स्त्री सक्षमीकरण व समाजकारण यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे. सामाजिक संस्कार वातावरण, कौटुंबिक स्थिती यावर स्त्रीव्यक्तीमत्वाची जडणघडण अवलंबून असते. आपल्या पुढच्या पिढीला स्त्रीविषयक समानता, सक्षमता व प्रगत बनविण्यासाठी महत्वपूर्ण भूमिका स्त्रियांनाच पार पाडावी लागते. हे संस्कार बालपणा पासून करणे महत्वाचे असते. घरात पुरूषी वर्चस्व कमी करणे, रूढी व वाईट परंपरांचे उच्चाटन करणे, स्वत:च्या अधिकारांसाठी झगडणे इ. यातूनच स्त्रियांच्या समक्षीमरणाची बीजे पेरली जातात.

सामाजिकता व विचारसरणी बदल्ल्यास स्त्रियांचे सक्षमीकरण व देशाचां आर्थिक विकास झपाटयाने होणे शक्य आहे. नारी तूच नारायणी ! तुझ्या जीवनाची  शिल्पकारीणी !! हे वाक्य खरे केल्यास सक्षमीकरण खऱ्या अर्थाने यशस्वी होऊ शकेल.

**७. राजकीय क्षेत्र :**

अर्थकारण व राजकारण या हल्ली एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. राजकीय क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग मोठया प्रमाणात वाढल्याशिवाय

स्त्रियांच्या समर्थनार्थ कायदे व अधिकार येणार नाहीत. त्यांच्या समस्यांचा विचार होणार नाही. त्यामूळे राजकारणात स्त्रियांचा सहभाग वाढणे म्हणजे स्त्रीसक्षमीकरणाची बाजू भक्कम करणे होय. राजकारणासाठी ३३ ते ५० प्रतिशत हा आरक्षणाचा प्रवास स्त्रियांनी केला पण यातील यशस्वी स्त्रियांचे प्रमाण अत्यंत कमी आहे. काही नावे वगळल्यास, अनेक स्त्रियांना निवडणूकीचे तिकीट तर दिले जाते पण शासनात संधी दिली जात नाही. निवडून येणाऱ्या बहुसंख्य स्त्रिया ग्रामीण क्षेत्रात लहान–लहान पदांवर काम करतात, ते देखील रबरस्टँपच्या स्वरूपात. कारण कारभार त्यांचे पुरूष चालवितात हे वास्तव असल्यामुळे राजकारणात स्त्री सक्षम होणे महत्वाचे आहे. यासाठी स्त्रियांच्या निर्णय क्षमतेत व जागरूकतेत वाढ होणे गरजेचे आहे.

मागील ६० वर्षांचा आढावा घेतल्यास केवळ १३३ स्त्रिया आमदार बनल्या, १९५२ मध्ये महिला उमेदवारांची संख्या केवळ ४ होती. २००८ मध्ये ती १५४ तर २०१४ मध्ये ती २२३ पर्यंत झाली. या संख्येत मोठी वाढ होणे म्हणजे सक्षमीकरणाची वाट चालणे होय. असे म्हणता येईल. नविन सरकारकडून अशी अपेक्षा करता येईल.

**स्त्रीसक्षमीकरण आणि भारत :**

२०११ च्या जनगणनेनुसार भारतात १००० : ९१७ इतके मुलींचे प्रमाण आहे. यावरून स्त्रियांचे घसरलेले स्थान व कमी झालेले महत्व स्पष्ट होते. भारतात स्त्रियांच्या प्रगतीत प्रमुख तीन अडथळे दिसून येतात. १) लिंगभेद २) वर्णभेद ३) शहरी व ग्रामीण भेद. राजकीय नाकर्तेपणा व जागरूकतेचा अभाव यामुळे स्त्रीघटक अजूनही दुय्यम व उपेक्षित आहे. परंपरांचा पगडा असलेली पुरूषप्रधान संस्कृती स्त्रियांचे नेतृत्व स्विकारते पण त्यांना योग्य स्थान ग्रहण करण्यास विरोध करते.

माओच्या मते, संस्कारांचा पगडा दूर करणे अत्यंत अवघड असते त्यासाठी आटोकाट प्रयत्न सातत्याने करावे लागतात. राजीव गांधींनी ३३ प्रतिशत आरक्षणाचा मुद्दा लावून धरला. त्यास यशही आले पण पाहिजे त्या प्रमाणात नाही.

वर्तमानकाळात तर भारतीय संस्कृतीला विकृतीचे ग्रहण लागले आहे. एकीकडे स्त्रीसक्षमीकरणाच्या वाटेवर चालण्यासाठी स्त्रिया बाहेर पडल्या आहेत. तर दुसरीकडे तिच्या, सुरक्षेलाच नख लावण्याचा प्रयत्न विकृत पुरूषवर्गाने केला आहे. स्त्रीभृणहत्या, बलात्कार, अपहरण, गर्भलिंग चाचणी या सारख्या घटना घडतात. स्वातंत्र्याच्या ६५ वर्षानंतरही ४० लाख स्त्रिया रोज पुरूषी हिंसाचाराच्या कोणत्या ना कोणत्या स्वरूपात बळी ठरतात. स्त्रियांच्या हिंसाचाराबाबत काही आकडेवारी याप्रमाणे.

- ११ नोव्हेंबर २०१४ च्या एका सर्वेक्षणानुसार भारतात १० पैकी ६ पुरूषाकडून पत्नीचा छळ होतो कारण लिंगभेद विषमता आणि आर्थिक अडचण.
- UNO च्या लोकसंख्या / निधी विभाग आणि वॉशिंग्टन स्थित आंर्तराष्ट्रीय महिला संशोधन केंद्राच्या संशोधनानूसार –

१. राज्यातील १८ ते ४९ या वयोगटातील तब्बल ९.२०५ पुरूष आपल्या पत्नीचे धाडस, जाच आणि मुलांचे भवितव्य याबद्दल डोळसपणे विचार करतात.

२. ओरिसा आणि उत्तर प्रदेशात सर्वाधिक कौटुंबिक हिंसा घडली आहे.

३. ७० प्रतिशत पुरूष पत्नीला मारहाण करतात. ३,१५८ महिलांकडून माहिती गोळा केली असता ५२ प्रतिशत स्त्रियांनी छळ होत असल्याचे मान्य केले.

* २०१३ साली महिलांविरोधी ३८ प्रतिशत गुन्हे घडले असे राष्ट्रीय गुन्हे तपशील विभागाच्या सर्वेक्षणावरून स्पष्ट झाले आहे.
* NCRB च्या मते देशातील एकूण ३० लक्ष ९ हजार ५४६ पैकी ११ लाख, ८ हजार ६६० महिलांसोबत क्रूर अत्याचार झाल्याचे म्हटले आहे.
* २०१३ या वर्षात बालिकांवरील लैगिंक अत्याचारांचे सर्वाधिक गुन्हे दाखल झाले आहेत. सामूहिक बलात्कारांच्या संख्येत वाढ झाली आहे.

काही घटना स्त्रियांवरील अत्याचारांची परिसीमा गाठणाऱ्या आहेत जसे – १२ वर्षे एखादया स्त्रीला टिनाच्या झोपडीत कोंडून ठेवणे, राजस्थानातील जातपंचायतीने सुनावलेला निर्णय, या घटनांशिवाय अशा अनेक घटना आहेत ज्यांच्या नोंदी उपलब्ध नाहीत.

एकीकडे स्त्रियांची कतृत्वाची गगनभरारी तर दुसरीकडे तिची असुरक्षितता या दोन्ही बाबी विसंगत आहेत. तिचे पंख छाटण्याच्या प्रयत्नात पुरूषवर्ग आपले स्थान, मान व महत्व तर गमावून बसणार नाही ना ? हा नविनच प्रश्न निर्माण झाला आहे. ८ मार्च या महिला दिनी महिलांच्या अधिकारांसंबधी व्यासपीठावरून भाष्य करायचे व इतर दिवशी पुरूष प्रधान संस्कृतीला खतपाणी घालायचे हे अत्यंत विसंगत वर्तन होय.

सशक्त महिला हेच सशक्त समाजाचे लक्षण होय. भारतीयांची मानसिकता बदलल्यास, स्त्रियांनी निर्णयक्षम झाल्यास तसेच शासनाने लक्ष घातल्यास खऱ्या अर्थाने स्त्रीसक्षमीकरण होणे शक्य आहे पर्यायाने देशाच्या आर्थिक विकासाचे ! ज्या क्षणी स्त्रियां आर्थिकदृष्टया स्वावलंबी व स्वतंत्र होतील. त्या क्षणी देश सुदृढ व विकसीत झाला असे म्हणता येईल. माझ्या मते, ज्या देशातील स्त्री सुरक्षित तो देश सुरक्षित कारण देश घडविण्याची, वाचविण्याची व पुढे नेण्याची क्षमता स्त्रियाशिवाय इतर घटकांत नाही.

**संदर्भ सूची :**


१. महिला विश्व – एन. के. मिश्रा, रमा शर्मा, देसाईगंज, नई दिल्ली.
२. महिला सक्षमीकरण – एन. के. मिश्रा, रमा शर्मा, देसाईगंज, नई दिल्ली.
३. आम्ही उद्योजिका – त्रैमासिक – मार्च, में – २०१४, सांगली.
४. दै–लोकमत, पूण्य नगरी, राज्यनिहाय अहवाल, २०१३
५. जनगणना अहवाल – २०११


◆◆◆

ISSN 2320-0197

# केळकर समिती अहवाल : प्रादेशिक विकासाचा मार्गदर्शक दस्तऐवज

**विनायक श्रीधर देशपांडे**
सदस्य-उच्चस्तरीय/केळकर समिती
प्राध्यापक व विभाग प्रमुख/संचालक
व्यवसाय व्यवस्थापन विभाग,रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

राज्यातील असमान विकास आणि तो दूर करण्यासाठी महाराष्ट्र राज्य शासनाने वेळोवेळी केलेले प्रयत्न वाखाणण्यासारखे आहे. या प्रयत्नांना कितपत यश प्राप्त झाले हा मात्र वादाचा मुद्दा राहीला आहे. समतोल विकास साध्य करण्यासाठी विकासाच्या खालच्या स्तरावर असणाऱ्या प्रदेशांना वर आणणे आणि हे होताना वरच्या स्तरावर असलेल्या प्रदेशांनी खाली झुकणे एवढेच खरे तर आवश्यक आहे असे समजल्या गेले. यात अनुस्यूत असलेला दृष्टिकोन संसाधन केंद्रित आहे. विकासाच्या गतिशील परिमाणांमध्ये अधिक वेगाने वृध्दिचे लक्ष्य गाठणाऱ्या प्रदेशांचा विकास थांबविणे शक्य नसते व तसे करु नये असा शास्त्रीय संकेत आहे. त्यामुळे केवळ राजकीय अपरिहार्यतेमुळे असमतोलाच्या प्रश्नावर विकास अडवा-विकास वाढवा या आक्रस्ताळी ओरडीने प्रादेशिक असमतोलही दूर झाला नाही व त्याचसोबत राज्याच्या एकूण आर्थिक संरचनांनाही समतोल विकासाचा फायदा झाला नाही. मुलत: राज्यातील सर्वच प्रदेशामध्ये वृध्दी दर साधण्यासाठी आवश्यक क्षमता समान नसल्याने प्रादेशिक असमानतेचा प्रश्न अधिकच गंभीर झाला आहे. राज्या राज्यातील असमतोल दूर करणे वित्त आयोगामार्फत शक्य आहे परंतु एकाच राज्यात असमतोल मर्यादे पलीकडे वाढत गेल्यास वेगळया राज्याची मागणी विविध संघटनांमार्फत करण्यात येते. वेगळे स्वतंत्र राज्य, छोटी राज्ये ही संकल्पना आता वास्तविकता होत चालली आहे. काही राज्यांचे विभाजन होऊन नवी राज्ये अस्तित्वात आल्याने विदर्भ राज्याची तशी जुनीच असलेली मागणी पुन्हा जोर धरु लागली. महाराष्ट्र शासनाने या मागणीला वेळोवेळी समित्यांचे गठन करुन प्रत्युत्तर दिले. मात्र या समितींचे अहवाल औपचारिकरित्या राज्य सरकारने स्वीकारले नाही, अहवालातील आकडेवारी आणि राजकीय दृष्टया उपयुक्त होतील अशा शिफारशी ध्यानात घेउन काही बाबतीत योजनांची आखणी केली. परंतु प्रादेशिक असमतोल कमी होण्यास याचा फारसा उपयोग झाला नाही. वाढत्या प्रादेशिक असमानतेच्या संदर्भात उपलब्ध असलेल्या विकास सिध्दांताची पुनर्तपासणी करणे आवश्यक आहे. विकास केंद्रांची स्थापना करुन या मार्फत इतर प्रदेशांचा विकास घडून येईल हे मानणे चुकीचे ठरत आहे. विकासाच्या सुरुवातीच्या टप्प्यात प्रादेशिक असमतोल, उत्पन्नाच्या संदर्भात वाढत जातो मात्र कालांतराने आंतरप्रादेशिक उत्पन्न विषमता कमी होते असे साधारणत: मानण्यात येते. विकासाच्या प्रक्रियेत निर्माण झालेल्या

असमतोलाच्या काही प्रवृत्तींचा –हास होउन आंतरप्रादेशिक असमानतेच्या रचनेचा उलट प्रवास सुरु होतो. विकासाच्या आंतरप्रादेशिक स्तरात अपसरणा(Divergence) ऐवजी अभिसरण (Convergence)होउन मागासलेले प्रदेश आणि आधिपासुनच उद्योगप्रधान असलेले क्षेत्र यांतील दरी कमी होते. परंतु प्रत्यक्षात विशेषत: महाराष्ट्र राज्याच्या बाबतीत हा सिध्दांत तंतोतंत लागू होत असल्याचे दिसत नाही. उत्पन्नाचे अभिसरण हे कल्पित असुन राज्याच्या विविध जिल्हयांमधील असमानता वाढत असून याचा परिणाम प्रादेशिक असमतोल वाढण्यावर झाला आहे. संतुलीत विकास साध्य करण्याच्या उद्देशाने शासनाने केलेल्या विविध उपायांची अंमलबजावणी योग्यरित्या होत नसल्याचे हे द्योतक आहे. कृषी क्षेत्राचा घटता दर आणि श्रम तसेच भांडवलाचे वृध्दिस्थलाकडे पलायन यामुळे उत्पन्नाचे अपसरणच अधिक झाले.(अनुराधा पटनाईक आणि विनायक देशपांडे २०१३)

**केळकर समिती पार्श्वभूमी:**

केळकर समितीचा अहवाल हा मुख्यत्वेकरुन समतोल प्रादेशिक विकासाशी संबंधित असून राज्यातील मागास प्रदेशांना विकासाचा मार्ग दाखविण्याचा प्रयत्न आहे. मराठवाडा आणि विदर्भातील जनआंदोलने, १९५३ चा नागपूर करार, १९८३ साली गठीत करण्यात आलेली दांडेकर समिती, १९८४ मध्ये पारित करण्यात आलेला प्रादेशिक वैधानिक विकास मंडळ स्थापनेचा ठराव आणि जवळपास दहा वर्षाने झालेली या ठरावाची अंमलबजावणी, १९९७ साली स्थापन करण्यात आलेली इंडिकेटर बॅकलॉग समिती आणि २०११ साली नेमलेली केळकर समिती या घटना विभागवार असंतुलन हा विषय किती संवेदनशील आणि महत्त्वपूर्ण आहे हे दर्शविणाऱ्या आहेत. त्यामुळे या विषयावर गंभीर चर्चा होणे स्वाभाविकच आहे.

**समितीची कार्यकक्षा :**

समतोल प्रादेशिक विकासाच्या समस्याचा आढावा घेण्यासाठी दिनांक ३१ मे २०११ रोजी तेराव्या वित आयोगाचे अध्यक्ष डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली १४ सदस्यांसह राज्य मंत्रीमंडळाच्या निर्णयानुसार उच्चस्तरीय समितीचे गठन करण्यात आले आणि या समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे दर्शविण्यात आली.

१. विकासातील क्षेत्रीय असमतोलाचा अंदाज घेण्यासाठी निर्देशके (indicators) ठरविणे.

२. वरील १ बाबत सन २०१० अखेर अगदी अलिकडे उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे महाराष्ट्राच्या सरासरी विकासाच्या संदर्भात असमतोल निश्चित करणे. हे करीत असतांना राज्य शासनाची थेट गुंतवणूक/ खर्च आणि राज्य व केंद्र शासनाच्या मदतीने खाजगी औद्योगिक क्षेत्रात झालेली गुंतवणूक याचा विचार करणे.

३. निश्चित केलेल्या निर्देशकांपैकी प्राधान्याने कोणत्या निर्देशकांबाबत वर कार्यवाही होऊ शकेल याची मर्यादा ठरविणे.

४. निश्चित होणारा असमतोल दूर करण्यासाठी उपाय योजना सूचविणे व त्या अनुषंगाने विकासात्मक निधीच्या आवंटनाचे सूत्र ठरविणे तसेच भविष्यात पुन्हा असमतोल निर्माण होउ नये म्हणून उपाय सूचविणे त्या अनुषंगाने वैधानिक विकास मंडळाच्या भूमिकेबाबत सूचना करणे.

५. समिती आपली कार्यपध्दती स्वत: ठरवेल.

**केळकर समितीच्या अहवालाचे वेगळेपण :**

केळकर समितीच्या कामाला जून २०११ पासून सुरुवात झाली आणि २०१३ मध्ये अभ्यासाअंती अहवाल सादर करण्यात आला. दांडेकर समितीच्या वेळेस असलेली आर्थिक/ सामाजिक परिस्थिती आणि केळकर समितीच्या वेळी असलेली परिस्थिती यात झालेल्या बदलांची दखल घेउन समतोल विकासाचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न या समिती मार्फत करण्यात आला. दांडेकरांच्या काळात खाजगीकरण, जागतिकीकरण किंवा जागतिक व्यापार संघटना या संदर्भातील धोरणे नव्हती तसेच वित्तीय पुरवठयाचा एकमेव स्त्रोत म्हणजे शासनाचा निधी होता. विकासाच्या संधी सर्व प्रदेशातील लोकांना मिळाव्यात, विकासाच्या प्रक्रियेत सर्वांचा सहभाग व योगदान असावे आणि विकासाचा फायदा सर्व क्षेत्राला मिळावा या अनुषंगाने निधीचा वाटप त्याचा योग्य विनियोग या संदर्भात समितीने मार्ग सुचविला आहे. केवळ अनुशेषावर लक्ष केंद्रीत न करता विकासाच्या विविध घटकांवर लक्ष्य देउन प्रादेशिक बलस्थाने ओळखण्यावर आणि त्यात सुधारणा घडवून आणण्यावर समितीने भर दिला आहे. मागास भागाच्या विकासात खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टिने सुशासन आणि व्यवसाय करण्यासाठी लागणा-या खर्चात जास्तीत जास्त कपात (Cost of Doing Business) या तत्त्वाचा अवलंब करण्याच्या संदर्भात समितीने शिफारस केली आहे. वैधानिक विकास मंडळे अधिक सक्षम होण्यासाठी आवश्यक संरचना समितीने सुचविली तसेच पाण्याचा ताण जाणवणारे तालुके आणि आदिवासी विभाग यांना स्वतंत्र स्थान देउन वेगळया निधीची तरतूद करावी अशी सूचना केळकर समितीने केली आहे. या समितीने प्रामुख्याने आठ क्षेत्रांवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे, यात प्रशासन, आदिवासी विकास, कृषी, औद्योगिकरण, पाणी, आरोग्य, शिक्षण आणि दळणवळण (connectivity) ही ती क्षेत्रे होय. या क्षेत्रांचा अभ्यास आर्थिक, सामाजिक तसेच राजकीय परिप्रेक्षातून केल्याने अहवालाचे स्वरूप सर्वसमावेशक आणि परिपूर्ण करण्याचा प्रयत्न झाला आहे यात शंका नाही. शहरीकरण, रोजगारनिर्मिती आणि पर्यावरण या विषयांना ज्या प्रमाणात न्याय देता आला असता तेवढया प्रमाणात देता आला नाही हे देखील नमूद करावेसे वाटते.

**कसा निर्धारित केला अनुशेष?**

मागासलेल्या प्रदेशांचा विकास प्रत्यक्षात कसा घडून येईल या बाबत गांभिर्याने विचार व्हावा अशी समितीची भूमिका होती.एका विकसित प्रदेशाचा विकास थांबवून दुसऱ्या मागासलेल्या प्रदेशाचा विकास घडवून आणणे विविध कारणांमुळे शक्य नसल्याने विकसित प्रदेशांच्या तुलनेत विदर्भ/ मराठवाडयाचा अनुशेष कायमचा दिसत राहील. अनुशेष ही कधीही न संपणारी प्रक्रिया असल्याने विकासातील दरी लक्षात घेउन ती दूर करण्यासाठी कोणत्या उपाययोजना करता येतील या बाबतच्या शिफारशी करण्याचा प्रयत्न समितीने केला आहे. अनुशेषासाठी विकासात्मक तूट असा शब्द प्रयोग समितीच्या अहवालात करण्यात आला. विकासात्मक घटकांची तूट काढण्यासाठी दळणवळण, शिक्षण व कौशल्य विकास, आरोग्य, कृषी पतपुरवठा, आणि वीज हे ५ घटक लक्षात

घेण्यात आले. तत्पूर्वी समितीने प्रादेशिक दरडोई उत्पन्न भिन्नतेचे प्रमाण तपासले, मागील दशकात उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाडयाचे दरडोई उत्पन्न ४० टक्कयापेक्षा कमी असून, विदर्भाचे दरडोई उत्पन्न २७ टक्क्याने कमी आहे. दरडोई उत्पन्नातील या तुटी चौदाव्या योजनेच्या अखेर पर्यंत म्हणजे साधारण २०२७ पर्यंत किमान एक तृतीयांशाने कमी करण्याच्या दृष्टिने समितीने शिफारशी केल्या आहेत. दळणवळण या घटकाची विकासात्मक तूट काढताना रेल्वे आणि रस्ते याबाबतची जिल्हानिहाय आकडेवारी संकलीत करण्यात येउन उत्तम रस्ते व रेल्वेचे जाळे असणाऱ्या उत्कृष्ट, टॉप ३ जिल्हयांच्या सरासरी मधून विभागाची सरासरी वजा केली असता ज्या प्रदेशाचा बाकी राहीलेला आकडा जास्त तो प्रदेश जास्त मागास किंवा तुटीचा असल्याचे मानण्यात आले. इतर घटकांसाठी देखील याच पध्दतीचा वापर करुन तफावत काढण्यात आली. दळणवळणाच्या संदर्भात विदर्भ सर्वात मागे असल्याचे निदर्शनास आले. विदर्भ ४३ टक्के, मराठवाडा ३१ टक्के तर उर्वरित महाराष्ट्र २६ टक्के या प्रमाणात दळणवळणाच्या संदर्भात विकास तुट असल्याचे आढळले. वीज उपलब्धतेच्या बाबतीत मराठवाडा हा प्रदेश सर्वात जास्त पिछाडलेला असून दळणवळणाच्या संदर्भात तशीच स्थिती विदर्भाची आहे. उपरोक्त नमूद केलेल्या पाचही घटकांना समान महत्व; भार देऊन विभागाचा विकासात्मक असमतोल काढल्यास उर्वरित महाराष्ट्र २४ टक्के, विदर्भ ३९ टक्के तर मराठवाडा ३७ टक्के येतो. विदर्भाची विकासातील तफावत सर्वात अधिक आहे.

**तक्ता क्र.१**

**विकासातील तफावत**

| i`.py | Hkkj | fonHkZ | ejkBokMk | moZfjr egkjk"V |
|---|---|---|---|---|
| laidZ lk@oGk@oGk | 0.20 | 0.43 | 0.31 | 0.26 |
| f'k{k.k o dkS'kY; fodkl | 0.20 | 0.36 | 0.38 | 0.25 |
| vkjksX; | 0.20 | 0.41 | 0.36 | 0.23 |
| dtZ miyC/krk | 0.20 | 0.36 | 0.37 | 0.27 |
| Ckh | 0.20 | 0.38 | 0.43 | 0.19 |
| fodkl kly rQkor | 1.00 | 0.39 | 0.37 | 0.24 |

स्त्रोत: महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नांवरील उच्चस्तरीय समितीचा अहवाल

पाण्याचा ताण मोजण्यासाठी समितीने पाण्याच्या संबंधि विविध पैलुंचा अभ्यास केला. पाणी धारण करण्यास सक्षम नसलेला प्रतिकुल असलेला कोकणाचा भाग, पाण्याचा अती वापर आणि अती टंचाईचे जिल्हे जसे नाशिक व पुणे, कमी पर्जन्यमान आणि टँकरच्या माध्यमाने पाणीपुरवठा होत असलेले औरंगाबाद आणि अमरावतीचे जिल्हे आणि खारपाणपट्टा असलेले विदर्भातील जिल्हे यांचा समावेश करण्यात आला. या व्यतिरिक्त सिंचन क्षमता निर्मित न झालेल्या

आणि सिंचनाचा अनुशेष असलेल्या राज्यातील विविध प्रदेशांचा आणि भूस्तर प्रतिकुल तालुक्यांचा देखील समावेश करण्यात आला. विकास साधण्यासाठी महाराष्ट्राचा खर्च १०० रुपये गृहीत धरुन प्रत्येक विभागाला तूट भरुन काढण्यासाठी किती निधीचे प्रमाण लागेल या आधारे पाणी तूट काढण्यात आली. १९८२-२०१० या प्रदीर्घ कालखंडामध्ये, उर्वरित महाराष्ट्रातील पुणे विभागामध्ये जलदगतीने सिंचनात वाढ झाली आहे. परंतु विशेषकरुन अमरावती विभागात तसेच औरंगाबाद व कोकण विभागांमध्ये सिंचनाची तूट कायम राहीली. १९६०ते ८२ या काळातील ओलीताखालील जमिनीचा वार्षिक वाढीचा दर हा जवळपास सारखा होता. तेंव्हा पासूनच मात्र तो उर्वरित महाराष्ट्राच्या विभागांमध्ये दोन दशकाहून अधिक काळ उच्चतर राहिलेला आहे.

**योजनाबद्ध संसाधनाचे वाटप :**

- अनुसूचीत जाती उपयोजना आणि आदिवासी उपयोजना या क्षेत्रासाठी राखुन ठेवलेले अनुक्रमे १०.२ टक्के आणि ८.८ टक्के संसाधनाचे वाटप वगळुन पुढील आठ वर्षाकरीता सर्वसाधारण क्षेत्र आणि जलक्षेत्रासाठी वाटप ७०:३० या प्रमाणात करण्यात यावे. जलक्षेत्रासाठी उपलब्ध तरतुदीतून ८.५ टक्के नियतव्यय हा पाणी टंचाईग्रस्त तालुके (४४) भूस्तर प्रतिकुल तालुके (८५), खारपाणपट्टा आणि माजी मालगुजारी तलाव या करीता प्राधान्याने राखुन ठेवणे.
- पाणी टंचाईग्रस्त तालुके, भूस्तर प्रतिकुल तालुके, माजी मालगुजारी तलाव आणि खारपाणपट्टा या करीता ५ वर्षाच्या कालावधीसाठी दरवर्षी ठराविक रक्कम उपलब्ध करुन देणे.
- जलसंधारण, कमांड एरिआ डेव्हलपमेंट आणि पाणी पुरवठा/स्वच्छता या कामासाठी जलक्षेत्रासाठीचे उर्वरित नियतव्यय वाटप ९१.५ टक्के उपलब्ध करणे.
- उपरोक्त मुद्दाच्या अनुषंगाने नियतव्ययाचे मंडळनिहाय प्रमाण विदर्भासाठी ३५.२६ टक्के, मराठवाडा २१.५९ टक्के आणि उर्वरित महाराष्ट्र ४३.१५ टक्के इतके राहील.
- सर्व प्रदेशांनी जलसंपदासाठी ५० टक्के, लाभक्षेत्र विकासासाठी ८ टक्के, जलसंधारणासाठी १० टक्के आणि पेयजल व स्वच्छतेसाठी १२ टक्के या प्रमाणे नियतव्यय वाटपाच्या किमान पातळीचे (Floor levels) पालन करणे आवश्यक राहील.
- अनुसूचीत जाती उपयोजना (SCSP), आदिवासी उपयोजना आणि जल या क्षेत्रांचा नियतव्यय वगळून सर्वसाधारण क्षेत्रांकरिता उपलब्ध होणाऱ्या नियतव्ययाची राज्यस्तरावर किमान ६० टक्के नियतव्यय विभाज्य ठेवून विभागणी करणे. विभाज्य नियतव्ययाचे मंडळ निहाय प्रमाण : विदर्भ-३०.७८ टक्के, मराठवाडा-२८.५१ टक्के आणि उर्वरित महाराष्ट्र-४०.७१ टक्के.
- समस्त स्तरावर जलक्षेत्रासह मंडळनिहाय नियतव्ययाची टक्केवारी विदर्भासाठी ३३.२४ टक्के, मराठवाडयासाठी २५.३१ टक्के आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी ४१.४५ टक्के इतकी येईल.
- प्रादेशिक विकास मंडळांनी समतोल विकास

साधण्याच्या दृष्टिने उपलब्ध होणाऱ्या प्रदेशनिहाय विभाज्य नियतव्ययामधुन जिल्हा नियोजन समितीस किमान ३० टक्के आणि तालुक्यांकरिता किमान ३० टक्के Floor level या प्रमाणात वाटप करण्याचे समितेने सुचविले आहे. विकेंद्रिकरण खऱ्या अर्थाने साध्य होण्यासाठी या संदर्भात देखील किमान रक्कम स्थानिक पातळीपर्यंत उपलब्ध व्हावी असे समितीला वाटले.

* संपर्क सुविधा/दळणवळण ज्यात रस्ते, रेल्वे, बंदरे आणि हवाई वाहतुकीचा समावेश होतो यासाठी किमान पातळी २० टक्के, कृषी व संलग्न सेवा-१५ टक्के, उर्जा-८ टक्के, सार्वजनिक आरोग्य-११ टक्के आणि शिक्षण-११ टक्के अशा रितीने या क्षेत्रांच्या राज्य सर्वसाधारण योजनेतील विभाज्य नियतव्ययातील किमान प्रमाणाबाबत प्रादेशिक स्तरावर दक्षता घेण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

**विश्लेषणाचे प्रघटक (युनिट) :**

गेली अनेक वर्षे अनुशेष/विकास तफावत काढण्यासाठी प्रघटक कोणता असावा यावर अनेक मतप्रवाह आणि मतभिन्नता आढळुन येते. केळकर समितीने या विषयावर गांभिर्याने चर्चा केली आणि विश्लेषणाचे प्राथमिक प्रघटक म्हणून जिल्हयाला पसंती दर्शविली आहे. शिक्षण,आरोग्य, दळणवळण, वीज, कर्ज उपलब्धता अशा निकषांचा अभ्यास करताना जिल्हावार माहितीचा आधार घेउन उपाययोजना सुचविल्या तर पाणी तूट काढताना पाण्याचा ताण असलेल्या ८५ तालुक्यांचा अभ्यास केला. सिंचन क्षमतेची परिस्थिती तपासतांना विभागनिहाय विश्लेषण करुन निष्कर्ष काढण्यात आले. कोणत्या स्तरावर कोणती माहिती उपलब्ध आहे याची पाहणी करुनच प्रघटकाबाबतचा निर्णय घेण्यात आला.

**प्रादेशिक वाटप पध्दत:**

कोणत्याही विशिष्ट वर्षात भविष्यात समितीने नियोजित खर्च रु. ६५,००० कोटी राहील असे गृहीत धरुन आदिवासी उपयोजना आणि अनुसूचित जाती उपयोजना यांच्यासाठी अनुक्रमे ८.९ टक्के आणि १०.२ टक्के इतकी लक्षात घेउन हे वाटप वजा करुन पुढील खर्च ३० टक्के जल क्षेत्र योजनेसाठी बाजूस काढून ठेवण्याबाबत शिफारस केली आहे. प्रादेशिक स्तरावरील जल क्षेत्र वाटप अनुक्रमे जलसाधनांचा विकास, लाभक्षेत्र विकास, जलसंधारण,भूजल सर्वेक्षण व विकास अभिकरण आणि स्वच्छता यांसहीत पेयजल या क्षेत्रांसाठी आहे. पाणी ही संवेदनशील बाब असून याला प्राधान्य देणे हे दूरदर्शीपणाचे लक्षण आहे असे समितीला वाटते. आदिवासी उपयोजना आणि अनुसूचित जाती उपयोजना यांसाठी राखुन ठेवण्यात आलेली रक्कम अनुक्रमे रु. ५७८५ कोटी आणि रु. ६६३० कोटी येईल. उरलेली रक्कम रु. ५२,५८५ कोटी प्रदेश निहाय वाटपासाठी उपलब्ध होईल. जलक्षेत्र योजनेसाठी ३० टक्केनुसार रु. ५२,५८५ इतकी उपलब्ध होईल. यांतील विदर्भाच्या वाटयाला रु. ५७८७ कोटी, मराठवाडा रु. २२८७ कोटी आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी रु. ६७०२ कोटी इतकी असेल. आदिवासी उपयोजना आणि अनुसूचित जाती उपयोजना तसेच पाणी या साठीची रक्कम वजा केल्यास राज्याच्या सर्वसाधारण योजनेसाठी रु. ३६,८१० कोटी राहतील. प्रादेशिक विभाजन

विभाज्य खर्च ६० टक्केच्या आधारे केल्यास विदर्भाचा वाटा रु. ६७९७ कोटीचा, मराठवाडा रु. ६२९७ कोटी आणि उर्वरित महाराष्ट्र रु. ८९९१ कोटी इतका येईल. याचाच अर्थ पाणी आणि इतर क्षेत्राचे वाटप लक्षात घेतल्यास समितीच्या सुत्रानुसार विदर्भाचा वाटा रु. १२५८४ कोटी, मराठवाडा रु. ९५८४ कोटी आणि उर्वरित महाराष्ट्र रु. १५६९३ कोटी राहील.

सामान्यत: विभाज्य आणि अविभाज्य घटकांत ६०:४० याप्रमाणात विभागणी करावी असे समितीने सुचविले आहे. ६० टक्के विभाज्य रक्कम ही किमानस्तर म्हणून प्रादेशिक वाटपासाठी लक्षात घ्यावी. प्रादेशिक स्तरावरील वाटणीसाठी लोकसंख्या, विकासातील तफावत, दरडोई उत्पन्न आणि क्षेत्र हे चार दर्शक वापरण्यात आले आहे. लोकसंख्या या दर्शकास ४५ टक्के, विकासातील तफावतीस २५ टक्के, दरडोई उत्पन्नास २० टक्के तर क्षेत्रफळास १० टक्के इतका भार (Weights) देउन मुंबई संगणेतून वगळुन वाटणीचे प्रमाण ठरविण्यात आले.

संसाधन वाटणीचे सूत्र सुचवितांना पाण्याचे दुर्भिक्ष असलेले तालुके यांच्या बाबतीत विशेष आव्हाने समोर असल्याने पाणी या क्षेत्राला वास्तवात्मक क्षेत्र समजुन विशेष तरतुदी समितीने सुचविल्या आहेत. ज्या तालुक्यांमध्ये पाण्याचे प्रमाण कमी आहे आणि ७५० मि.मि. पेक्षा कमी पाउस पडतो, ज्या तालुक्यामध्ये मागील १० वर्षाच्या कालावधीत कमीत कमी तीन वर्ष टँकरने पाणी पुरवठा करावा लागला, मागील १० वर्षाच्या कालावधीत किमान तीन वर्षात आणेवारी ५० पेक्षा कमी होती, ३० टक्क्या पेक्षा कमी सिंचन असलेले क्षेत्र होते हे निकष लावुन पाण्याचे दुर्भिक्ष असलेले तालुके निवडण्यात आले. सद्या राज्यात असे ४४ तालुके आहेत. भूस्तर प्रतिकुल तालुक्यांची संख्या ८५ आहे. या व्यतिरिक्त अमरावतीतील खारपाण पट्टा आणि माजी मालगुजारी तलाव हे चार निर्णायक महत्त्वपूर्ण क्षेत्रे संसाधनाच्या वाटणीचा विचार करताना समितीने लक्षात घेतले.

**प्रदेश निहाय वाटपाची पध्दत :**

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे राज्य योजनेचा आकार समजा रु. ६५,००० कोटी गृहीत धरल्यास त्याची विभागणी पुढील प्रमाणे होईल. अनुसूचीत जाती उपयोजनेसाठी १०.२ टक्के म्हणजेच रु. ६६३० कोटी; ६५,००० च्या १०.२ टक्के आणि आदिवासी उपयोजना या क्षेत्रासाठी राखुन ठेवलेले ८.८ टक्के याचे रकमेत रुपांतर केल्यास रु. ५७८५ कोटी येईल. अनुसूचीत जाती उपयोजना आणि आदिवासी उपयोजना यासाठी राखून ठेवण्यात आलेली रक्कम वजा केल्यास उरलेली रक्कम रु. ५२,५८५ कोटी येईल. या रकमेतुन जलक्षेत्रासाठी समितीने ३० टक्के किमान पातळी (Floor levels) सुचविली असल्याने रु.५२,५८५ कोटीच्या ३० टक्के रक्कम ( रु.१५,७७६ कोटी ) जलक्षेत्रासाठी वजा होउन उरलेली रु.३६८१० कोटी रक्कम विभाज्य आणि अविभाज्य या वर्गीकरणात जाईल. समितीने विभाज्य घटक ६० टक्के आणि अविभाज्य ४० टक्के सुचविला असून रु. ३६८१० कोटीच्या ६० टक्के म्हणजे रु. २२०८६ कोटी राज्यातील विविध प्रदेशांसाठी प्रत्यक्षपणे उपलब्ध होईल. अविभाज्य रक्कम राज्याच्या सुपूर्ण प्रदेशांसाठी उपल्बध राहील. प्रदेशांमध्ये निर्माण होणा-या भांडवली संपत्तीच्या परिरक्षणासाठी या रकमेचा उपयोग करण्यात येईल

तसेच या संपत्तीचा वापर राज्याच्या सर्वच भागातील लोक करु शकत असल्याने ही रक्कम कुठल्याही विशिष्ट प्रदेशासाठी वळती केली असे म्हणता येणार नाही. अर्थात या रकमेची विल्हेवाट कशी होते आहे यावर प्रदेशातील जनप्रतिनिधींनी लक्ष देणे आवश्यक राहील. उदाहरणादाखल विदर्भाला विभाज्य रकमेतुन किती रक्कम प्राप्त होईल हे थोडक्यात बघु.

**तक्ता क्र.२**

**विदर्भासाठी एकूण जल तुटीकरिता उपलब्ध रक्कम आणि टक्केवारी**

| ?kVd | Hkkj | VDdsokjh | vkoaVu VDdsokjh | jDde #- dksVh |
|---|---|---|---|---|
| Ykksdla[;k | 45 | 23-03 | 10-3 | 3058-65 |
| fodkl krhy rQkor | 25 | 38-83 | 9-70 | 1699-25 |
| njMksbZ mRiUu | 20 | 37-67 | 7-53 | 1359-40 |
| {ks= | 10 | 31-72 | 3-17 | 679-70 |
| ,dw.k | 100 | 30-78 | 30-7 | 6797-00 |

स्त्रोत: महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नांवरील उच्चस्तरीय समितीचा अहवाल आणि लेखकाने केलेले मापन

विदर्भाच्या लोकसंख्येचे राज्यातील प्रमाण २३.०३ आहे. या घटकासाठी त्या त्या काळातील उपलब्ध रकमेच्या १०.३ टक्के रक्कम या घटकासाठी प्राप्त होईल, घटकाला भाराच्या स्वरुपात दिलेले महत्त्व आणि प्रदेशाचा लोकसंख्येतील वाटा याचा गुणाकार केल्यास प्राप्त रक्कम या घटकासाठी राहील (0.45*23.03) घटकांना देण्यात आलेल्या भाराला टक्केवारीशी गुणल्यास आवंटन टक्केवारी प्राप्त होते आणि एकुण आवंटीत रकमेच्या घटक भारानुसार रकमेचे मापन करण्यात आले. लोकसंख्येनुसार रु. ६७९७ कोटीचे विभाजन भाराच्या ४५ टक्के म्हणजेच (0.45* 6797 ) रु. ३०५८.६५ कोटी अशा प्रकारे प्राप्त होईल. अशाच प्रकारचे वाटप जल तुट कमी करण्याचे दृष्टिने करण्याचे सुचविले आहे.

**तक्ता क्र.३**

**विदर्भासाठी एकूण जल तुटीकरिता उपलब्ध रक्कम आणि टक्केवारी**

| | Hkkj | VDdsokjh | vkoaVu VDdsokjh | jDde #- dksVh |
|---|---|---|---|---|
| Hk;st y rwV | 50 | 22-39 | 11-19 | 2899-35 |
| fodkl rwV | 50 | 48-13 | 24-07 | 2899-35 |
| ,dw.k VDdsokjh | 100 | 35-26 | 35-26 | 5787 |

स्त्रोत: महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नांवरील उच्चस्तरीय समितीचा अहवाल आणि लेखकाने केलेले मापन

एकूण जलक्षेत्र योजना अनुसूचित जाती आणि जनजाती उपयोजनेची रक्कम वजा केल्यानंतर जलक्षेत्र योजनेचा आकार रु.१५,७७६ कोटीचा राहील ( रु.५२,५८५ कोटीच्या ३० टक्के) पेयजल तूटीसाठी आवंटन टक्केवारी (०.५*२२.३९) ११.१९ येत असून एकूण जल तुटीसाठी विदर्भाच्या वाटयाला येणारी रक्कम ३५.२६ टक्के राहील तर आवंटन रक्कम रु. ५७८७ कोटी येईल याला पेयजल साठी देण्यात आलेल्या भाराशी गुणाकार केल्यास पेयजल आणि विकास तुटीसाठी प्राप्त होणारी रक्कम क्रमश: रु. २८९३.५ कोटी येईल.

**समितीचा दृष्टिकोन:**

पिछेहाट झालेल्या प्रदेशांच्या विकासाच्या संदर्भात समितीने पूर्वीच्या अहवालापेक्षा वेगळा दृष्टिकोन स्वीकारला आहे. अनुशेषाच्या संकल्पनेवर आधारित दृष्टिकोन मागास भागातील विकासाची गती वाढविण्यास पुरेसा नाही. मागास प्रदेशांच्या विकासाचा वेग वाढविणे ही अत्यंत गुंतागुंतीची प्रक्रिया असून अनेक घटकांवर अवलंबून आहे. शासकीय खर्च हा एक महत्वाचा सकारात्मक घटक आहे. परंतु आर्थिक विकासाचे निर्धारण इतर अनेक निर्णायक घटकांमुळे जसे-प्रदेशाचा इतिहास व भुगोल, भौगोलिक साधनसंपत्तीची नैसर्गिक देणगी, सामाजिक भांडवलाची जुळवणी, विकासाला पाठींबा देणारी धोरणे, संस्थात्मक क्षमता, प्रदेशाचे राजकीय नेतृत्व, सुशासन आणि व्यवसाय करण्यासाठी लागणारा न्युनतम व्यवहार खर्च या घटकांमुळे होते. सामाजिक भांडवल आणि उद्योजकता यांची भूमिका अधिकच महत्तवपूर्ण असते हे समितेने आपला दृष्टिकोन मांडतांना अधोरेखीत केल आहे. शासकीय खर्चावर संपूर्णपणे लक्ष केंद्रित न करता समितीने बहुआयामी दृष्टिकोन स्वीकारला आहे. राज्यातील विविध प्रदेशांसाठी विकासाचा वेग वाढविण्याच्या दृष्टिने विशिष्ट आणि विभिन्न उपाययोजनांचा आगळयावेगळया पध्दतीने मेळ साधणे आवश्यक राहील. प्रदेशातील लोकांच्या इच्छा/आकांक्षा लक्षात घेउन उत्तरदायीत्वासहीत प्रदेशांचे सबलीकरण होण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या धोरणांमध्ये देखील सुधार करणे गरजेचे राहील.

केळकर समितीच्या अहवालात लोकांच्या अपेक्षा व माहितीचे विश्लेषण यांची योग्य सांगड घातली गेली आहे. विकास प्रक्रिया गुंतागुतीची असल्याने त्याची उकल करण्याचे दृष्टीने समितीने विशिष्ट सार्वजनिक वस्तुंची उपलब्धता आणि सुलभता सर्वच प्रदेशांमध्ये प्रमाणकानुसार समान असावी असे सूचीत केले आहे. प्रादेशिक विकास जलद गतीने साध्य करण्याच्या दृष्टीने संबंधित आधारभूत संरचना विकसित करण्यासाठी सार्वजनिक संसाधनाची वाटणी समन्यायी तत्त्वावर व्हावी असे समितीला वाटते. आधारभूत संरचनेच्या माध्यमाने खाजगी गुंतवणुकीला चालना मिळून आर्थिक वृध्दि दरात वाढ करता येईल. विकासाची संभाव्यता आणि तौलनिक लाभ प्रदेशपरत्वे भिन्न असल्याने विकासाला प्रेरीत करणारे संरचनात्मक आवश्यक घटक देखील वेगवेगळया प्रदेशांसाठी वेगळे राहतील. समितीने सुधारीत आधारभूत संरचना, गतिशिल तौलनिक लाभ प्राप्त होण्याची संभावना असलेल्या क्षेत्रांचा विकास जलदगतीने साध्य होण्यासाठी विशेष प्रयत्न आणि खाजगी गुंतवणुकीला चालना देण्यासाठी सुयोग्य प्रेरक आणि धोरणे या संदर्भात शिफारसी केल्या आहेत. विकासाचे विभिन्न पैलू लक्षात घेउन समितीने कृतीशील आराखडा सुचविला आहे.

समितीने प्रदेश संकल्पना विस्तारीत करुन पाणी टंचाईग्रस्त तालूके आणि आदिवासी क्षेत्र यांच्या गरजा लक्षात घेउन या क्षेत्रांना कल्पित प्रदेश मानुन ठोस उपाययोजना सुचविण्याचा प्रयत्न केला आहे. या व्यतिरिक्त आरोग्य, शिक्षण तसेच कौशल्य विकास या क्षेत्रांबाबत विशेष उपाययोजना आणि नियोजनबद्ध आराखडा अहवालात दर्शविला आहे.

खान्देशासारख्या प्रदेशातील पाण्याचा विवेकी वापर, कोरडवाहू शेतीवरील उपाय, प्रक्रिया उद्योगांना चालना, पैनगंगेच्या प्रदेशात मत्स्यपालन, सामाजिक उद्योजकता, झुडपी जंगले कायद्यातील बदल, बंद पाईपलाइन्स मधून पाणीपुरवठा या व इतर अनेक महत्वपूर्ण शिफारसी करणारे हे एक 'व्हिजन डॉक्युमेंट' आहे. केळकर समितीने अहवालाच्या अंमलबजावणीसाठी कालबध्द कार्यक्रम ठरवून दिला असून २०२७ पर्यंत अपेक्षित उद्दिष्टे साध्य करावी अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. पाण्याच्या वाटपाचे उद्दिष्ट आठ वर्षात, तर दरडोई उत्पन्नाचे लक्ष्य १४ व्या पंचवार्षिक योजनेत गाठणे अपेक्षित आहे ; म्हणजेच (साधारण २०२३-२५ च्या सुमारास) राज्याची आर्थिक परिस्थिती लक्षात घेउनच समितीने शिफारशी केल्या असल्याने अहवालाची अंमलबजावणी करणे अवघड होणार नाही. राज्यातील मागास भागांमध्ये विकासाची प्रक्रिया प्रभावीपणे पोहोचविण्याचा प्रयत्न केळकर समितीने केला आहे हे आवर्जुन नमूद करावेसे वाटते.

**संदर्भ सूची :**


१. अनुराधा पटनाईक आणि विनायक एस. देशपांडे ; डिसेंबर,२०१३ "Income Convergence in Maharashtra : Myth or Reality" Arth Vijnana.Vol.LV, No.4, pp. 421-436

२. महाराष्ट्र शासन नियोजन विभाग; ऑक्टोबर २०१३, महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नांवरील उच्चस्तरीय समितीचा अहवाल.

३. केळकर समिती अहवाल : दिशादर्शक दस्तावेज. विनायक देशपांडे यांची भूमिका; १ फेब्रुवारी २०१५, लोकसत्ता विशेष.

४. केळकर समिती अहवाल : निर्णय नव्हे, माध्यम. ;१८ मार्च २०१५, मराठवाडा विकास मंडळाचे सदस्य मुकुंद कुलकर्णी यांच्याशी केलेली बातचीत दै. दिव्य मराठी.


◆◆◆

ISSN 2320-0197

# विदर्भाच्या विकासासाठी केळकर समितीने केलेल्या शिफारशी

**किशोर एम. गोमेकर**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
शिवरामजी मोघे महाविद्यालय,
पांढरकवडा. जि. यवतमाळ

**प्रस्तावना :**

महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासासाठी नेमके काय करावे हे ठरविण्यासाठी २०११ मध्ये डॉ.विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली. समितीने २०१३ मध्ये अभ्यासाअंती आपला अहवाल सादर केला. या अहवालातील शिफारशी काय आहेत त्याचा सर्वसामान्यांशी कसा संबंध आहे ? यातुन अनुशेष दूर होण्याचा मार्ग दिसतो का ? असे अनेक प्रश्न सर्वसामान्यांच्या मनात आहेत. या प्रश्नांची उत्तरे मिळविण्यासाठी केळकर समितीने फक्त विदर्भातील अनुशेष संदर्भात मांडलेला एक अल्पसा प्रयत्न आहे.

राज्यातील प्रत्येक विभाग किंवा जिल्हा यांचा विविध घटकांवरील विकास स्तर समान नसतो तेव्हा असमतोल निर्माण होतो. यातील काही बाबी भौगोलिक, आर्थिक, सामाजिक व सहकारी त्रुटीशी निगडीत असतात. यामुळे जिल्हावार, विभागवार विषमता येते, तेव्हा त्याला त्या भागाचा अनुशेष राहिला असे म्हटले जाते.

राज्य पुनर्रचना अधिनियमान्वये मुंबई राज्य व सध्याचे महाराष्ट्र राज्य याच्या निमित्‌च्या पूर्वीपासूनच स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी अस्तित्वात आहे. वस्तुत: १ ऑगस्ट, १९३८ रोजी विदर्भ प्रदेश एक भाग असलेल्या त्यावेळचा मध्यप्रांत व वऱ्हाड विधानमंडळाने असा एक ठराव संमत केला होता की, विदर्भाच्या आठ जिल्ह्यांचे एक स्वतंत्र राज्य निर्माण करण्यात यावे. दि. ०८ ऑगस्ट, १९४७ रोजीच्या अकोला करारात विदर्भ क्षेत्र आणि महाराष्ट्रातील मराठी भाषिक क्षेत्र यांचा एक संघ निर्माण करण्याचा प्रयत्न म्हणून विशिष्ट व्यवस्था योजण्यात आली होती. तथापि, अकोला कराराची कधीच अंमलबजावणी झाली नाही. १९४८ साली, राज्यांच्या पुनर्रचनेबाबत विचार करतांना, दार आयोगाने त्यांच्या अहवालात असे नमुद केले होते की, दोन मराठी भाषिक प्रांतांची निर्मिती करता येईल. मराठवाडा प्रदेश हा पूर्वीच्या हैद्राबाद राज्याचा एक भाग होता, आणि तो निजामाच्या राजवटीखाली होता आणि भारत सरकारच्या पोलीस ॲक्शन नंतर दिनांक १७ सप्टेंबर, १९४८ रोजी हा प्रदेश मुक्त झाला. विदर्भ राज्याच्या मागणीस होणारा विरोध विचारात घेता तीनही प्रदेशांच्या म्हणजे विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील नेत्यांनी दि.२८ सप्टेंबर, १९५३ रोजी करार केला ज्यास नागपूर करार असे संबोधण्यात येते. या करारानुसार, जरी एका मराठी भाषिक

राज्याची निर्मिती होवू शकत असली तरी, या प्रत्येक तीन प्रदेशासाठी निधीचे स्वतंत्र वाटप राहिल, तसेच शिक्षणाच्या संबंधातील बाबी व शासकीय सेवेतील नोकऱ्या यासंबंधात प्रत्येक प्रदेशातील लोकसंख्येसाठी स्वतंत्रपणे प्रतिशत राहील याबाबत एकमत झाले होते.

भारत सरकारने डिसेंबर १९५३ मध्ये राज्य पुनर्रचना आयोग स्थापन केला त्यालाच फाझल अली आयोग असे म्हटले जाते. या आयोगाने सन १९५५ मध्ये अहवालात आपल्या स्वतंत्र विदर्भ राज्याच्या निर्मितीची शिफारस केली होती. स्वतंत्र विदर्भ राज्याच्या निर्मितीची आयोगाची शिफारस भारत सरकारकडून स्विकारण्यात आली नाही. गुजराथी भाषिक क्षेत्रांनी वेगळ्या राज्याची मागणी केली. त्यांची मागणी विचारात घेतली असतांना, विदर्भातील विधानमंडळ सदस्यांनी पुन्हा एकदा पूर्वीच्या मुंबई राज्यातून वेगळे होण्याची मागणी केली. मुंबई पुनर्रचना विधेयक, १९६० वर चर्चा करतांना, त्यावेळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यानी शासनाच्या धोरणावर निवेदन करतांना विदर्भातील लोकांना असे आश्वासन दिले की, अनुच्छेद ३७१ (२) ची अंमलबजावणी केली जाईल आणि विदर्भास त्याच्या समन्यायी हिश्यापेक्षा अधिक हिस्सा देण्यात येईल. या आश्वासनाच्या आधारे गुजराथ वेगळा झाला तेव्हा विदर्भ मात्र महाराष्ट्रातच राहिला. असे आश्वासन दिलेले असुन देखील, जेव्हा विदर्भातील लोकांना आपला विकास व समृद्धी याकडे दुर्लक्ष होत असल्याचे आढळून आले, त्यावेळी त्यांनी पुन्हा एकवार वेगळ्या राज्याची मागणी केली. म्हणून १९८३ मध्ये त्यावेळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी प्रा.व्ही.एम. दांडेकर व प्रा. निलकंठ रथ या दोन प्रख्यात अर्थतज्ञाचा समावेश असलेली एक समिती नेमली. या समितीस प्रादेशिक असमतोल सत्यशोधन समिती असे नांव देण्यात आले होते. समितीने ९ विकासात्मक क्षेत्रातील प्रदेशनिहाय अनुशेष विचारात घेतला. या क्षेत्रांमध्ये एकुण रु. ३१८६ कोटी इतक्या रकमेचा अनुशेष आढळून आला आणि समितीने अनुशेष दूर करण्यासाठी राज्याच्या विकास निधीतील ८५ प्रतिशत इतका निधी वापरण्यात यावा अशी शिफारस केली. महाराष्ट्र शासनाने हा अहवाल स्विकारला नाही. स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी पुन्हा एकदा पुढे आली. यावर मात करण्यासाठी, शासनाने संविधानाच्या अनुच्छेद ३७१(२) मध्ये प्रादेशिक विकास मंडळे स्थापन करण्याचा ठराव दि. २६ जुलै, १९८४ रोजी मांडण्यात आला. तथापि, या ठरावाची अंमलबजावणी जवळजवळ १० वर्षापर्यंत झाली नाही. विदर्भातील व मराठवाड्यातील नेत्यांनी नेटाने पाठपुरावा केल्यानतर भारताच्या राष्ट्रपतींनी ३० एप्रिल, १९९४ च्या आदेशाद्वारे विकास मंडळे घटीत केली आणि त्यांची कार्ये विहित केली. राज्यपालांनी निर्देशांक व अनुशेष समिती म्हणून संबोधली जाणारी एकसमिती नेमली. या समितीने आपला अहवाल १९९७ मध्ये सादर केला. या अहवालावर काही विभागाकडून आक्षेप घेण्यात आल्यामुळे राज्यपालांनी समिती पुनर्गठीत केली. या समितीने आपला अंतिम अहवाल दि.२७ सप्टेंबर, २००० रोजी सादर केला. हा अहवाल शासनाने स्विकारुन असे नमुद केले की, १९९४ मध्ये असल्याप्रमाणे विद्यमान अनुशेष दूर करण्याचा प्रयत्न करतांना कोणताही नवीन अनुशेष निर्माण होणार

नाही याबाबत काळजी घेण्यात यावी. १ एप्रिल, १९९४ रोजी समितीने वित्तीय अनुशेषाची प्रदेशनिहाय विभागणी दर्शविली असून ०१ एप्रिल,१९९४ रोजी एकूण महाराष्ट्राच्या ४७.६० प्रतिशत अनुशेष एकट्या विदर्भाच्या वाट्याला आलेला आहे. हा अनुशेष पूर्वीपेक्षा वाढल्याचे स्पष्ट झाले. तर उर्वरित महाराष्ट्राचा २३.६३ प्रतिशत म्हणजे पूर्वीपेक्षा घटला आहे.

अनुशेषाच्या मुद्याचा आणि साधनसंपत्तीच्या समन्वयी वाटपाची खात्री करून घेण्यासाठी माननीय राज्यपालांनी विद्यमान स्थिती विचारा घेवून समतोल प्रादेशिक विकासाच्या मुद्यांचा आढावा घेण्यासाठी तज्ञांची एक समिती घटीत करण्याचा निर्णय घेतला. दि.३१ मे २०११ द्वारे डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली समतोल प्रादेशिक विकास उच्चस्तरीय समिती गठीत केली ती पुढील प्रमाणे :

१) डॉ. विजय केळकर - अध्यक्ष
२) डॉ. अभय पेठे - सदस्य
३) डॉ. मुकूंद घारे - सदस्य
४) श्री. विजय बोराडे - सदस्य
५) डॉ. अभय बंग - सदस्य
६) श्रीमती कुमूद बन्सल - सदस्य
७) डॉ. माधव चितळे - सदस्य
८) डॉ. विनायक देशपांडे - सदस्य
९) डॉ.श्रीमती संगिता कामदार - सदस्य
१०) डॉ. दिलीप नाचणे - सदस्य
११) डॉ.आर.पी. कुरुलकर - सदस्य
१२) डॉ.व्हि.एम. मायंदे - सदस्य
१३) महासंचालक यशदा - सदस्य
१४) प्रधान सचिव, नियोजन विभाग - सदस्य

**विदर्भाचा विकास–समितीच्या शिफारशी:**

विदर्भातील असमतोलाचे विविध पैलू आणि असमतोल दूर करण्याची निकड त्याकरिता, विभिन्न क्षेत्रातील असमतोल दूर करण्यासाठी आणि कृषि, सिंचन, उद्योग, खाणी, रस्ते, वने, सहकार, सामाजिक क्षेत्रे, नागरीकरण इत्यादी प्रक्रियांसाठी त्यांनी अनेक उपाययोजना सुचविल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे येथे आपण स्पष्ट करू.

**अ) सिंचन :**

विदर्भ प्रदेशातील अपुरी सिंचन सुविधा ही त्या प्रदेशाच्या सर्वांगीण विकासातील अडसर बनत आहे. कोणत्याही प्रदेशाची भरभराट ही सिंचनावर अवलंबून असते. तथापि, या प्रदेशातील प्रकल्पांसाठी, पर्यावरण व वन विभागाच्या ना–हरकती प्रतिक्षित आहेत. सिंचना अभावी या प्रदेशातील शेतकऱ्यांना खते, विद्युत पंप संच इत्यादीवरील अर्थसहाय्य यासारखे परिणामस्वरुप लाभ मिळण्यापासून वंचित राहावे लागले आहे.

**उपाय :**

१) निधीचे नियतवाटप करतांना, सिंचनाचा अनुशेष दूर करण्यास अत्युच्च प्राधान्य देण्यात यावे. सिंचनासाठी राखून ठेवलेले निधीचे नियतवाटप दरवर्षी अद्ययावत केल्यानुसार केवळ सिंचनाचा अनुशेष दूर करण्यासाठीच करण्यात यावे.
२) प्रलंबित अनुशेष दूर केला जात असल्याची खात्री झाल्यानंतरच जेथे सिंचनाची सुविधा राज्याच्या सरासरीपेक्षा अधिक असेल, अशा जिल्ह्यांना कोणत्याही नवीन निधीचे नियतवाटप करु नये.
३) निधीचे नियतवाटप करतांना, जिल्ह्यातील न वापरलेल्या उपलब्ध पाण्याच्या प्रमाणात पुरेशी

विशेष सवलती देण्याची आवश्यकता आहे.

४) निधीचे नियतवाटप करतांना, महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाच्या अलिकडच्या अहवालात निर्धारित केल्याप्रमाणे अद्ययावत भौतिक अनुशेषालाही अधिक प्राधान्य देण्यात यावे.

५) उन्हाळ्यात, लघुसिंचन तलावांची पाण्याची पातळी खाली गेल्यामुळे पाण्यातील फ्लोराईडची टक्केवारी वाढते. फ्लोराईड प्रमाणाबाहेर वाढल्यामुळे पाण्याचा तसेच मृदेचा दर्जा घसरतो. या समस्येवर मात करण्यासाठी जमिनीची मालकी विचारात न घेता शासनाने बाधित जमिनीच्या मृदसंधारणासाठी ताबडतोब उपाययोजना सुरु करावी. मृद संधारणामुळे या तलावांची पाण्याची पातळी वाढण्यास तसेच त्यातील फ्लोराईडची टक्केवारी नियंत्रित ठेवण्यास मदत होईल.

**नदी जोड प्रकल्प :**

नदी जोड प्रकल्पाद्वारे पूर्व व पश्चिम विदर्भातून जलवाहिनीद्वारे पाणी नेण्याचा अंतस्थ हेतू बोलून दाखविण्यात आला. गोदावरी न्यायधिकरणाने निश्चित केलेल्या पाण्याच्या हिश्यांचा विदर्भात सदूपयोग करुन घेता येईल, अशीही सूचना करण्यात आली आहे. जेव्हा विदर्भ प्रदेशाच्या सिंचनाची आवश्यकता असेल तेव्हाच प्रदेशांबाहेरील प्रकल्पांना पुढील पकल्प पूर्ण करून मंजुरी देण्यात येईल -

१) वैनगंगा (गोसीखुर्द), नळगंगा (पूर्णातापी) नदी जोड प्रकल्प.

२) प्राणहिता चेवला सुजला श्रावंती प्रकल्प (महाराष्ट्र - आंध्रप्रदेश सीमा)

३) मांजरा प्रकल्प

४) निम्न पैनगंगा प्रकल्प (८८ टक्के) म्हणजेच ३५.४ टीएमसी इतका हिस्सा धरुन ४१.१२ टीएमसी क्षमतेचा एकुण सिंचन क्षमता २,२७,२७१ हेक्टर इतकी आहे. प्रदेशाच्या सर्वांगीण, सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी हा प्रकल्प हाती घेण्यात यावा. त्यामुळे तेथील शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या घटना कमी होण्यास मदत होईल.

विदर्भात, बहुतेक नद्या जुलै ते सप्टेंबर या कालावधीत दुथडी भरुन वाहतात. तथापि, नोव्हेंबर नंतर पाण्याची पातळी अत्यंत कमी कमी होत जाते. मार्च ते मे या कालावधीत पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होते. शासनाने या गंभीर स्थितीची दखल घ्यावी आणि विदर्भातील प्रकल्प खऱ्या अर्थाने यशस्वीपणे तडीस नेल्याखेरीज विदर्भातील नद्यांचे पाणी अन्यत्र वळविण्यात येवू नये.

**ब) विदर्भातील वने :**

महाराष्ट्र राज्याच्या १९२ कोटी रुपये इतक्या एकुण वन महसूलापैकी विदर्भाचा वाटा १९३ कोटी रुपये (९० टक्के) इतका आहे. त्यामुळे अशी सूचना करण्यात आली की, विदर्भातील वनांच्या विकासावर महसूलाच्या प्रमाणात खर्च करण्यात यावा. बांबूच्या घोसापासून रोजगार मिळणे सुलभ व्हावे याकरिता समुचित बांबू धोरण तयार करण्यात यावे. वन्यजीव व निसर्ग पर्यटनाचे योग्य रीतीने नियोजन केले तर, बेरोजगार युवकांसाठी मोठ्याप्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होवू शकतील. नागपूरच्या जवळ असलेल्या गोरेवाडा तेथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे एक प्राणी संग्रहालय स्थापन करता येईल. त्याचा निसर्ग पर्यटन केंद्र म्हणून वापर

होवू शकेल. गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर, भंडारा आणि अमरावती या जिल्ह्यातील वनसंपत्तीचे रक्षण करण्यासाठी त्या जिल्ह्यांना सहाय्य करण्याकरिता विशेष विकास निधी (पर्यावरण संवर्धन निधी) निर्माण करण्यात यावा. विदर्भातील ३७ नक्षलग्रस्त तालुक्यांसाठी एक विशेष विकासाचे मॉडेल तयार करण्यात यावे. ज्याद्वारे युवकांच्या वृत्तीत बदल, लोकांच्या मानसिकतेत बदल, रोजगारांच्या संधीची उपलब्धता यासारखे प्रश्न सुटू शकतील. चुकीचा मार्ग पत्करलेल्या युवकांना मुख्य प्रवाहात परत आणण्यावर भर देण्यात यावा. १९८० चे वन धोरण हा विदर्भातील सिंचन प्रकल्पांच्या प्रगतीमधील मुख्य अडसर असल्याचे दिसून येते. या प्रकल्पाखाली ४८ ते ५० टक्के इतकी एकूण जमीन वनांनी व्यापलेली आहे. तथापि, या वनांची घनता ही १ टक्का इतकी नगण्य आहे. अशी सूचना आहे की, वनक्षेत्रातील सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी एक स्वतंत्र वन धोरण आखण्यात यावे.

**क) रस्ते :**

एका हितसंबंधिताने असे नमुद केले आहे की, विदर्भात जेथपर्यंत राज्य महामार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग यांचा संबंध आहे त्याबाबतीत विदर्भाचा कोणताही अनुशेष नाही असे अनुशेषाच्या गणनेतून उघड झाले आहे. अर्थात हे बरोबर नाही. तथापि, विदर्भ प्रदेशात इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण रस्त्यांच्या बाबतीत ३१ मार्च, २०१० रोजीप्रमाणे प्रचंड अनुशेष अस्तित्वात आहे. रु. ६६५५ कोटी एवढा एकूण अनुशेष काढण्यात आला आहे. बांधा, वापरा, हस्तांतरीत करा, सार्वजनिक खाजगी भागीदारी (PPP) आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ सारख्या संघटना यामार्फत राष्ट्रीय राज्य महामार्गाचे आणि जिल्हा मार्गाचे जाळे निर्माण करण्यात येत आहे. जिल्हा आणि ग्रामीण रस्त्यांसाठी अशी कोणतीही यंत्रणा किंवा व्यवस्था अस्तित्वात नाही. याबाबत अशी विनंती केली आहे की, अनुशेषाचे पुनर्निर्धारण करुन विकासाच्या या महत्त्वाच्या मापदंडाकडे नव्याने पाहणे इष्ट ठरेल आणि विदर्भातील रस्त्यांचे जाळे सुधारण्यासाठी निधी देण्याची गरज आहे.

**ड) विदर्भाचा औद्योगिक विकास :**

या प्रदेशातील एका आमदारांनी असे दाखवून दिले आहे की, विदर्भ प्रदेशात मोठ्या प्रमाणावर खनिज संपत्ती असून तिचा पुरेपूर सदुपयोग न झाल्यामुळे उद्योगाच्या मुल्यवर्धनावर विपरित परिणाम झाला आहे. त्यांनी असाही युक्तिवाद केला आहे की, खनिज प्रक्रिया युनिटाला कच्च्या मालाच्या किंमतीच्या ६० टक्के इतकी वीज लागते. म्हणून छत्तीसगड राज्यात लागू केलेल्या धोरणाच्या धर्तीवर खनिज प्रक्रिया एककांना कमी किंमतीने वीज उपलब्ध करुन दिली पाहिजे.

अ) मोटार, जैवतंत्रज्ञान, औषधनिर्माण आणि माहिती तंत्रज्ञान इत्यादीसारख्या मूल्यवर्धित उद्योगांना आकर्षित करण्यासाठी विशेष सवलती द्यायला हव्यात.

ब) विदर्भासाठी एका विकास आयुक्ताची (अपर मुख्य सचिवाच्या दर्जाच्या) नेमणूक करण्यात यावी.

क) अमरावती विभागाच्या एकूण देशीय उत्पादनामध्ये कृषि उत्पादनाचा असलेला मोठा वाटा लक्षात घेता, मोठ्या प्रमाणावरील कृषि आधारित उद्योगधंदे सुरु करावेत.

ड) केन्द्र सरकार व राज्य शासन यांनी, मिहानला

विशेष प्रकल्पाचा दर्जा दिला पाहिजे.

इ) जल व पर्यावरण यांचे जतन करण्याच्या दृष्टीने आवश्यकतेपेक्षा जास्त वीज निर्माण करणारे वीज प्रकल्प तात्काळ बंद करावेत. या प्रकल्पांना आवश्यक असणाऱ्या पाण्यामुळे सात लाख हेक्टर्स इतकी जमीन सिंचनाखाली येवू शकते, याचा विदर्भावर मोठा भार आहे. या बदल्यात विभागाला निष्फळ राख मिळते व पर्यावरणाची मोठी हानी होते. याशिवाय लागवडीखालील जमिनीचे मोठे मोठे खंड हे कोरडवाहू बनत आहेत.

**इ) वीज क्षेत्र :**

विदर्भात २६ हून अधिक वीज प्रकल्प येत असल्यामुळे विदर्भ हे महाराष्ट्राचे पॉवर हाऊस बनले आहे. म्हणून या समृद्धीचा विदर्भाला प्रत्यक्ष लाभ मिळावयास हवा.

अ) जी वीज विदर्भाबाहेरील प्रदेशांमध्ये -मग ते महाराष्ट्रात असोत किंवा दुसऱ्या राज्यांमध्ये असोत-पारेषित केली जाते अशा सर्व वीजेवर विदर्भ विकास उपकर आकारण्यात यावा आणि त्या पैशाचा वापर केवळ प्रदेशाच्या विकास निधीसाठी करावा.

ब) प्रकल्पातून बाहेर पडणाऱ्या राखेचा वापर हा, वीज प्रकल्पाच्या १०० कि.मी. च्या आत रस्ते बांधणी, खाणी भरण, सुक्ष्म, लघु व मध्यम पाटबंधारे कालव्यांचे बांधकाम, उच्च उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गट व अल्प उत्पन्न गट यांच्यासाठी घराचे बांधकाम यासाठी करणे अनिवार्य करावे.

क) राज्याच्या उर्वरित भागात वीज पारेषित करण्यापूर्वी, ही वीज प्रथम या संपूर्ण प्रदेशामध्ये पुरविली जावी.

ड) चांगले रस्ते तयार करुन, वीज प्रकल्पापर्यंत कोळशाची वाहतूक करतांना होणाऱ्या प्रदूषणाचा परिणाम कमी करावा. सर्व वीज प्रकल्पांसाठी, पर्जन्य जलसंचयन, पाझर तलाव, पाणलोट विकास व जलस्त्रोतांमध्ये वाढ करण्यासाठी आवश्यक असलेल्या अशा इतर उपाययोजना अनिवार्य कराव्यात.

**फ) पर्यटन :**

विदर्भाची पर्यटन क्षमता अनन्यसाधारण असून त्याबाबतीत जाणीवपूर्वक कार्य करण्याची व त्यात व्यावसायिकता आणण्याची गरज आहे. याबाबतीत महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ फार काही करु शकेल असे वाटत नाही. नवल याचे वाटते की, यापैकी काही बहुमुल्य गोष्टी या आपत्तीग्रस्त व आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या क्षेत्रात आहेत. या क्षेत्रांमध्ये कृषितर रोजगारांची गरज आहे असे नवीन रोजगार निर्माण करणाऱ्या क्षेत्रांपैकी पर्यटन हे एक चागले क्षेत्र आहे. नागपूरला व्याघ्रभूमीचे प्रवेशद्वार असलेले शहर, तसेच भारताचा मध्यबिंदू म्हणून घोषित करण्याबरोबरच, मोठ मोठ्या उद्योजकांनी त्यांच्या आस्थापना स्थापन करणे, पायाभूत सुविधांचा विकास करणे आणि विदर्भातील पर्यटन व्यवसायाच्या संभाव्य संधीचा प्रसार करणे या गोष्टी केल्या पाहिजेत. त्यामुळे पर्यटन क्षेत्रात खात्रीशिरपणे वृद्धी होत राहील.

१) महाराष्ट्र शासनाने, या प्रदेशात पर्यटनाचा विकास व व्यवसाय करण्याच्या उद्देशाने स्वतंत्र विदर्भ पर्यटन विकास महामंडळ तात्काळ स्थापन करावे. विदर्भ पर्यटन विकास महामंडळावर पर्यटन व वन विभागाचे वरिष्ठ अधिकारी असावेत. विदर्भ पर्यटन विकास महामंडळ केवळ सुविधा पुरविणारे मंडळ व

प्रवर्तक असावे.

२) शासनाने, विदर्भातील पर्यावरणानुकूल पर्यटन व पर्यटनविकास या दोन्ही विषयांवर टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस यांनी सादर केलेल्या अहवालाची अंमलबजावणी करावी.

३) महाराष्ट्र शासनाने, उद्योगधंद्यासारख्या सामूहिक प्रोत्साहन योजनांचा लाभ देवून विदर्भातील पर्यटन क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर व खाजगी गुंतवणुका करण्यास प्रोत्साहन द्यावे.

**ग) मिहान :**

महाराष्ट्र शासनाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांपैकी हा एक सर्वात मोठा पायाभूत सुविधा प्रकल्प असुन तो अजूनही सुरु आहे. या प्रकल्पाचे मुख्यमंत्री कार्यालयाकडून नियमितपणे सनियंत्रण करण्याची गरज आहे.मिहानच्या क्षेत्रात आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा जवळजवळ पूर्ण आहेत असे हितसंबंधित घटकांनी निदर्शनास आणून दिले आहे.

१) मिहानची बाजारपेठ व्यावसायिकदृष्ट्या वस्तुनिर्माण क्षेत्रासाठी विशेषत: विशेष आर्थिक क्षेत्रासाठी आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी व वैश्विक स्तरावरील संस्थांना आकर्षित करण्यासाठी वैश्विक अभिकरणाची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

२) मिहानमध्ये मुक्त व्यापार व वखार (वेअर हाऊसिंग) क्षेत्र सुरु करावीत.

३) आंतरराष्ट्रीय विमानतळ, रेल्वे व रस्त्यांनी जोडली जाणारी अंतीम स्थानके यांचा विकास करण्याकरिता एखादा भागिदार शोधण्याची प्रक्रिया वेगाने पूर्ण करावी.

**समारोप :**

विदर्भाविषयीच्या समस्यांकडे एकतर दुर्लक्ष केले जाते किंवा महाराष्ट्र राज्याची राजधानी मुंबईतून त्याविषयीचे निर्णय घेणाऱ्यांकडून येथील नागरिकांना दुजाभावाची वागणूक दिली जाते,असा विदर्भातील लोकांचा सर्वसाधारण समज असल्याचे प्रतिनिधीक चित्र पाहावयास मिळते.विदर्भातील निरनिराळ्या राजकीय पक्षांच्या नेत्यांना येथील आर्थिक विकास साधण्यासाठी एकत्र येवून काम करता येईल. समतोल विकासाचा कच्चा आराखडा योग्यरितीने अमलात येत नसेल तर त्याऐवजी पुढील प्रमाणे पर्याय अनुसरता येतील -

१) महत्त्वाची आर्थिक खाती आता विदर्भातील नेत्यांना देण्यात यावीत.

२) स्वतंत्र विधानमंडळ व मंत्रीपरिषद यांसह आसामचे स्वायत्त राज्य म्हणून मेघालयाला १९६९ च्या २४ व्या सुधारणेनुसार ज्याप्रमाणे दर्जा देण्यात आला त्याचप्रमाणे विदर्भास स्वायत्त राज्याचा दर्जा देता येईल.

३) विदर्भाची स्वायत्तता : आसाम राज्यातून स्वायत्त राज्य म्हणून ज्याप्रमाणे मेघालय बाजुला काढून स्वतंत्र राज्य करण्यात आले त्याप्रमाणे विदर्भास स्वतंत्र राज्याचा दर्जा देण्याच्या मागणीच्या दुसऱ्या पर्यायाचा पाठपुरावा करता येईल.

**संदर्भ :**


१) महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नांवरील उच्चस्तरीय समितीचा अहवाल.

२) महाराष्ट्र आर्थिक पाहणी, महाराष्ट्र शासन.

३) महाराष्ट्र विधानमंडळ, २०१३.

४) महाराष्ट्र शासनाच्या अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे प्रकाशन, (२००८).

५) महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल विषयक सत्यशोधन समितीचा अहवाल (१९८४) नियोजन विभाग, मुंबई, महाराष्ट्र शासन.


◆◆◆

ISSN 2320-0197

# केळकर समितीचा अहवाल – प्रादेशिक विकासाची व्यूहनीती

**वैशाली देशमुख**
अर्थशास्त्र विभाग,
शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.

## १) प्रस्तावना :

देशाचा आर्थिक विकास फक्त दरडोई उत्पन्न वाढीतून किंवा राष्ट्रीय उत्पन्न वाढीतून योग्य प्रकारे मांडता येत नाही. त्यासाठी समतोल विकास, देशातील प्रत्येक भागाचा विकास अभिप्रेत आहे. एखादा देश त्यावेळी विकासाच्या उच्च पातळीवर पोहोचतो ज्यावेळी देशातील सर्व क्षेत्राचा समतोल विकास होतो.

कृषी, उद्योग व सेवा क्षेत्रांचा समान रितीने होणारा विकास देशाच्या आर्थिक प्रगतीत भर टाकतो. या अर्थव्यवस्थेतील महत्त्वाच्या क्षेत्राप्रमाणे देशाचे भौगोलिक दृष्टीने आणि प्रशासकीय दृष्टीने जे भाग पडलेले असतात त्याचा समान विकास संतुलित विकासात पर्यायाने आर्थिक विकासात अभिप्रेत आहे.

महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाबाबत असे चित्र आढळते की, भारताच्या सरासरी आर्थिक वृद्धिदरापेक्षा महाराष्ट्राचा आर्थिक वृद्धिदर, दरडोई उत्पन्न जास्त आहे. परंतु महाराष्ट्रांगर्तत परिस्थिती मोठ्या प्रमाणात विषमता असणारी आहे. प्रशासकीय दृष्टीने महाराष्ट्राचे सहा विभाग आहेत. मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती व औरंगाबाद या सहा विभागांपैकी नागपूर व अमरावती विदर्भात, औरंगाबाद मराठवाड्यात, नाशिकचा काही भाग खानदेशात तर मुंबई व पुणे उर्वरित महाराष्ट्रात मोडतो. महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा व खानदेश हा भाग मोठ्या प्रमाणात मागासलेला आहे. तर मुंबई, पुणे, नाशिक, ठाणे या भागात मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरण, शेतीचे आधुनिक तंत्र अवगत केलेले आहे. महाराष्ट्रामध्ये प्रादेशिक विषमता मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आहे म्हणूनच दरडोई उत्पन्नात कमालीची तफावत, औद्योगिक सेवा क्षेत्राचे मुंबई व पुणे भागात झालेले केंद्रीकरण व कृषीबहुल क्षेत्रामध्ये शेतीचे मागासलेपण असा विषमतापूर्ण विकास सध्या महाराष्ट्रात अस्तित्वात आहे. महाराष्ट्रात असलेला असमतोल दूर करण्याच्या हेतूनेच समस्यांचा अभ्यास करून उपाययोजना सुचविण्यासाठी केळकर समितीची स्थापना करण्यात आली. केळकर समितीने महाराष्ट्र शासनाला जो अहवाल सादर केला त्यामध्ये महाराष्ट्रातील प्रत्येक प्रदेशाचा गहन अभ्यास, तेथील नैसर्गिक स्थिती, शेती, उद्योग, सेवा क्षेत्राचे अस्तित्व विकासास कारणीभूत घटक त्या क्षेत्रातील समस्या व समस्यांवरील उपाय याचे इत्थंभूत विवेचन केले आहे.

अहवालामध्ये पाचवे प्रकरण हे वृद्धी वेगासाठी प्रादेशिक व्यूहनिती यासंदर्भात मांडले आहे.

प्रस्तुत लेखामध्ये पाचव्या प्रकरणातील विश्लेषणाचा परामर्श मांडला आहे. समतोल प्रादेशिक विकासामध्ये वृद्धीचा वेग वाढणे अपेक्षित असते. यासाठी आधार संरचना, कौशल्य विकास, सुशासन, व्यवसायांचा मितव्यय आणि मोठी चालना मिळण्यासाठी विकासात्मक भांडवल यांची प्रामुख्याने आवश्यकता असते.

समितीने अहवालामध्ये प्रामुख्याने सुचविले की महाराष्ट्रातील असमतोल दूर करण्यासाठी अर्थपूर्ण व विश्वासार्ह बदल होणे गरजेचे आहे. पारंपरिकरीत्या कोरडवाहू असणाऱ्या शेतजमिनीमध्ये नवीन पाणीबचतीच्या सिंचन सोयी, पीक रचनेतील बदल, फळ शेतीचा विकास अशा योजना मागास भागातील शेती विकासासाठी राबविणे गरजेचे आहे. तसेच शेतीतील अतिरिक्त श्रमिकांना गैरशेती उत्पादन क्षेत्रात स्थलांतरित करण्यासाठी मागास भागामध्ये उद्योग, सेवा क्षेत्रावर लक्ष केंद्रीत करणे, आधारसंरचनेचा विकास करून कौशल्यवृद्धी करणे गरजेचे मानले आहे.

अहवालामध्ये विदर्भ, मराठवाडा, कोकण, खानदेश व उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासाची व्यूहरचना मांडली आहे.

**२) मराठवाड्यासाठी वृद्धी व्यूहरचना :**

समितीने मराठवाड्याबाबत प्रामुख्याने विचार मांडले की, अतिमागास भाग म्हणून मराठवाडा ओळखला जात असल्याने तेथील बलस्थाने व अडथळे यांचा विचार करूनच विकासाची व्यूहनिती ठरविणे गरजेचे आहे. सार्वजनिक गुंतवणूक प्रेरित न झाल्याने आणि शासनाची उदासीनता या मागासलेपणाला कारणीभूत असल्याचे आढळते. योजनाबद्ध स्थान, वर्तमान चैतन्यपूर्ण वस्तू निर्माण, लघू व मध्यम उद्योगांचा समूह, पारंपरिक पर्यटन, सौरऊर्जा, क्षेत्रीय भाषा, माहिती तंत्रज्ञानाच्या सक्षम सेवा (Information Technology Enable Services) आणि BPO (Business Processing Outsourceing) शक्तता या गोष्टी याभागाच्या बलस्थानात आहेत. परंतु नैसर्गिक साधन संपत्तीचा अभाव प्रामुख्याने पाण्याची कमतरता, रेल्वे, रस्ते जोडणीमध्ये कमतरता, कौशल्य कमतरता आणि प्रामुख्याने शासनाचे दुर्लक्ष व विकासात्मक खर्चाचा योग्य वापर करण्यासाठी प्रशासकीय क्षमता, सामाजिक भांडवलासंबंधीचा मंद परिणाम हे सर्व घटक विकासात बाधा निर्माण करणारे आहेत. हे सर्व अडथळे दूर करून नवीन व्यूहनिती राबविण्यासाठी शासनाने आणि सुधारीत धोरणाने मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील दरडोई उत्पन्नातील फरक कमी करण्यासाठी, तुलनात्मकरित्या फायदा मिळावा यासाठी अहवालात विविध उपाय सुचविले आहेत.

**१) सामाजिक-राजकीय उपक्रम :**

केळकर समितीने सुचविल्याप्रमाणे मराठवाड्यामध्ये राजकीय, सामाजिक नेतृत्वात जागृकता निर्माण व्हावी त्यात वाढ व्हावी यासाठी सामाजिक-राजकीय उपक्रम राबविणे गरजेचे आहे. जेणेकरून मराठवाड्याच्या विकास परिप्रेक्ष्यात बदल होण्याच्या दृष्टीने, लोकांमध्ये जागृकता, आत्मविश्वास, लैंगिक समभाव भावना वाढीस लागेल. परिणामी विकासदर वाढण्यास साहाय्यभूत होईल.

**२) प्रशासकीय पुनर्रचना :**

कामकाज व्यवस्थित चालावे, कामाचा ताण कमी व्हावा यासाठी महाराष्ट्रात सहा प्रशासकीय विभाग आहेत. मराठवाडा वगळता इतर सर्व

विभागामध्ये प्रत्येकी ५ ते ६ जिल्हे आहेत. परंतु मराठवाडा (औरंगाबाद) विभागात मात्र आठ जिल्ह्यांचा भार आहे. परिणामी विकास कामामध्ये अनेक अडचणी येतात. म्हणून पूर्वीपासून होत असलेली विभागाच्या पुनर्रचनेची मागणी केळकर समितीने उचित मानली आहे.

**३) कौशल्य विकास व शिक्षणाची वाढ :**

मराठवाड्याचा साक्षरता दर हा महाराष्ट्राच्या सरासरी साक्षरता दरापेक्षा कमी आहे, त्यामध्ये वाढ करण्यासाठी सर्वशिक्षा अभियानात सुधारणा सुचविली आहे. त्याचप्रमाणे स्पर्धा परीक्षांमधील सहभाग वाढावा यासाठी चौथी व दहावीच्या विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षेच्या तयारीसाठी, पात्र होण्यासाठी विशेष आराखडा तयार करून प्रेरित करावे, विशेष शिकवणी उपलब्ध करून द्यावी व शासनामार्फत विशेष निधी पुरविण्याची गरज समितीने सुचविली. विशेषत: पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांचे क्रियात्मक इंग्रजी (Functional English) व मूलभूत विज्ञान संकल्पना समजून घेण्यासाठी, प्रादेशिक भाषेमध्ये विकास घडविण्यासाठी सर्व शाळांमध्ये विशेषत: ग्रामीण भागात विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञानाचा वापर वाढवावा हे प्रतिपादीत केले. राष्ट्रीय व्यावसायिक प्रमाणपत्र आराखडा बनविताना व्यावसायिक कोर्सबाबत ८ ते १० वीच्या विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करणे, पदवी, पदव्युत्तर मुलांना व्यावसायिक अभ्यासक्रमाबरोबरच, आदरातिथ्य, वित्त, अधिकोष, विमा, पर्यटन सेवा, रुग्णालय व्यवस्थापन यासारख्या ठिकाणी रोजगार निर्मितीसाठी प्रवृत्त करावे. त्याचप्रमाणे समितीने उद्योग समूहाला प्रोत्साहन देण्यासाठी सुचविले की, जर दरवर्षी ६० विद्यार्थ्यांना पुढील ५ वर्षापर्यंत रोजगार देण्याची हमी उद्योगांनी दिली तर अशा उद्योगांना व्यावसायिक प्रशिक्षण तंत्रनिकेतन चालविण्याची पूर्ण स्वाययत्ता दिली जावी. शैक्षणिक गुणवत्ता सुधारणाच्या दृष्टीनेही NIT, IIT, IIM सारख्या संस्था मराठवाड्यात सुरू कराव्यात. स्त्री शिक्षणाबाबत समिति विशेष लक्ष देण्याचे सुचविले. वसतिगृह राहण्याच्या ठिकाणी, सुरक्षा, सुरक्षित वाहतूक व्यवस्था यासाठी वित्तीय तरतूद करणे गरजेचे मानले.

**४) प्रादेशिक वृद्धी केंद्र :**

वस्तू निर्माण उद्योग, कृषी प्रक्रिया, पर्यटन, उच्च व तंत्र शिक्षण, सौर ऊर्जा आणि माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सक्षम सेवा यासारख्या केंद्राची निर्मिती मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात व्हावी याला समितीने महत्त्व दिले आहे.

**५) वृद्धी केंद्राचे अभिज्ञान :**

मराठवाड्यात विकास घडवून आणायचा असेल तर भूमी, जल, ऊर्जा, रसदविज्ञान, गोदामव्यवस्था यासारख्या मूलभूत सुविधांचा विकास झाला पाहिजे. विकास वेगाने होण्यासाठी शासकीय यंत्रणा तात्काळ निर्णय घेणारी असावी. तसेच मराठवाड्यात सार्वजनिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र सुरू करण्याची गरज मांडली.

**६) वृद्धी केंद्राचे प्रवर्गीकरण :**

मराठवाड्याचा विकास होण्याच्या दृष्टीने उद्योग, व्यापार, पर्यटन, शिक्षण या आर्थिक इंजिन स्थापित झालेल्या भागात जास्त वृद्धी होण्यासाठी वृद्धी केंद्र स्थापावे. जसे औरंगाबाद, जालना हे जिल्हे आहेत. नांदेड, उस्मानाबाद, लातूर सारख्या जिल्ह्यांमध्ये वस्तूनिमाृण, कृषी प्रक्रिया, पर्यटन, सौरऊर्जा असे उद्योग उभारावेत. वृद्धी केंद्राचे स्थाननिश्चिती करताना त्या क्षेत्रातील सुप्तगुणांचे

फायदे मिळवावेत.

**७) औद्योगिक शहराचा मूलभूत विकास :**

विकासक्रम ठरविताना उद्योग व पर्यटनामुळे ज्या शहरांचा विकास जलद गतीने होतो त्यामुळे शहराच्या मूलभूत सोयी सुविधांवरील दबाव वाढतो. परिणामी विकासात अडथळा निर्माण होतो. म्हणून औरंगाबाद येथे औरंगाबाद प्रादेशिक विकास प्राधिकरण स्थापन केले गेले. इमारती, रस्ते, उड्डाणपूल, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्था, वाहतूक सुविधा, क्रीडासंकुल, व्यापारकेंद्र ,पर्यटन आकर्षण व हरीत शहर निर्माण होण्याच्या दृष्टीने या प्राधिकरणाची स्थापना केली गेली.

**८) माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा विकास :**

प्रादेशिक संतुलन निर्माण होण्यासाठी माहिती तंत्रज्ञान व विविध कौशल्य पूर्ण रोजगार निर्माण क्षेत्राचा विकास होणे गरजेचे आहे. विदर्भ व मराठवाड्यामध्ये गुणवत्तापूर्ण मनुष्यबळ आहे परंतु रोजगार उपलब्ध नाही. त्यामुळे हा भाग मागास आहे. म्हणून केंद्र राज्यसरकारने सॉफ्टवेअर विकास व दुरूस्ती , data collection व कार्यालयाव्यतिरिक्त काम करणे अशा ठिकाणी रोजगार निर्माण करावा. यासाठी कंपन्यांना स्थानिक सहाय्य देण्याच्या आधारे आमंत्रित करावे. विविध सुविधा उपलब्ध करून द्याव्यात असे सुचविले.

**९) लघू उद्योगांची स्थापना :**

कमी भांडवल, कमी जागा व स्वयंरोजगार निर्मिती बरोबरच ५-१० लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे हे लघुउद्योग प्रारूप आहे. कमी कौशल्य व जास्त मनुष्यबळ असण्याच्या ठिकाणी लघुउद्योग यशस्वी होतात. यासाठी उद्योजकांबरोबरच खरेदीसाठी प्रलोभने असावीत व वित्तीय संस्थांचा सहभाग यामध्ये वाढावा असे समितीने सुचविले. यासाठी १०,००० लोकसंख्या असलेल्या गावासाठी चांगले रस्ते, रेल्वेसेवा सुरू करावी. स्थानिक बेरोजगारांना प्राधान्य द्यावे, वार्षिक उलाढालीची मर्यादा ठरवावी, कमी जागेची गरज असल्याने जमीन अधिग्रहण सोयीचे करावे असे उपाय सुचविले तसेच विक्रेते व ग्राहक यांना प्रलोभने दिल्यास प्रारूप निश्चितच यशस्वी होऊ शकते असे समितीने मांडले.

**१०) कृषी प्रक्रिया उद्योग विकासासाठी उपक्रम :**

मराठवाड्यात कापूस, सोयाबीन, डाळी, मोसंबी यासारखी पिके मोठ्या प्रमाणात उत्पादित होतात. यांच्यावर प्रक्रिया करणारे उद्योग तसेच व्यापार केंद्र सुरू करावे, यासाठी सरकारी जनादेश काढला परंतु त्याची अंमलबजावणी योग्य रितीने व्हावी तसेच महाराष्ट्र कृषी उद्योग निगमद्वारे शीतगृह, संवेष्टन सुविधा, जल व हवाई वाहतूक सुविधा, पुरवठा साखळी निर्माण होण्याकडे लक्ष द्यावे असे समितीने सुचविले. तसेच मराठवाड्यात कापूस उत्पादन व जिनिंग मिल मोठ्या प्रमाणात आहे यावर प्रक्रिया होण्यासाठी कापड उद्योग टेक्सटाईल पार्क सुरू करावे असे प्रामुख्याने मांडले.

**११) पर्यटन विकास :**

सांस्कृतिक व क्षेत्रीय पर्यटनासाठीची नैसर्गिक व ऐतिहासिक देणगी मराठवाड्याला लाभली आहे. यासाठी औरंगाबाद महाराष्ट्राच्या पर्यटनाची राजधानी म्हणून घोषित केली आहे परंतु त्याचा योग्य प्रकारे विकास होण्यासाठी समितीने काही उपाय सुचविले त्यामध्ये प्रामुख्याने सर्व पर्यटन स्थळांना जोडणारे चारपदरी रस्ते, मुंबई व हैद्राबादला जोडणाऱ्या जास्त व अतिजलद रेल्वेसेवा,

आंतरराष्ट्रीय विमान वाहतुकीमध्ये नियमितता,पर्यटन स्थळांच्या सौंदर्यीकरण, देखभाल व दुरुस्तीची विशेष सुविधा, औरंगाबाद येथे औद्योगिक पर्यटन प्रदर्शनाचे आयोजन, बिबीका मकबरा, देवगिरी किल्ला, वेरूळ, अजिंठा लेणी यासारख्या ठिकाणी ध्वनी व लेझर. चित्रपट सोय निर्माण व्हावी यासाठी विशेष पोलीस नियुक्ती व स्वतंत्र मराठवाडा पर्यटन विकास निगमाची स्थापना अशा सुविधा सुचविल्या आहेत.

**१२) सौर ऊर्जा विकास :**

पाण्याची कमतरता असणाऱ्या मराठवाड्यात सौरऊर्जेचा वापर महत्त्वाचा मानला. कमी खर्चात हे प्रकल्प राबवून जवळपास १०,००० मेगावॅट वीजनिर्मिती प्रत्येक जिल्ह्यासाठी होऊ शकते. म्हणून उस्मानाबाद, परभणी, बीड यासारख्या जिल्ह्यामध्ये हे प्रकल्प राबवावेत असे सुचविले. यासाठी महाराष्ट्र शासनाने नवीन सौर उर्जानिती राबवावी. शासनाने एमआयडीसी मध्ये असे सौर ऊर्जा पार्क उभारावे जेणेकरून मूलभूत सुविधा उपलब्ध होईल. खाजगी क्षेत्रानेही यासाठी पुढाकार घ्यावा असे सुचविले.

याप्रमाणेच मराठवाड्याच्या विकासाला प्रबळ चालना मिळावी यासाठी उस्मानाबाद महामार्ग, नागपूर, अंबेजोगाई रेल्वे प्रकल्प, काही ठिकाणी मोठे विमानतळ अशा प्रकल्पांचा विकास करावा जेणेकरून मराठवाड्यात विकासदर १६% पेक्षा जास्त होऊ शकेल.रोझेस्टीन रोडानच्या प्रबळ चालना सिद्धान्तांचा आधार घेऊन मराठवाड्याच्या विकासाला प्राधान्य द्यावे असे समितीने अहवाला मांडले आहे.

**३)उर्वरित महाराष्ट्रासाठीची विकास व्यूहनिती:**

तीन समुद्रकिनारा असणारे जिल्हे, सहा डोंगराळ भाग असणारे जिल्हे, चार आदिवासी प्रबळ जिल्हे तर दुष्काळ प्रवण क्षेत्र असणारे अनेक तालुके अशी विविधता असणारा उर्वरित महाराष्ट्र आहे. महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येपैकी ५७% लोकसंख्या या भागात आहे. कृषी हवामानाच्या विविधतेतील पोषकतेमुळे अनेक जिल्हे व तालुके पीक विशेषीकरण असणारे आहेत. जसे नाशिक सांगलीची द्राक्षे, लासलगावचे कांदे, सांगोल्याचे डाळिंब या भागाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे पाच मोठे औद्योगिक वृद्धी केंद्र ठाणे, पुणे, रांजणगाव, सिन्नर व नाशिक येथे आहेत. या केंद्राच्या अनेक शिक्षण संस्था असल्याने कुशल मनुष्यबळ, पीक विविधतेने कच्चामाल, बाजारपेठेची उपलब्धता परिणामी औद्योगिक विकास वेगाने झाला आहे. या विकासाला अजून एक प्रामुख्याने कारण म्हणजे सामाजिक, राजकीय चळवळीची परंपरा. लहान वयात शाळेपासूनच मुलांवर त्याचे परिणाम झाला आहे. शहरांमध्ये सर्वांना सामावून घेण्याची प्रवृत्ती (Cosmopolition) विश्वकुटुंबी आहे. उदारमतवादी वातावरण व यशस्वी शिक्षण संस्थांमुळे या भागात स्थलांतरित होणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. अनेक कौशल्यांचे एकत्रीकरण झाल्याने कौशल्याधारित अनेक उद्योग विशेषत: सेवा क्षेत्र या भागात विकसित झाले आहे.

याप्रमाणेच ऊस उत्पादन मोठ्या प्रमाणात असल्याने या भागात सहकारी साखर कारखाने मोठ्या संख्येने सुरू झाले. १९५२ पासून आर्थिक सामाजिक क्षेत्रातील ही चळवळ राजकीय नेत्यांनी आकारास आणली. पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर अहमदनगर, नाशिक, धुळे, जळगाव हा ऊस पट्टा मानला जातो. सिंचन प्रकल्पही योग्य रित्या राबविले

गेल्याने आणि शासनकर्ते राजकारण्यांनी या भागातील सुप्त गुणांकडे लक्ष दिल्याने विकासाचा वेग वाढला. या भागात दूध प्रक्रिया उद्योगांचा विस्तारही मोठ्या प्रमाणात झाला. भारतीय कृषी उद्योग संस्था, अशासकीय संस्था यांच्या मार्फत कृत्रिम रेशन केंद्र व संकरित गायींची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली. शासकीय डेअरीमुळे तसेच खाजगी व सहकारी दूध प्रक्रिया केंद्रामुळे व आधुनिक तंत्राच्या जोडीने दूध व्यवसाय प्रगती करू शकला. फळशेती बाबातही हा भाग सधन आहे. परिणामी या भागाचा विकास दर जास्त आहे. तरीही विकासाबाबतच्या काही त्रुटी आहेतच.

मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरण झालेल्या या भागात आजूबाजूचा परिसर मात्र अतिमागास असा आहे. औद्योगिक वसाहतीच्या सभोवती अत्यंत गरिबी वसलेली आहे. जलद औद्योगिकीकरणामुळे शहरीकरण तेवढ्याच वेगाने होते परंतु त्यामुळे पिण्याची पाणी, निवास, सांडपाण्याची व्यवस्था अशा मूलभूत सुविधांवर ताण पडतो. पर्यावरण समस्या या भागात मोठ्या प्रमाणात वाढल्या आहे. शहरीकरण म्हणजे इमारती वाढतात परंतु भूमी वापराबाबतचे नियोजन दूरदृष्टीच्या नियोजनाचा अभाव यामुळे अनेक सामाजिक, आर्थिक प्रश्न निर्माण झाले, भूमीमाफीया, अवैध बांधकाम, अवैध ताबेदार या भागात निर्माण झाले आहेत.

साखर कारखान्याच्या वाढीमुळे अधिकाधिक पाणी वापराचे पीक म्हणजे ऊस उत्पादन वाढले त्यामुळे पाण्याचे विषम वाटप वाढले. या भागातील अनेक तालुके मान्सूनच्या लहरीपणाने बाधीत म्हणजे दुष्काळी पट्ट्यातील आहेत. पाण्याच्या असमान वाटपाने साखर कारखान्यांचे वर्चस्व वाढले ते राजकारण्याच्या आशीर्वादानेच राजकीय दबावापोटी दिलेले परवाने हे विकासामध्ये विषमता वाढवित आहेत. औद्योगिकरण शहरीकरण व उसाचे वाढते उत्पादन यामुळे पाणी व्यवस्थापन ही ज्वलंत समस्या निर्माण झाली आहे. यासाठी सूक्ष्म सिंचन पद्धतीचा वापर, शेतकऱ्यांमध्ये जागृतता निर्माण करणे गरजेचे मानले आहे. कोकण व डोंगराळ भागात आदिवासी लोकसंख्या जास्त आहे. रस्ते, सिंचन, पाणी साठवणूक, रुग्णालये, शाळा यासारख्या मूलभूत सेवांचा विकास या भागात होणे गरजेचे आहे. जेणेकरून विकासात अडथळे निर्माण होणार नाहीत असे समितीने सुचविले आहे. उर्वरित महाराष्ट्रात असलेल्या विकासातील या त्रुटी दूर करण्यासाठी समितीने त्यावर काही उपाय सुचविले आहेत. शाश्वत विकास योजना आखणे गरजेचे आहे. यासाठी राज्यशासनाने सहकारी साखर कारखान्यांना पाण्याच्या सुयोग्य वापरासाठी सूक्ष्म सिंचन तंत्राच्या वापरामध्ये सहभागी करावे, काही प्रमाणात सक्ती व काही प्रलोभने यामध्ये वापरली जावी. गोडबोले समिती व १९९९ च्या पाणी कमिशनने सुचविल्याप्रमाणे ऊस उत्पादकांवर लागवडीबाबत मर्यादा लादाव्यात असेही कमिटीने सुचविले.

गटशेतीसाठी (Group farming) आधारभूत व्यवस्था निर्माण करून कृषी उत्पादकता वाढवावी, कृषी उत्पादन विपणन समितीची फेररचना करून साठवण क्षमता, विपणन सुविधा वाढवाव्यात तसेच शेतकऱ्यांना पतपुरवठा वेळेवर व्हावा हेही समितीने सुचविले आहे. पिकांवरील प्रक्रिया, संवेष्टन, हाताळणी, साठवणक्षमता याबाबी महत्त्वाच्या आहेत. या सर्वांची कोकण आणि दुष्काळ प्रवण क्षेत्रामध्ये

या सर्वांची कोकण आणि दुष्काळप्रवण क्षेत्रामध्ये जास्त गरज आहे. दुष्काळ प्रवण क्षेत्रामध्ये झुडपी गवतावर मोठ्या प्रमाणात पशुपालन केले जाते. या भागात पारंपरिक धनगर समाज शेळी, मेंढी, गाई, म्हशी (रवंथ करणारे प्राणी) मोठ्या प्रमाणात सांभाळतात. शेळी व मेंढ्यांच्या सांभाळ याभागात जास्त असल्याने त्यांच्यासाठी पशुवैद्यकीय सेवा सुरू व्हाव्यात असे सुचविले.

या भागात औद्योगिक विकास वाढविण्यासाठी लघू व मध्यम उद्योगाला प्राधान्य द्यावे, असेही समितीने प्रामुख्याने सुचविले आहे.

**४) कोकण व डोंगराळ क्षेत्रासाठी विशेष वागणूक :**

समितीच्या मते कोकण विभाग हा किनारपट्टीचा भूप्रदेश व डोंगराळ भाग जास्त आल्याने सहजतेने पाणी साठवणूक करणे शक्य नाही. म्हणून अशा विरोधात्मक स्थितीत पाणी साठविण्याच्या सोयी अधिकाधिक निर्माण करणे गरजेचे आहे. कोकणामध्ये तर पाऊस जास्त असल्याने रस्त्याच्या देखभाल मोठ्या प्रमाणात करावी लागते. शाळा, आरोग्य केंद्र यांच्या सुविधा सर्वांपर्यंत पोहचाव्यात यासाठी वेगळ्या प्रकारच्या योजना राबवाव्यात. यामध्ये पाणी अडवण्यासाठी छोटे बंधारे छोट्या आकाराचे जल विद्युत प्रकल्प राबवावेत. पाण्याची योग्य साठवणूक करून हिवाळ्यात व उन्हाळ्यात फळ उत्पादन घेण्यासाठी पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्यासाठी उपयोग करावा असे समितीने सुचविले आहे.

किनारी जिल्ह्यामध्ये असणाऱ्या बंदरांचा विकास व्हावा यासाठी प्रयत्न करणे गरजेचे मानले. या बंदरांचा विकास झाल्यास तेथे विद्युत निर्मिती मोठ्या प्रमाणात होऊ शकते. पूर्व पश्चिम रस्ते जोडण्यासाठी कोकण किनारपट्टी गरजेची आहे. हा भाग गरीब असल्याने त्याचा विकास महत्त्वाचा मानला आहे. मासेमारी व फळ उत्पादन या भागात मोठ्या प्रमाणात होत असल्याने तसेच मुंबई गोवा महामार्ग सहापदरी होण्यासाठी या भागाच्या विकासाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. कोकणामध्ये पर्यटन, मासेमारी व फळ उत्पादनाला या भागात मोठ्या प्रमाणात प्रगतीला वाव आहे. खोल समुद्रकिनारा कोकणाला लाभल्याने मासेमारीला मोठा वाव आहे परंतु मासे साठवणूक व टिकविण्यासाठी प्रक्रिया उद्योग वाढविणे फायद्याचे ठरेल. किनारी भागातील महामार्ग विकासबाबतही समितीने उपाय सुचविले आहे.

**५) खानदेशासाठी विकास व्यूहरचना :**

धुळे व नंदुरबार या भागात पीकरचनेत मोठा बदल आहे.कापूस उत्पादनात प्राबल्य असलेला हा भाग गुजरात व मध्यप्रदेश सीमेला लागून आहे. वस्त्र निर्मितीचा विकास नंदूरबारमध्ये मोठ्या प्रमाणात होऊ शकतो. जळगाव, नंदूरबार व धुळे हा भाग कोरडवाहू शेतीचा आहे. जल व्यवस्थापन व जल संवर्धन आणि सूक्ष्म सिंचन तंत्राचा वापर करणे या जिल्ह्यासाठी गरजेचे आहे. धुळे जिल्ह्यातील श्रीरामपूर येथे वापरलेले विकसित सिंचन प्रारूप सगळीकडे वापरावे असे समितीने सुचविले. या भागामध्ये रेल्वे सुविधा वाढविल्यास व्यापाराला मोठ्या प्रमाणात फायदा होईल. तसेच बरेच दिवसांपासून असलेली मनमाड-इंदोर रेल्वे जोडणी मालेगाव, जळगाव नंदूरबारला ही फायद्याची आहे ती सुरू करावी जेणेकरून व्यापाराला गती मिळेल असे समितीने सुचविले.

**६) विदर्भासाठीची विकास व्यूहनिती :**

प्रतिव्यक्ती उत्पन्नाबाबत महाराष्ट्रात मागे असणाऱ्या विदर्भाच्या मागासलेपणाची अनेक कारणे दिसतात. कृषिक्षेत्राचा अनिश्चित व कमी वृद्धिदर, खाजगी गुंतवणुकीचा कमी वेग, सिंचन, ऊर्जेची गुणवत्ता, उपलब्धता व ऊर्जेची जोडणी यामध्ये त्रुटी आणि शासनाचे दुर्लक्ष व उदासीनता ही प्रमुख कारणे समितीने विदर्भ उत्पन्नाबाबत मागे असण्याची सांगितली आहेत.

विदर्भातील मागासलेपणा दूर करण्यासाठी, विकासाला चालना देण्यासाठी समितीने काही घटकांच्या विकासाकडे लक्ष देण्याचे प्राधान्याने सुचविले. ज्यामध्ये कृषी व कृषी प्रक्रिया उद्योग, जंगले, खनिज संपत्ती, मासेमारी पर्यटन, कापड उद्योग, उर्जाक्षेत्र या क्षेत्रांचा समावेश होतो. विदर्भाची अर्थव्यवस्था कृषीवर अवलंबून असल्याने कापूस, डाळी व संत्रा उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. त्यावरील प्रक्रिया उद्योग विकसित करण्याची गरज समितीने मांडली आहे. महाराष्ट्रातील एकूण जंगल क्षेत्रापैकी ५३.२९% जंगलक्षेत्र विदर्भात आहे. उत्पन्न निर्मितीचा स्त्रोत यादृष्टीने जंगल क्षेत्राच्या विकासाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. मासेमारी व्यवसायालाही विदर्भात मोठी चालना मिळू शकते. महाराष्ट्रातील खनिज संपत्तीने समृद्ध भाग म्हणून विदर्भ ओळखला जातो. मॅगनीज, बॉक्साईट, युरेनिअम, मार्बल चुनखडीचा खडक, कोळसा, अभ्रक, ग्रॅफाईट यांचा मोठा साठा विदर्भात आहे. नवीन अभ्यासानुसार मध्य भारतातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वांत जास्त खनिज संपत्ती विदर्भात आहे. त्याचा वापर योग्य पद्धतीने व्हावा हे समितीने सुचविले आहे.

IT, ITES, जंगल आधारित उद्योग, सिमेंट, धातू प्रक्रिया उद्योग, स्टील व पोलाद, ऑटोपार्टस्, शेती अवजारे अशा विविध उद्योगांची निर्मिती विदर्भात व्हावी जेणेकरून विकासाला चालना मिळते. विदर्भात कापूस उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असल्याने येथे वस्त्रोद्योग निर्माण होणे गरजेचे आहे. जिनींग, प्रेसिंग युनिट शिवाय विणकाम, रंगकाम, गारमेंटस् व्यवसाय सुरू व्हावेत. यासाठी अनेक उपाय अहवालात सुचविले आहेत. याशिवाय उर्जाक्षेत्र, पर्यटनाबाबतही समितीने शिफारशी सुचविल्या आहे. समितीने विदर्भासाठी काही महत्त्वाच्या उद्योगांबाबत मोठा धक्का देण्याची गरज मांडली आहे. तसेच विदर्भात जे प्रकल्प अपूर्ण आहेत ते पूर्ण करण्याला प्राधान्य द्यावे यासाठी शून्याधारित अर्थसंकल्पाचा आधार घ्यावा असे सुचविले.

**७) विदर्भ व मराठवाड्यासाठी वृद्धी परिप्रेक्ष्य:**

संतुलित प्रादेशिक विकासासाठी दरडोई उत्पन्नात समान पद्धतीने वाढ होणे गरजेचे मानले आहे. येत्या १२ ते १५ वर्षात सर्व विभागातील विषमता १/३ ने कमी व्हावी असे लक्ष्य निर्धारित करण्याचे समितीने सुचविले. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी विदर्भ व मराठवाड्याचा वृद्धिदर सातत्याने वाढला पाहिजे. हे समितीने प्रामुख्याने मांडले आहे.

महाराष्ट्राच्या संतुलित विकासाचे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी औद्योगिक विकासाला समितीने प्राधान्य दिले आहे. यासाठी अनेक प्रकल्पांना मोठा धक्का देण्याची गरज आहे. अनेक संस्थांचे आधुनिकीकरण, संबंधित सर्व घटकांचा एकत्रित विचार, आवश्यक अंमलबजावणी आणि गरज असेल तेथे विकेंद्रीकरण या बाबी समितीने महत्त्वाच्या मानल्या. सार्वजनिक वस्तूची सहजतेने व समानतेने

उपलब्धता आणि आर्थिक विकासाच्या सर्वांगीण फायदा मिळावा यासाठी प्रत्येक क्षेत्रामध्ये त्याची उपलब्धता सुचविली आहे. तरच महाराष्ट्राचा समतोल विकास शक्य आहे अशा प्रकारचा सर्वांगीण विकासाचा विचार केळकर समितीने केला आहे व त्यावर अनेक महत्त्वपूर्ण उपायही सुचविले आहेत.

**८) समारोप :**

केळकर समितीने महाराष्ट्राच्या प्रादेशिक विषमतेबाबत जो अहवाल महाराष्ट्र शासनाला सादर केला त्यामध्ये असणाऱ्या पाचव्या प्रकरणामध्ये विदर्भ, मराठवाडा, उर्वरित महाराष्ट्रातील विषमता मांडली आहे. त्याच्या कारण मीमांसेबरोबरच जे उपाय सुचविले त्यामध्ये प्रामुख्याने लक्षात येते की समितीने प्रत्येक विभागाचा बारकाईने अभ्यास केला आहे प्रत्येक विभागातील बलस्थाने व त्रुटी, समस्या कोणत्या ? कोणत्या विभागात कशाचा विकास करण्याला प्राधान्य द्यावे हे अतिशय सविस्तररित्या मांडले आहे.

जर केळकर समितीने सुचविलेल्या उपायांचा धोरणकर्त्यांनी अवलंब केला तर महाराष्ट्राचा प्रादेशिक विकास प्रत्यक्षात घडून येईल.

**संदर्भ :**

1) Govt. of Maharastra (2013) : Report of the high level committee on balance regional development.

◆◆◆

# Comparative Appraisal of the Report on High Level Committee on Balanced Regional Development Issues in Maharashtra

**Manjusha Musmade**
HOD, Economics Department,
Nowrosjee Wadia College, Pune.

**1. Introduction :**

Historically, the existence of backward regions started from the British rule in India. The British helped the development of only those regions which possessed facilities for prosperous manufacturing and trading activities. The issues and problems related to the balanced regional development were considered seriously in the Sixth Five Year Plan [1980-85. It is now commonly accepted that the balanced regional growth is necessary for the harmonious development of a federal state such as India.

**1.1 Regional Imbalance :**

The co-existence of relatively developed and economically depressed states and even regions within each state is known as regional imbalance. This can be natural due to unequal natural endowments or man-made in the sense of neglect of some regions and preference of others for investment and development effort. Economic backwardness of a region is indicated by symptoms like high pressure of population on land, excessive dependence on agriculture leading to high incidence of rural employment, absence of large scale urbanization, low productivity in agriculture etc.

**1.2 Objectives of the Paper :**

1] To understand the concept and issues of Regional Imbalance in Maharashtra.
2] To study in details the various aspects of the Report on balanced regional development in Maharashtra led by Vijay Kelkar.
3] To present a comparative appraisal of the Kelkar report mainly on the basis of the methodology, vision and approaches .
4] To summarize and give conclusions of the paper.

**1.3 Key Words :**

Regional imbalance, Fact Finding Committee, Indicators and Backlog Committee, growth strategy, outcome indicators.

**1.4 Limitations :**

1. Due to word constraints, the present paper mainly concentrates around the comparative appraisal of methodology, vision and approach of the concerned Committee with the earlier two committees on the same issue.

2. The High Level Committee on the Issues Balanced Regional Development in Maharashtra-

**2.1 Nature and Working of the Committee :**

The Committee set up in June 2011, submitted its report to the Government of Maharashtra on behalf of the Planning Department in October 2013. The Chairman Dr. Vijay Kelkar who also headed the 13th Finance Commission for Centre-State Financial allocations was supported by 14 members who are distinguished experts in the field. Dr. Abhay Pethe, Dr. Abhay Bang, Dr.Madhav Chitale, Dr.Vinayak Deshpande, Dr. Dilip Nachane are to name a few among them. The Committee also had government officer Shri K.P. Bakshi as the member secretary.

It is mentioned in the preface of the Report that each member of the Committee gave tirelessly enormous amount of time and efforts towards completion of the Report and it was done entirely on the 'pro-bono' basis i. e. without any financial or pecuniary benefits to the members. This is indeed a very noteworthy plus point of the Committee.

The Committee visited the Nagpur, Aurangabad, Nashik, Konkan and Pune Administrative Divisions in the State twice each and it gave three visits to Amravati Division. These visits were intended to take into consideration the perception of the stakeholders about Regional Imbalance. Various stakeholders such as elected representatives at various levels of governance, members of different political parties, the non-government organizations and the general public were widely interviewed on the issue of regional development. The Report states that almost all the stake holders displayed unanimity in expressing their view that 'district' ought to be considered as the unit of analysis by the present Committee. Also, during the meetings, specific issues of tribal population in Gadchiroli were raised. The Committee recognized these as pertinent and important and appointed Special Study Group to look into the issues related to tribal communities.

The uniqueness of the Report is that it presented a review of the earlier two committees worked in the same field. It was a noble act on the part of the Committee to express a sense of gratitude towards many experts and professionals, government officers who contributed directly or indirectly to the fulfillment of the Report.

The Committee had several meetings during its period between June 2011- October 2013. The Committee in its first meeting held on June 22, 2011 decided its methodology of working and appointed seven sub-groups and commissioned 11 studies through the experts on the panel. The seven Intra-Committee Sub- groups were intended to cover all possible issues related to balanced regional development. These sub-groups were made for the following major issues -

1] Water Resources 2] Agriculture 3] Industry and Infrastructure development 4] Education 5] Governance 6] Health and 7] Tribal Areas.

The concern of the tribal areas as a separate dimension for making provisions for the balanced regional development in the State can be seen as an unique approach of the Committee. This clearly reflects that the question of regional imbalance in the State is complex one and has multiple dimensions and requires a strategic and an analytical approach.

Another noteworthy point about the Committee was that it mobilized the Nagpur University, Marathwada University, Punjabrao Deshmukh Agricultre University, Mumbai University, Gokhale Institute of Politics and Economics, Pune YASHADa Pune, WALMI, Aurangabad and other such research institutions in its working process. This obviously added to the plus points of the Committee.

For a Committee like the concerned one, it was important to use the latest data possible to get the real issues and facts about the balanced regional development. It is the credit of the Committee that almost the entire working of the Committee is based on the latest available 2011 Census data.

The Committee was confident enough when it submitted its final report in October 2013, and believed that the Report covers all the Terms of References assigned to it. In fact, it claimed, in some sense, it has gone further by introducing an innovative approach of covering water-stressed Talukas and Tribal Areas of the State. The Committee divided the regions as 'Virtual or Imagined' regions for proposing special measures to ameliorate the development challenges of these regions. Equally, it has proposed policy measures for ensuring drinking water security for all and universal health care that will take the development policy of Maharashtra State at a very cutting edge. The Report mentions that they hope that it will shift the focus of the development policies debate away from the 'backlog' to 'growth acceleration and governance reforms.'

**2.2 Limitations of the Report :**

The Report though boasts of having fully discharged the task assigned to them,

it clearly admits that they had to depend on the data provided by the official agencies and the data they received was not always comparable. It tried to lay its hand on the most updated data and requested the concerned departments to provide the same. However, due to various constraints faced by some departments, latest data could not be available despite the best efforts.

Second limitation of the Report is stated as it does not deal in details the political dynamics of the issues related to regional development. Similarly, the emerging development issues such as environment, employment generation and urbanization have only been flagged and not fully dealt due to the constraint of time and the availability of the data. This is no doubt, a serious weakness of the Report and no multi-dimensional and comprehensive study like the present one can be complete, considering various constraints, challenges and limitations faced in the reality.

**2.3 Terms and References of the Committee -**

1] To decide the indicators for estimating the imbalance in regional development.

2] With the reference to the above, to determine the imbalance in development in the context of the State's development average on the basis of latest available data at the end of the year 2010. While doing so, direct investment / expenditure of the state government and investment in the private industrial sector with the help of state and Central government is taken into consideration.

3] To decide the indicators which can be implemented on priority from the indicators ascertained.

4] To suggest measures for the removal of imbalance so ascertained and principles of allocation of development fund and also suggest measures so that backlog will not be created in the future and suggest the role of the Development Boards in this regard.

The important term and reference of the Committee stated in the Report is that the Committee itself will decide the methodology of its working.

**2.4 Comparative Appraisal :**

The Committee differs from the earlier committees in many aspects, especially considering its methodology, vision and approach to look at the issues related to the balanced regional development. It clearly states that its approach in dealing with the problem of regional imbalance was put in the context of the past history of the policies. It boasts of a 'shift of paradigm' regarding the thinking on balanced regional development in the state. It considered a 'district' as a unit of analysis as against the 'region' in the earlier studies.

The Chapter Four of the Report is devoted to the comparative appraisal of the earlier bodies working for the balanced regional development.

As is said earlier, the issue of regional imbalance is quite historical and a couple of Committees were set up by the government of Maharashtra since its inception. Though, all the committees aim at the balanced regional development in the state, there are major differences in the approaches and methodology of these committees.

The Kelkar Committee Report clearly mentions the differences in its approach compared with the earlier committees. It states- 'The approach so far was excessively focused on physical inputs and financial allocations alone. This approach has proved to be ineffective and inadequate according to the Kelkar Committee Report. It according to the Report, implicitly adhered to 'one size fits all' principle which is not correct for considering balanced regional development.' According to the Report, several aspects and sources of growth, issues of governance, supportive policies etc. distinguished by regions were not sufficiently considered in the earlier reports.

On the other hand, this Committee has emphasized greater focus on the outcomes and advocated monitoring of outcomes as the principle focus. It recognizes the importance of the physical and financial inputs as relevant policy instruments without making a fetish of them. It has suggested several policy and government reforms as well as different decentralized arrangement for regional planning and allocation. Similarly, the Committee has suggested 'formula based allocations'.

Their approach is of participatory nature in the sense that Committee visited all the revenue divisions and had extensive meetings attended by guardian ministers and other elected representatives such as MPs, MLAs and Local Body Members, the members from various local Non-government Organizations, experts in the field and the general public. This obviously enabled the Committee to elicit the stakeholders' views in their report. Their findings are based on the learning from these meetings and visits. This was not done by the earlier two committees.

A rapid review of the two major committees that shaped much of the policies for removal of the regional imbalance by the state government, namely the Fact Finding Committee [1983-84 ]and the Indicators and the Backlog Committee [1995-97] is given below.

The Fact Finding Committee on Regional Imbalances under the chairmanship of V. M. Dandekar was set up in 1983 to study the problems and issues

concerned with the regional imbalance in Maharashtra and give suggestions to reduce the same. However, the Government of Maharashtra did not accept the recommendations made in the Report but made certain allocations of resources as suggest by it. The Committee mainly focused on the making up of the financial cost for reducing regional imbalance.

The Indicators and Backlog Committee [1995] was made of only three members who were a part of the FFC as well. Both focused on the 'financial backlog'among different regions in the State. This led to misleading notion that expenditure equalization would guarantee development equalization. This is a paradoxical outcome. Both the committees assumed 'capacity to translate rupee worth of financial resources in 'tangible outcomes' would be uniform across the regions/ districts. They also presumed identical quality of governance, which does not exist in the reality.

**2.5 Main Findings of the Kelkar Committee :**

On the above backdrop an overview of the main findings is presented below.

1] The Committee found a clear evidence of great appetite for rapid inclusive growth in all regions of the State.

2] It also felt a need for greater decentralization and regional empowerment. It mentioned in its report that water is central to the concerns everywhere and needs to be addressed in a nuanced fashion.

3] There is a 'trust deficit' as far as the credibility of action by the government is concerned.

4] It recognized the levels of mobilization of capital, both public expenditure and private investment is uneven across regions and also at the intra-region level.

5] The Committee opined that the Tribal Areas and water -stressed Talukas have special and pressing development challenges.

One of the major features in the findings of the Committee is that the Report is based on the Outcomes and not on the Inputs as was the case in the other earlier committees.

**2.5.1 Outcome Indicators :**

A summary of the Outcome Indicators used in the Report would show clearly the detailed thought of the Committee on the issue of regional development. These indicators were grouped into three heads and many sub-groups.

1] Income- It measured regional disparity in terms of per capita income of the region at constant prices. It observed that the PCI of Marathwada region is 40% lower and that of Vidarbha at 27% lower than that

of rest of Maharashtra. This ratio has gradually deteriorated in Marathwada and Vidarbha during past ten years. The pre-existing disparity among these regions was at o.66 and 0.82 respectively which further worsened by 0.07 and 0.06 respectively.

2] Irrigation- The Report states that the irrigation facility increased at a faster rate in Pune division in the Rest of Maharashtra but remained deficient especially in Amaravati, Aurangabad and Konkan divisions between 1982-2010. However, it also showed a positive sign with that the gap in the growth rate among these regions has narrowed in recent years.

3] Sectoral Outcome Indicators- Apart from the main outcomes of income level and irrigation facility, the Committee recognized various indicators at the sectoral level. These are Connectivity, Education and skill development, Health, Credit availability, Power and the last but not the least important is- Development Gap.

**2.5.2 Growth Strategy :**

The Committee mainly focused on the comprehensive issues related to the balanced regional development in Maharashtra and obviously studied and suggested a general guideline for the growth strategy of the less developed regions in the state, such as Vidarbha, Marathwada, Konkan and also the Rest of Maharashtra. According to the Committee, Vidarbha growth strategy will need to urgently tackle the agricultural setback and exploit the strengths of region with greater resource flows from the public and also the private sector accompanied with necessary policy government reforms. Also, it suggested to develop and increase the major and minor ports, increase the cargo and passenger handling along the coast, to develop tourism and overall commercial potential of the Konkan region. In all, the Committee stresses on the development of rail and road and air connectivity in every district of the state for the future growth and balanced development.

**2.5.3 Estimates till 2027 :**

Every good report has to give a prospective estimate for future period. This Report gives financial estimates till 2027 i.e. till the period of the 14th Five Year Plan. With the withering away of the Planning Commission and quite an uncertainty about the nature and working of the newly established NITI Ayog in its place, these estimates have to be considered at random.

At the present growth rate of public expenditure and the inflation rate of 5% per annum, the Committee estimates Rs. 23-24 lakh crore at the current prices for fulfilling its suggestions till 2027. This seems to be feasible and attainable.

The main concern of the Committee is the water deficit in the State and it has stressed on the resource allocation to tackle

the problems of water shortage. It has suggested that the future plan resources should be divided into the general sector and water sector in 70:30 ratio. This clearly shows the concern of the Committee about the scarcity of water resource. It also recognizes water deficit at different levels- such as drinking water deficit and development deficit.

**2.5.4 Recommendations :**

One more specialty of the Committee lies in its vast and comprehensive natured recommendations for achieving regional empowerment. The Report states as many as 146 recommendations divided into nine sub-groups. These are about -

1] Regional allocation for the plan resources- As is mentioned earlier the resources were divided into general and water sector in 70;30 ratio. There are 16 suggestions in this sub-group.

2] Governance- There are 15 recommendations suggesting the restructuring and streamlining the Regional Development Boards with the chief minister as the chairman and senior most minister as the executive chairman including two eminent citizens and two experts from that region.

3] The 18 recommendations on the development of the Tribal areas focusing on two tribal universities- Gondwana at Gadchiroli and new one in Thane-Nashik region.

4] Seventeen recommendations were made related to the role and challenges of agriculture consisting of regional watershed mission, cotton mission for Vidarbha and Marthwada, fodder and livestock improvement mission etc.

5] For spreading industrialization in the State, the Committee recommended 2% rebate on sales tax and one percent reduction in the interest rate on borrowed capital from banks in Vidarbha region. There are in all 12 recommendations in this sub-group.

6] For the development of water resources there were made the highest number of recommendations [30], which included a new definition of 'irrigated land'- one which recives assured water supply for at least 8 months in a year and for rural as well as for the urban areas, minimum availability norm for water should be 140 liters per capita per day.

7] The Committee recognizes the health of the people in the mission for balanced regional development through universaliazation. In its seven suggestion, it stated the health deficit score for Vidarbha at 121.8, for Marathwada at 108.9 and for the Rest of Maharashtra at 69.3. It suggested universal health care to be introduced in four phases.

8] Regarding education issue in all the regions, the Committee wen Beyond Right to Education and gave 14 suggestions including school accreditation at the secondary level.

9] The last sub-group deals with widening connectivity in the State through 16 new roads/ national highways with total length of 7,035 km. to connect eastern end of the State to the western end and from the north to south. There are in all nine recommendations.

**3. Conclusions :**

Thus, it could be easily understood that the Kelkar Committee has a more realistic and comprehensive vision and approach as compared to the earlier committees. It wants to universally equalize access to the basic public goods and equitably allocate the public resources and bring about the policy institutions and governance reforms that would crowd the private investment for raising growth in the lagging regions by leveraging their comparative dynamic advantage.

The Committee also makes a due appraisal of the working of the Development Boards constituted as per the provision of the Article 371[2] of the Indian Constitution. It was guided by the vision and spirit of the Nagpur Pact. It has also looked at the international experience and consulted a rich body of literature for the concerned problem. It also analyzed the economy as a whole in the light of globalization and open policies.

Thus, the Committee has tried its best to present a holistic picture and analysis of the regional imbalance in Maharashtra. It has also shown the way and strategy for achieving regional empowerment. The Committee could be regarded as the and effective one on the grounds of the methodology, vision and approach used in its analysis as compared to the various earlier bodies on the issues related to the regional imbalances in Maharashtra. Now, it is on the part of the policy makers and the authority to take the right steps towards removing the regional imbalance. Indeed, we have miles to go before we achieve the high task of balanced regional development!

**References :**

1] Report of The High Level Committee on Balanced Regional Development - Issues in Maharashtra, Government of Maharashtra, Planning Department, October 2013.

2] Articles and news reports in the News papers -
The Times of India [24-12-2014],
Business Standard [25-12-2014],
DNA[24-12-2014],
The Hindu [23-12-2014,
Free Press Journal [24-12-2014]

◆◆◆

ISSN 2320-0197

# महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकास प्रश्नावरील उच्चस्तरीय समितीच्या प्रमुख निष्कर्ष व शिफारशींचा मागोवा.

**विजय रमाकांत रोटे**
सहयोगी प्राध्यापक,
बा.बु.कला, ना.भ. वाणिज्य व बा.पा.विज्ञान महाविद्यालय,
दिग्रस.

**१. प्रस्तावना :**

महाराष्ट्राचा समतोल प्रादेशिक विकास करणे हे महाराष्ट्र राज्याचे प्रमुख ध्येयधोरणांपैकी महत्वाचे धोरण आहे. महाराष्ट्राचा प्रादेशिक समातोल साधुन विकास साध्य करण्यात अनेक गुंतागुंतीच्या समस्या आहे. या सर्व समस्यांचे अध्ययन करण्याच्या हेतूने महाराष्ट्र राज्य शासनाने माननीय राज्यपालांच्या निर्देशांना अनुसरून दि. ३१ मे २०११ रोजी समतोल प्रादेशिक विकासाचे बाबतीत एक उच्चस्तरीय समितीची स्थापना मा श्री. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली केली होती.

राज्यातील विभिन्न प्रदेशातील लोकांशी विचार विमर्श उपलब्ध आधारसामग्रीचे अनुभवधिष्ठीत विश्लेषण, उपगट अहवालांचा विचार याचा आधार घेऊन या समितीने आपला दृष्टीकोण मांडला आहे. या समितीने मांडलेल्या बहूआयामी दृष्टीकोणात अंतर्भूत असणाऱ्या प्रमुख बाबी पुढील प्रमाणे सांगता येतील.

* योजनातंर्गत निधीमध्ये मराठवाडा व विदर्भ यासारख्या मागे पडलेल्या प्रदेशांचा हिस्सा वाढविणे.
* सार्वजनिक क्षेत्राच्या साधनसंपत्तीचा प्रभावी वापर करण्यासाठी संस्थात्मक सुधारणा करणे.
* अभिवृध्दीचा दर गाठण्यासाठी खाजगी गुंतवणूकीचा विचार करणे.
* कायमस्वरूपी समातोल साधण्यासाठी प्रादेशिक व स्थानिक स्तरावर अधिकार प्रदान करून उत्तरदायित्वाच्या संदर्भात सुधारणा करणे.

या समितीने अहवालामध्ये निष्कर्ष व शिफारशी मांडताना विकास धोरणांचा वादाचा केंद्रविंदू अनुशेषा कडून अभिवृध्दी वेग आणि मार्गदर्शक सुधारणा याकडे सरकेल असा आशावाद व्यक्त केला आहे. या अहवालातील प्रादेशिक समतोलाबाबतचा दृष्टीकोण या अगोदरचे समित्यांच्या दृष्टीकोणापेक्षा वेगळा आहे. पुर्वीच्या अध्ययनामध्ये वित्तीय नियत वाटप हे केंद्रियस्थानी होते तर या अहवालात फलनिष्पिती व फलनिष्पत्तीचे सनियंत्रण या बाबी केंद्रस्थानी आहे. त्यामुळे हया अहवालात प्रादेशिक नियोजन व नियतवाटप याकरिता अनेक धोरण व नियमन सुधारणा व विविध विकेंद्रित व्यवस्था सुचविल्या आहेत.

**२. फलनिष्पत्ती निर्धारके :**

प्रस्तुत अहवालामध्ये विकासाचे निर्धारण करण्यासाठी फलनिष्पतीचा आधार घेण्यात आला आहे. यासाठी समितीने काही फलनिष्पती निर्धारके निष्चित केली आहेत.

**अ) उत्पन्न :**

राज्यातील प्रगतीचा आढावा घेतल्यास मानव विकास निर्देशांकामध्ये काही प्रमाणात वाढ झाली आहे. असे असूनही २०००-०१ ते २००९-१० या कालावधीमध्ये प्रादेशिक दरडोई उत्पन्न भिन्नतेचे प्रमाण चिंताजनक आहे. पुढील तक्त्यामध्ये हे प्रमाण संक्षिप्तपणे दर्शविले आहे.

**तक्ता क्र. १**

**प्रदेशांचे दरडोई उत्पन्न (२००४-०५ स्थिर किंमती)**

(२०११ च्या जनगणेनेवर आधारीत) रक्कम रूपयांमध्ये

| अ.क्र | प्रदेश | २०००-०१ | | २००९-१० | |
|---|---|---|---|---|---|
| | | रक्कम | प्रमाण | रक्कम | प्रमाण |
| १ | उर्वरित महाराष्ट्र | २३४५२ | १.०० | ६८८१८ | १.०० |
| २ | मराठवाडा | १५५९५ | ०.६६ | ४०८२४ | ०.५९ |
| ३ | विदर्भ | १९३३६ | ०.८२ | ५२२८२ | ०.७६ |
| ४ | महाराष्ट्र | २२८०३ | - | ६०७०८ | - |

वरील तक्त्यामध्ये उर्वरीत महाराष्ट्राच्या दरडोई उत्पन्नाच्या तुलनेत मराठवाडा व विदर्भ यांचे दरडोई उत्पन्न हे उर्वरित महाराष्ट्राच्या दरडोई उत्पन्नापेक्षा कमी असून मराठवाड्याचे ४० टक्के कमी आहे. तर विदर्भाचे दरडोई उत्पन्न हे २७ टक्के कमी आहे.

उर्वरित महाराष्ट्राच्या उत्पन्नाची तुलना केली असता मराठवाडा व विदर्भ याप्रदेशांमध्ये उत्पन्नात क्रमश: घट झाली आहे. पुर्वीच्या तफावती मध्ये (०.६६ व ०.८२) अधिक वाढ होत गेली असून अनुक्रमे ०.०७ व ०.०६ एवढी झाली आहे.

**ब) सिंचन :**

१९८२ -२०१० या दीर्घकाळामध्ये उर्वरित महाराष्ट्रातील पुणे विभागामध्ये जलद प्रमाणात सिंचनात वाढ झाली आहे. परंतु अमरावती, कोकण व औरंगाबाद विभागांमध्ये सिंचनात तूट राहिली आहे. १९६० ते १९८२ याकाळातील ओलीताखालील जमिनीचा वार्षिक वाढीचा दर हा जवळपास सारखा होता. तेव्हापासून तो उर्वरित महाराष्ट्राच्या विभागांमध्ये तीन दशकांहून अधिक काळ उच्चत्तर राहिलेला आहे.

**क) क्षेत्रिय फलनिष्पती निर्देशांक.**

महाराष्ट्रातील प्रदेशांतील विकास तुट ही क्षेत्रिय फलनिष्पती निर्देशांकांवरून मोजण्यात आलेली आहे. यानुसार विकास तुट ही विदर्भ ३९ टक्के, मराठवाडा ३७ टक्के तर उर्वरित महाराष्ट्र २४ टक्के अशी होती.

तक्ता क्र. २

विकासातील तफावत (प्रमाण)

| घटक भारांक | विदर्भ | मराठवाडा | उर्वरित महाराष्ट्र | संपर्क जाळे |
|---|---|---|---|---|
| ०.२० | ०.४३ | ०.३१ | ०.२६ | शिक्षण व कौशल्य विकास |
| ०.२० | ०.३६ | ०.३८ | ०.२५ | आरोग्य |
| ०.२० | ०.४१ | ०.३६ | ०.२३ | कर्ज उपलब्धता |
| ०.२० | ०.३६ | ०.३७ | ०.२७ | वीज |
| ०.२० | ०.३८ | ०.४३ | ०.१९ | विकासातील तफावत |
| १.०० | ०.३९ | ०.३७ | ०.२४ | |

**३. व्यूह रचना :**

प्रादेशिक असमतोलाबाबत समितीचा दृष्टीकोण विषद करणाऱ्या दोन विचारधारा आहेत.

* सार्वजनिक वस्तूंची समान उपलब्धता व उपयोग करण्याची संधी. यामुळे प्रदेशांमध्ये किमान विकासाची तुलना करता येईल.
* पायाभुत सुविधांची विकास करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक साधनसंपत्तीचे समन्यायी नियतवाटप करून प्रादेशिक आर्थिक वुध्दीला गती देणे. अशा प्रकारच्या पायाभुत सुविधांची सशक्तीकरणामुळे खाजगी गुंतवणूकीला चालना मिळेल.
* आदिवासी क्षेत्र व पाण्याची गंभीर समस्या असलेल्या तालुक्यांच्या विशेष व तातडीच्या गरजा निश्चित करतांना समितीने वास्तवात्मक अथवा कल्पित प्रदेश म्हणून मान्यता देवून प्रदेशाची संकल्पना मांडली आहे.

**४. प्रादेशिक विकास धोरण :**

या अहवालामध्ये विचार करण्यात आलेल्या विकास धोरणामध्ये प्रदेशांची साधनसंपत्तीवर आधारित प्रतिमा विचारात घेतलेली असून गतीमान शाश्वत विकासाचे ध्येय ठेवलेले आहे. विकास धोरण निश्चित करताना विवादीत सर्वांसाठी एकसमान तत्व समितीव्दारे कटाक्षाने दूर ठेवण्यात आलेले आहे.

**५. शिफारसी :**

केळकर समितीने आठ क्षेत्रावर लक्ष केंद्रीत केले आहे. प्रशासन, आदिवासी विकास, कृषी, औद्योगिकीकरण, पाणी, आरोग्य, शिक्षण, आणि दळणवळण. सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय घटक विचारात घेतल्यामुळे केळकर समितीच्या शिफारसी सर्वसमावेशक स्वरूपाच्या आहेत.

**अ) योजनांतर्गत साधनसंपत्तीचे प्रादेशिक नियतवाटप :**

योजनांतर्गत साधनसंपत्तीची विभागणी सर्वसाधारण क्षेत्र व जलक्षेत्र या दोन क्षेत्रांमध्ये ७०:३० या प्रमाणात करण्यात आली आहे.

१) जलक्षेत्राच्या नियतवाटपामध्ये पाण्याची गंभीर समस्या असलेले ४४ तालुके, भूस्तर प्रतिकूल असलेले ८५ तालुके, खारपाण पट्टा व मालगुजारी तलाव यादृष्टीने महत्वपूर्ण चार क्षेत्रासाठी नियतवाटपात प्राधान्य देण्यात आले आहे.

* पाण्याची गंभीर समस्या असलेले ४४

तालुक्यांसाठी १७९८ कोटी रूपये
- भुस्तर प्रतिकूल तालुक्यांसाठी १७३२ कोटी रूपये
- मालगुजारी तलावांसाठी २५२० कोटी रूपये.
- खारपाण पट्ट्याकरिता ५४२ कोटी रूपये.

एकूण जलतुटीचे वाटप करताना विदर्भाचा वाटा ३५.२६ टक्के, मराठवाडयाचा वाटा २१.५९ आणि उर्वरित महाराष्ट्राकरिता ४३.१५ टक्के असे प्रमाण निर्धारित करण्यात आले आहे.

२) सर्वसाधारण क्षेत्र या अहवालानुसार सर्वसाधारण क्षेत्रासाठी नियतवाटप करताना विभाज्य व अविभाज्य घटकांमध्ये ६०:४० या प्रमाणात संसाधनाचे नियतवाटप करण्यात यावे. साधनसंपत्तीचे विभाज्य व अविभाज्य कोष तयार करण्यात यावा तसेच विभाज्य साधनसंपत्तीचे वाटप एकूण विकास तुट याअंतर्गत तीन क्षेत्रांमध्ये त्यांचे समितीच्या शिफारशीनुसार नियतवाटप करण्यात यावे. ही साधनसंपत्ती प्रादेशिक मंडळाच्या ताब्यात ठेवण्यात यावी. खालील तक्ता क्र. ३ मध्ये मुंबई वगळून सर्वसाधारण क्षेत्रासाठी खालील घटकांच्या आधारे विभाज्य संकोषाची तीन प्रदेशांमध्ये विभागणी केली आहे.

**तक्ता क्र. ३**

**मुंबई वगळून टक्केवारी (सर्वसाधारण क्षेत्र)**

| घटक | भारांक | विदर्भ | मराठवाडा | उर्वरित महाराष्ट्र |
|---|---|---|---|---|
| लोकसंख्या | ४५ | २३.०३ | १८.७४ | ५८.२३ |
| विकासातील तफावत | २५ | ३८.८३ | ३७.२५ | २३.९२ |
| दरडोई उत्पन्न | २० | ३७.६७ | ४३.२८ | १९.०५ |
| क्षेत्र | १० | ३१.७२ | २१.१० | ४७.१८ |
| एकूण टक्केवारी | १०० | ३०.७८ | २८.५१ | ४०७१ |

३) जलक्षेत्र व सर्वसाधारण क्षेत्र यासाठी एकूण प्रादेषिक नियतवाटपाचे तीन प्रदेशातील वाटप पुढील प्रमाणे विशद करण्यात आले आहे. विदर्भ ३३.२४ टक्के, मराठवाडा २५.३१ टक्के तर उर्वरित महाराष्ट्र ४१.४५ टक्के असे करण्यात आले आहे.

**ब) सुशासन : महत्तम प्रादेशिक सक्षमीकरण आणि उत्तरदायित्वाबाबत शिफारसी.**

- प्रादेशिक विकास मंडळाची पुनर्रचना. यामध्ये मुख्यमंत्री - अध्यक्ष, जेष्ठ मंत्री - कार्यकारी अध्यक्ष, त्याप्रदेशातील सर्व मंत्री, दोन विधानसभा व विधानपरिषद सदस्य, स्थानिक स्वराज्य संस्थांचे दोन अध्यक्ष, त्याप्रदेशातील दोन सन्मान्य नागरिक अशा प्रकारे मंडळाची रचना करण्यात यावी. अप्पर मुख्य सचिव व प्रादेशिक विकास आयुक्त हे सदस्य सचिव असावेत.
- नागपुर करारातील प्रमुख बाबींना चालना देण्यासाठी महत्वाची मंत्रालयीन विभागांची तीनही प्रदेशांमध्ये समन्यायी विभागणी व्हावी.
- राज्यातील सांख्यिकी यंत्रणा बळकट करण्यासाठी राज्य सांख्यिकी मंडळ ही नविन संस्था स्थापन करण्यात यावी.

- धोरण संस्था मध्ये नविन सार्वजनिक धोरण व्यासपिठे, महाराष्ट्र संशोधन परिषद, प्रादेशिक शासन संस्था स्थापन करण्यात याव्यात.
- प्रादेशिक मंडळाव्दारे प्रदेशाच्या विकास आराखडयाचे नियोजन, पर्यवेक्षण व संनियंत्रण करण्यात यावे.
- विदर्भाच्या खनिज संपत्तीमधून निर्माण होणारे स्वामित्वधन हे स्थानिक क्षेत्र विकासासाठी वापरण्यात यावे.
- प्रदेशात निर्माण होणारी वीज त्या प्रदेशाला कमी दराने उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच वीज महसुलातील काही वाटा पुनवर्सन, प्रदूषण नियंत्रण स्थानिक विकास यासाठी वापरण्यात यावा.

**क) नवीन शेतीपद्धती मधील भूमिका व आव्हाने :**

- विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्राकरिता प्रादेशिक पाणलोट क्षेत्र अभियान निर्माण करावे.
- कोरडवाहू जमिनीच्या विकासासाठी कोरडवाहू जमिन कृषी विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी.
- विदर्भ व मराठवाडाकरिता कापूस आणि पुर्व विदर्भाकरिता भात अभियानाची सुरूवात करावी.
- विदर्भ व मराठवाडामध्ये वैरण व पशुधन विकास अभियानाची शिफारस.
- प्रादेशिक फलोत्पादन मिशनची स्थापना
- सुक्ष्म सिंचन व यांत्रिकीकरण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीकरिता महाराष्ट्र कृषी अभियांत्रिकी कंपनी स्थापन करण्यात यावी.
- कृषी हवामान विशयक स्थिती समजून घेण्यासाठी चंद्रपूर येथे कृषी व वनिकरण विद्यापीठाची स्थापना करावी.
- शेतीच्या मानवी साधनसंपत्तीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी प्रत्येक तालुक्यामध्ये एक कृषी महाविद्यालयाची स्थापना करण्यात यावी.
- प्रत्येक प्रदेशाकरिता शेतकरी महिला प्रशिक्षण संस्था असावी.
- भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या धर्तीवर ५०० कोटी रूपयांच्या प्रारंभिक अनुदानासह महाराष्ट्र कृषी संशोधन परिषदेची स्थापना औरगांबाद येथे करण्यात यावी.
- कृषी उद्योगाच्या विकासासाठी चार प्रादेशिक कृषी उद्योग विकास महामंडळे निर्माण करण्यात यावीत.

**ड) औद्योगिकरणाचा प्रसार :**

- विदर्भ प्रदेशात वस्तुनिर्माणास चालना देण्याच्या उद्देशाने खाजगी गुंतवणूकीस चालना देण्यासाठी विक्रीकरात २ टक्के सुट देण्यात यावी.
- सुक्ष्म, लहान व मध्यम उद्योगांना चालना देण्यासाठी त्याच्यासाठी सुक्ष्म, लहान व मध्यम उपक्रम पत हमी महामंडळाची स्थापना करण्यात यावी.
- विदर्भ प्रदेशात ग्रामीण भागात लघुउद्योग म्हणून खादी, हातमाग आणि त्यांच्याशी संबंधीत कापड व्यवसायाला चालना देण्यात यावी.
- राज्यशासनाने परभणी -हिंगोली- वाशिम हा संपूर्ण प्रदेश वस्त्रोद्योग प्रदेश म्हणून जाहिर करावा.
- महाराष्ट्राने आपले सौरधोरण जाहीर करावे.

**इ) जलसंपत्तीचा विकास :**

- ❋ पाण्याच्या बाबतीत करण्यात येणाऱ्या शिफारसी फक्त ८ वर्षासाठी करण्यात आल्या आहेत.
- ❋ ग्रामीण व शहरी भागांमध्ये उपलब्ध करून द्यावयाच्या किमान प्रमाण दरडोई १४० लिटर इतके असावे तसेच ग्रामीण क्षेत्रात १४० लिटर्स मध्ये पशुधन पाण्याची गरजेचाही विचार करण्यात आला आहे.
- ❋ अमरावती क्षेत्रातील खारपाणपट्टा प्रदेशाकरिता तांत्रिक व आर्थिक प्रकल्पासाठी असलेल्या प्रकल्प निकषांमध्ये सुधारणा करणे.
- ❋ विदर्भ प्रदेशाकरिता वनजमिन संपादन हे निखळ मूल्याच्या आधारे करणे.
- ❋ १ लाख हेक्टर्स जमिनीला सिंचीत करण्यासाठी विदर्भ प्रांतातील मालगुजारी तलावांचे नुतनीकरण करण्यात यावे.
- ❋ वैनगंगा, प्राणहिता व इंद्रावती खोऱ्यामधील नियोजन न केलेल्या जलसंपत्तीचे पुढील ५ पाच वर्षामध्ये नियोजन करण्यात यावे.
- ❋ विदर्भातील अपूर्ण प्रकल्प हे प्राधान्यक्रमाने पूर्ण करण्यात यावे.
- ❋ भूजल ह्या घटकास सिंचनाचा स्वतंत्र विकास निर्देशांक समजण्यात यावे.
- ❋ पाणी साठवण निर्देशांकानुसार अमरावती व औरंगाबाद क्षेत्रात गंभीर तुट आहे त्यामुळे स्थानिक क्षेत्रातील सर्व सिंचन प्रकल्प मंजूर करावेत.

**फ) आरोग्य :**

आरोग्य या घटकाचे अध्ययन करण्यासाठी आय.एम.आर., क्षयरोग, कुपोषण, आणि टी.फ.आर. या चार घटकांचा विचार करण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या आरोग्य सेवा सुविधांच्या उपलब्धतेमध्ये असमतोल आहे. आरोग्याची अंदाजित तुट ही विदर्भ क्षेत्रात १२१.८ टक्के, मराठवाडा क्षेत्रात १०८.९ तर उर्वरित महाराष्ट्रात ६९.३ एवढी आहे. ही तुट भरून काढण्यासाठी ग्रामीण लोकसंख्येकरिता चार टप्पयामध्ये आरोग्य केंद्रे सुरू करावीत.

**ग) शिक्षण :**

- ❋ केळकर समितीने शालेय शिक्षण किमान पातळी म्हणून इयता ८ ते १० पर्यंत शिक्षणाचे सार्वत्रिकरणाची शिफाारस केली आहे.
- ❋ दुबळया घटकांना सामावून घेण्यासाठी एक मिशन पध्दतीने शिक्षण हा दृष्टीकोण स्विकारावा.
- ❋ प्रदेश विशिष्ठ अभ्यासक्रम देण्यासाठी सामूहिक महाविद्यालये सुरू करण्यात यावीत.
- ❋ माध्यमिक स्तरावर गुणांकन पध्दती सुरू करण्यात यावी.
- ❋ इयता आठवीपर्यत परीक्षा न घेण्याच्या शासनाच्या धोरण्याचा विचार व्हावा.

**ह) संपर्क जाळे विस्तृत करणे :**

केळकर समितीने राज्यातील संभाव्य ७०३५ कि.मी लांबीचे रस्ते निर्मिती करताना १६ रस्ते तयार करून पुर्वेचे टोक व पश्चिमेचे टोक जोडावे तसेच रत्नागिरी नागपुर राष्ट्रीय मार्गाचा पाठपुरावा करावा अशी शिफारस केली आहे.

**य) आदिवासी क्षेत्र विकासाबाबत शिफारसी:**

जनजाती सल्लागार व विकास परिषद बनवून त्यात अधिक जबाबदारी व अधिकार दयावेत. जनजाती क्षेत्राचा निधी इतर प्रयोजनासाठी वळविता

येणार नाही हे कायदयाव्दारे अनिवार्य करावे.

* जनजाती क्षेत्राचे नियतवाटप पुढील प्रमाणे असावे.
  ग्रामसभा- ५० टक्के, ग्रामपंयात - १५ टक्के, पंचायत समिती -१५ टक्के, जिल्हास्तर- १० टक्के, राज्यस्तर-१० टक्के.
* राज्यात दोन जनजाती विद्यापीठ असावेत.
* जनजाती विकास निर्देशांक हा वार्षिक आधारावर तयार करण्यात यावा.

**६. समारोप :**

महाराष्ट्र शासन १९८६ पासून अनुशेष दूर करण्यासाठी निधी देत आहे. निधीची उपलब्धता अल्प असून निधी अनुशेष वाढत गेला आहे. निधी अनुशेष पुर्तीसाठी असणारी यंत्रणा परिणामकारक नाही. विकासातील तफावत कमी करण्यासाठी सातत्यपूर्ण नियोजन, अंमलबजावणी, मोजमाप व सुधारणा प्रक्रिया यावर अध्ययन करणे गरजेचे आहे. केळकर समितीव्दारे अशाप्रकारचे अध्ययन करण्यात आले आहे.

केळकर समितीने महाराष्ट्रातील विविध विभागातील विकासाच्या २२ निकषांचा अभ्यास केला आहे. त्यानुसार तळाच्या मागास १४ जिल्हयांमध्ये मराठवाडयातील सर्व जिल्हयांचा समावेश होतो. मराठवाडा एकाही निर्देशांकात पहिल्या स्थानी नाही. विदर्भ चार निर्देशकांमध्ये सर्वात मागे आहे. केळकर समितीने अनुशेष काढण्यासाठी पाणी तुट यासाठी तालुका हा घटक विचारात घेतला आहे. तर आरोग्य, दळणवळण या निकषांसाठी जिल्हावार माहितीचा आधार घेण्यात आला आहे.

**संदर्भ :**

१. महाराष्ट्र शासन (२०१४) : महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकास प्रश्नावरील उच्चस्तरीय समितीचा अहवाल.

◆◆◆

# महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमता व उपाय – विदर्भ राज्य व केळकर समितीच्या विशेष संदर्भात

**श्रीनिवास खांदेवाले**
सेवानिवृत्त प्राध्यापक,
नागपूर.

राज्य (स्टेट) हा कृत्रिम राजकीय-प्रशासकीय घटक असतो व प्रदेश (रीजन) हा भौगोलिक, नैसर्गिक व आर्थिक घटक असतो. जमीनीच्या आतील तेल-वायू-खनिजे इत्यादी संपत्ती; जमिनीवरील मातीचा सकसपणा-जंगले-पाणी इत्यादी आणि आकाशातील सूर्यप्रकाश, हवामान इत्यादी घटक व त्या तिन्हींमधील अंत: संबंध मिळून त्यावर आधारित कारखानदारी-व्यापार इत्यादींचा विकास मिळून त्या प्रदेशाचे अर्थशास्त्र बनते. ह्या अर्थाने प्रत्येक प्रदेशाची भिन्न प्रकारची वैशिष्ट्ये असणार. त्यामुळे मुळातच काही प्रदेशांच्या विकासाच्या क्षमता व प्रत्यक्ष विकास कमी व इतरांचा जास्त असणार हेही ओघाने आलेच. त्यामुळे काही प्रदेशांमधील लोकांचा भौतिक जीवनमानाचा स्तर इतरांपेक्षा कमी असणार हे तेथील लोकांना माहीत असते व मान्यही असते. उघडच आहे की प्रत्येक भौगोलिक प्रदेशाचे वैशिष्ट्यपूर्ण अर्थशास्त्र असणार, त्याच्या भोवती त्याची सामाजिक संस्कृती असणार (कोळी समाज पाण्याच्या आसपासच असेल, वाळवंटाच्या भोवती नाही), त्या आर्थिक-सांस्कृतिक परिस्थितीतून निर्माण होणारे राजकारण असणार. अशा प्रदेशांची भाषा समान असू किंवा नसू शकते. परंतु भाषा प्रसार पावत एक असली तरी त्यांचे अर्थशास्त्र-समाजशास्त्र-राजकारण स्वायत्त राहू शकते. अशा प्रदेशांचे एकमेकांवर पडणारे प्रभाव जर अंतर, हवामान, माती-पाण्याची भिन्नता इत्यादींमुळे मर्यादित होत असतील तर प्रदेशांची स्वायत्तता ही अधिक जाणवणारी असते. महाराष्ट्रात भाषा जरी समान असली तरी विदर्भ, मराठवाडा, खांन्देश, पश्चिम महाराष्ट्र व कोकण हे पाच, जवळपास स्वायत्त असे प्रदेश आहेत. काही प्रमाणात होणारे लोकांचे स्थलांतर व व्यापार इत्यादींमुळे ह्या प्रदेशांमध्ये काही प्रमाणात आर्थिक-सांस्कृतिक आदान प्रदान होते, परंतु त्यामुळे प्रदेशांची मूळ वैशिष्ट्ये बदलत नाहीत.

राज्य हा राजकीय एकक एका प्रदेशाचा किंवा अनेक प्रदेशांचा असू शकतो. तसाच तो एकभाषी प्रदेशावर किंवा बहुभाषी प्रदेशांवर आरोपित (सुपरइम्पोज्ड) असू शकतो. उदाहरणार्थ, ब्रिटिश सत्ता भारतात असताना मुंबई इलाख्यात कर्नाटक, पश्चिम महाराष्ट्र, गुजरात व सिंध प्रदेश समाविष्ट होते. स्वातंत्र्यानंतर भाषावार प्रांत रचना केल्यामुळे आता महाराष्ट्रात विदर्भ, मराठवाडा, खान्देश, पश्चिम महाराष्ट्र व कोकण असे पाच भौगोलिक-सांस्कृतिक प्रदेश आहेत. त्यांच्या मधील कृषी विकास, औद्योगिक विकास, रोजगार व आर्थिक विकास

ह्यांमधील उदग्र अंतर /भेद मुळातही होते व गेल्या साठ (१९५६ - २०१६) वर्षात ते वाढतच आहेत. त्यामुळे केंद्रित राजसत्ता व आर्थिक सत्ता एकाच प्रदेशाकडे जाणे आणि बाकीच्या प्रदेशांकडे गौणत्व येणे ही धोरणप्रणाली (प्रवृत्ती) निर्माण होते. ती प्रणाली दीर्घकाळ चालत राहिल्यास एकसंध राज्य म्हणून सर्व प्रदेशांच्या विभिन्न अर्थशास्त्रांचे व राजकारणांचे (राजकीय निर्णय शक्तीचे) जे समायोजन व्हावयास पाहिजे, ते होत नाही व त्यातून मग आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक मुदयांवर असंतोष निर्माण होतो, तो सध्या महाराष्ट्रात दिसून येत आहे. अनियंत्रित बाजार व्यवस्थेत ज्या ज्या उद्योगांचे जिथे जिथे नफ्याचे महत्तमन होईल तिथेच उद्योग केंद्रित होतात व त्यातून अतिकेंद्रीकरण निर्माण होते. त्याचे प्रत्यंतर महाराष्ट्रात येत आहे. सुरूवातीला खोल समुद्राचे बारमाही बंदर म्हणून आयात निर्यातीचे केंद्र (तत्कालीन विदेश व्यापाराकरिता) ब्रिटिशांनी मुंबई शहर विकसित केले. ते रेल्वे, रस्ते व वायू मार्गांनी जोडले गेल्यामुळे कारखानी व वित्तीय सुविधांचे केंद्र बनले. स्थानविषयक खर्च-बचतींमुळे जुळी (नवी) मुंबई स्थापन झाली व त्या शहराचा विकास होणे चालू असताना आता तिसऱ्या मुंबईची स्थापना घोषित झाली आहे. त्याच्या जोडीला मुंबईत मावत नसलेला औदयोगिकरणाचा सांडवा म्हणून विकसित झालेले पुणे शहर मोटार गाड्या, माहिती तंत्रज्ञान व कृषी ओलिताच्या केंद्रीकरणामुळे कृषी-तंत्रज्ञान, उच्च-तांत्रिक शिक्षणाचे महाकेंद्र बनत आहे. मुंबईपासून कमी अंतर ह्याच तत्वावर सांडव्याचे दुसरे केंद्र म्हणून नाशिक शहर विकसित होत आहे. आंतरराष्ट्रीय जल व वायू वाहतुकीचे केंद्र म्हणून मुंबईचे स्थान अबाधित राहणार, म्हणून मुंबई-पुणे-नाशिक महापरिसराला (मेट्रो रीजन) महाराष्ट्राच्या विकासाचा स्वर्णत्रिकोण म्हटले गेले व त्याच्या विकासाची धोरणे अंमलात आली. परिणामी आज हा स्वर्णत्रिकोण अतिकेंद्रिकरणाचा नमुना बनला आहे. त्याच्या सततच्या विकासाकरिता वित्तीय व तांत्रिक संसाधने मोठया प्रमाणावर खर्ची पडतात. त्यामुळे राज्यातील इतर प्रदेशांच्या विकासाकरिता निधी कमी पडतो. त्यातून विषमता वाढत आहेत. त्या विषमता मर्यादेत ठेवून समतोल प्रादेशिक विकास घडवून आणणे ही महाराष्ट्र राज्यापुढील मुख्य आर्थिक समस्या आहे.

**विकासाची गृहीतके व निरीक्षणे :**

बराच काळपर्यत विकास प्रक्रियेच्या प्रादेशिक प्रसारासंबंधी असे गृहीतक होते की कुठेही विकास प्रक्रिया सुरू झाली की भौगोलिकदृष्ट्या ती इतरत्र फैलते आणि स्पर्धेच्या माध्यमातून प्रादेशिक समान विकास होतो. दुसऱ्या महायुद्धकाळात साम्राज्ये नष्ट होवून नवस्वतंत्र राष्ट्रांचा नव्या तंत्रज्ञानाव्दारे जो विकास घडून आला त्यात जागतिक पातळीवर प्रादेशिक केंद्रीकरणाचे निरीक्षण नोदविले गेले. महाराष्ट्र राज्य व्दिभाषिकाच्या रूपाने तयार झाले (१९५६) तेव्हाही मुंबईत केंद्रीकरण होतेच, परंतु तो काळ केंद्रीकरणाच्या आकर्षणाचा होता. आता ते अतिकेंद्रीकरण झाले आहे. राज्याच्या निर्मितीच्या वेळी त्या पिढीचे प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ प्रा. धनंजयराव गाडगीळांचे परिकल्पन असे होते की मोठी राज्ये म्हणजे मोठी संसाधने आणि त्यातून व्यापक कल्याण. भारताचे तत्कालीन अर्थमंत्री डॉ. सी. डी. देशमुखांना वाटत होते की मोठी राज्येच आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी राहू शकतात. त्यांच्या मते लहान राज्ये म्हणजे केंद्र शासनावर अवलंबित लंगडी पिल्लावळ निर्माण

करण्यासारखे आहे. मुंबईचे औद्योगिकरण फैलेल आणि मुंबई शहराचा खर्चापेक्षा जो जास्तीचा महसूल आहे तो राज्याच्या इतर भागांच्या विकासासाठी खर्च करता येईल, वगैरे. प्रत्यक्षात ती विकास प्रक्रिया अतिकेंद्रीकरणाकडे झुकलेली व अतिखर्चिक सुविधा मागणारी (उदाहरणार्थ. मोठे पूल, फ्लायओव्हर्स, बहुपदरी रस्ते व रेल्वे, महाशक्ती टेलिफोन-पाणी-वीज वाहिन्या, इत्यादी) ठरली. परिणामी तो महापरिसर उत्तरोत्तर अधिक विकसित होत गेला व इतर प्रदेशांच्या मुलभूत गरजा भागविण्या इतकाही निधी आवंटित झाला नाही, किंवा विविध युक्त्या करून आवंटित निधी विकसित भागांकडे वळविला गेला.

मूळ विषमता का साठत गेल्या व आज त्या घालविणे अशक्यप्राय का वाटत आहे याची प्रत्यक्ष व्यवहारातील कारणे समजावून घेतली पाहिजेत. एक, महाराष्ट्र राज्य भाषा ह्या भावनिक मुद्यालाच महत्व देऊन, आर्थिक मुद्याकडे दुर्लक्ष करून, स्थापन झाले व तसेच चालविले जात आहे. त्यावेळी मुंबई परिसर व पश्चिम महाराष्ट्र हयांच्या तुलनेने कोकण, मराठवाडा व विदर्भ हे कमी विकसित प्रदेश होते. त्यांच्या विकासाचा बोजा मुंबईवर पडणार असे सांगितले जात होते. तरी मग हे प्रदेश महाराष्ट्रात जोडण्यासाठी संघर्ष करणे ही विस्तारवादी मानसिकता नव्हे काय? ह्या प्रदेशांना घेऊन निर्माण होणारे राज्य किफायतशीर, वर्धनक्षम होईल का ह्याचे गणित त्याकाळी कोणीही मांडले नव्हते. सोबत येणाऱ्या प्रदेशांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात विकास-निधी, शासकीय नोकऱ्या, तंत्रशास्त्र संस्था इत्यादी देऊ असा लेखी करार करणारांना (नागपूर करार-१९५३) तो करार कधी अंमलात येवू शकणार नाही, असा विचार मनात आला असेल का? नसेल आला तर का आला नाही? हा प्रश्न उपस्थित करण्याचे कारण असे की १९५६ ते २०१६ हया साठ वर्षाच्या काळात तो करार अंमलात आला नाही. नागपूर कराराला कायदयाचे स्वरूप द्या अशी मागणी राज्य तयार होताना झाली होती. ती मागणी टाळत तत्कालीन मुख्यमंत्री श्री.यशवंतराव चव्हाणांनी राज्य उदघाटन प्रसंगी राज्याच्या धोरणासंबंधी भाष्य करताना असे म्हटले होते की, ''मी पवित्र आश्वासन देतो की विदर्भ-मराठवाडयांच्या जनतेला त्यांचा वाटा तर मिळेलच परंतु वेळ पडल्यास जास्तीची संसाधने देऊ.'' गेल्या साठ वर्षात लोकसंख्येच्या प्रमाणात निधी तर मिळालाच नाही पण शासकीय नोकऱ्याही त्या प्रमाणात मिळाल्या नाहीत. त्यामुळे प्रश्न निर्माण होतो की मग पश्चिम महाराष्ट्राला हे प्रदेश कशाकरता सोबत हवेत आणि ह्या प्रदेशांनी महाराष्ट्राबरोबर का रहावे?

विषमता कमी न होण्याचे दुसरे कारण आणखी एक गृहितकाला नष्ट करणरे आहे. ते असे की कोणत्याही कारणांनी असमान प्रदेशांना एकत्र आणले तर समानता निर्माण होण्यासाठी आपण असे गृहित धरतो की विकसित प्रदेशातील लोक स्वार्थ त्याग करून स्वत:चा विकास-निधी, प्रादेशिक विषमता हटेपर्यंत, मागास प्रदेशांना उपलब्ध करून देतील आणि नंतर मग सर्वांचा समसमान विकास होत राहील. आणि त्यातुन सर्व प्रदेशांमध्ये एकात्मता निर्माण होईल. कदाचित ह्याच गृहितावर प्रा. वि. म. दांडेकरांच्या अध्यक्षतेखालील समितीने एकूण उपलब्ध विकास-निधी पैकी ८५ टक्के निधी मागास प्रदेशांचा अनुशेष भरून काढण्यासाठी व १५ टक्के

विकसित प्रदेशातील चालू विकास कार्यक्रमांसाठी द्यावा अशी शिफारस १९८४ मध्ये केली होती (उद्देश राज्य एकसंघ राहावे). परंतु मानवी स्वभावात असा सामुहिक त्याग बसत नाही. कोणीही स्वत:चा सामुहिक विकास खोळंबवून ठेऊ शकत नाही. लोक आपला भौतिक विकास (चांगले रस्ते, मैदाने, बगिचे, परिवहन सुविधा,धरणे, वीज पुरवठा इत्यादी) सातत्याने आधुनिकीकरणाच्या रूपाने मागत असतात. म्हणूनच दांडेकर समितीचा अहवाल टिप्पणी न करता फेटाळला गेला.

मूळ विषमता टिकण्याचे व वाढण्याचे तिसरे कारण म्हणजे निर्वाचित जनप्रतिनिधींची भूमिका होय. जन प्रतिनिधी हा त्याच्या मतदारसंघाच्या लोकांना सध्या आहे त्यापेक्षा चांगला भौतिक सार्वजनिक विकास देऊ शकला तरच तो पुढच्या वेळेला निवडून येऊ शकतो. त्यासाठी तो आटापिटा करत, संबंधित मंत्र्याकडून- अधिकाऱ्यांकडून निधी खेचून आणतो. त्या बाबतीत त्याची इतर प्रतिनिधींशी स्पर्धा असते. कुठलेही करार असोत की मदार असोत, तो आपल्या मतदारांना मागास प्रदेशांच्या विकासाकरिता स्वत:च्या विकासाला पुढे ढकला असे सांगू शकत नाही. विकसित प्रदेशातील सर्वच जनप्रतिनिधींना असेच वागावे लागते. ह्या वस्तुस्थितीच्या विपरित कोणताही अहवाल त्यांना मान्य होऊ शकत नाही. त्यामुळे विकसित प्रदेशातील जनप्रतिनिधींच्या राजकीय वर्तणुकीत बदल होऊन प्रादेशिक विषमता कमी होतील असे समजणे भोळसटपणचे होईल. तरी अजूनही महाराष्ट्रात विकसित प्रदेशातील आदर्शात्मक व आशादायक आश्वासनांवर विश्वास ठेवूनच राजकारण चालताना दिसते.

**शासकीय समित्यांच्या मर्यादा :**

प्रादेशिक असमतोलाच्या संदर्भात जेव्हा सरकार समित्या नेमते तेव्हा विदर्भवाद्यांना उगीचच वाटते की ह्या समित्या वेगळया विदर्भ राज्याचे समर्थन करतील. ही समज दुरूस्त करणे आवश्यक आहे. कारण समिती स्थापन होण्याच्या घोषणेपासून ते अहवाल सादर होऊन सरकारने त्यावर काय कार्यवाही केली हे सादर करायला सुमारे पाच वर्षांचा काळ जातो. तो अपेक्षांचा काळ असतो. नंतर अपेक्षाभंगाचा काळ सुरू होतो. केळकर समिती मे २०११ मध्ये घोषित केली गेली. त्या समितीने ऑक्टोबर २०१३ मध्ये अहवाल सादर केला. नव्या सरकारने तो अहवाल कार्यवाही करण्याच्या अभ्यासाकरिता २०१४ मध्ये घेतला आणि डिसेंबर २०१५ पर्यत कार्यवाही अहवाल सादर करू असे म्हटले होते. परंतु डिसेंबर २०१५ उलटला तरी कार्यवाही अहवाल सादर झालेला नाही. आता २०१६ मध्ये केव्हातरी हा अहवाल सादर होईल असे दिसते. विरोधी पक्षांनी (ज्यांनी केळकर समितीची स्थापना केली होती) सुध्दा सरकारकडे विचारणा केली नाही. त्यामुळे ह्या प्रश्नाबाबत राज्यभरचे सर्वच जनप्रतिनिधी किती उदासीन आहेत, हे स्पष्ट होते. तसेच समितीच्या शिफारशींच्या मर्यादाही स्पष्ट होतात.

प्रादेशिक विषमता व स्वतंत्र विदर्भ राज्याचा प्रश्न या बाबतीत आणखी एक मुद्दा समजावून घेणे आवश्यक आहे. विदर्भाच्या जनतेची स्वतंत्र राज्याची मागणी महाराष्ट्र राज्यात कुठल्याही धोरणात किंवा कार्यवाहीत समाविष्ट असत नाही. कितीही अन्याय, चुका होत असल्या तरी सर्व धोरणांमध्ये संविधानाने सध्याचे जे महाराष्ट्र राज्य निर्माण केले आहे ते

टिकविण्याची जवाबदारी असते. म्हणून राज्यात प्रादेशिक विषमता वाढत गेल्या तर राज्यापाल त्या विषमतांवर उपाय करण्यासाठी एखादी तज्ञ समिती नेमण्याची शिफारस करू शकतात, जसे दांडेकर व केळकर समित्यांच्या वेळी घडले. परंतु एखादया घटक प्रदेशाचे स्वतंत्र राज्य निर्माण करण्याची शिफारस करणे राज्यपालांच्या अधिकारात बसत नाही. तो अधिकार केंद्र सरकारचा व संसदेचा आहे. तीच परिस्थिती मुख्यमंत्री, मंत्रीमंडळ आणि सर्व सरकारी समित्यांचे अहवाल यांच्या बाबतीत आहे. विदर्भ राज्याची मागणी करणारे अनेक जण अशा समित्यांकडून खूप क्रांतीकारी शिफारसींची अपेक्षा करतात व नंतर निराश होतात. म्हणून या मुद्याचे महत्व आहे.

शिफारशींच्या मर्यादा समजावून घेताना पुढचा टप्पा येतो तो समित्यांच्या संदर्भ अटींचा (टर्म्स ऑफ रेफरन्स). ज्या संदर्भात राज्यपाल किंवा शासन शिफारसी अपेक्षा करतात त्यांना संदर्भ अटी असे म्हणतात. कोणतीही समिती इतर उद्दिष्टे किंवा विषय विचारात घेऊ शकत नाही. ते संदर्भ शासन ठरविते व तेच संदर्भ समितीच्या मर्यादा ठरवितात. एखादी समिती एखाद्या संदर्भाचा विस्तारित अर्थ लावू शकते एवढेच. कुठलेही सरकार आपल्या धोरणाच्या विरूध्द शिफारसी येतील अशा संदर्भ अटी ठेवील अशी शक्यताच नसते. त्यामुळे समितीचे सदस्य कितीही तज्ञ व सडेतोड विचारांचे असले तरी त्यांना संदर्भ अटींशिवाय इतर कोणत्याही मुद्यांवर टिप्पणी करता येत नाही. अनेकदा प्रशासकीय कार्यप्रणाली माहित नसल्यामुळे जनतेच्या समितीकडून खूप अपेक्षा असतात. परंतु लोकांनी आधीच संदर्भ अटी समजावून घेतल्या तर समितीचा अहवाल कशा प्रकारचा असू शकेल ह्याची कल्पना येऊ शकते.

तरी संदर्भ अटींच्या तहात राहून काही कडक शिफारशी समित्या करू शकतात. उदाहरणार्थ दांडेकर समितीने उपलब्ध विकास निधीपैकी ८५ टक्के निधी मागास प्रदेशांचा अनुशेष भरून काढण्यासाठी द्यावा असे म्हटले होते. विकसित प्रदेशातील लोक, वर उधृत केलेल्या कारणांसाठी ही शिफारस स्विकारणे शक्य नव्हते आणि सरकारवर विकसित प्रदेशाचाच प्रभाव असल्यामुळे सरकारही ती शिफारस स्विकारणे अशक्य होते. मतितार्थ असा की समित्यांच्या शिफारसी मान्य होण्याला विविध गटांच्या मान्यतेच्याही मर्यादा पडतात.

समित्यांच्या शिफारसींना शेवटची मर्यादा ही शासनाची असते. कोणत्या शिफारसी मान्य करायच्या आणि त्यांची प्रत्यक्षात किती व कशी अंमलबजावणी करायची हे शेवटी शासनच ठरविते. अशा स्थितीत शिफारसी किती चांगल्या होत्या हा गौण मुद्दा बनतो. शासनाला त्यापैकी काय मान्य आहे हाच प्रधान मुद्दा बनतो. सारांश, महाराष्ट्रातील सरकारी समित्यांच्या व्दारा विदर्भ राज्याचा प्रश्न सुटेल असे समजणे बाळबोधपणाचे होईल. एवढेच नव्हे तर ती अत्यंत चुकीची समजूत ठरू शकते.

**केळकर समिती :**

प्रादेशिक असमतोलासंबंधीच्या ज्या समित्या स्थापन होतात त्यांच्या अहवालांमुळे एकतर अनेक विभागांमध्ये पसरलेली सांख्यिकी एकत्र आणली जाते. काही प्रकारची माहिती, जी सामान्यपणे जनतेला उपलब्ध नसते ती, समितीपुढे सादर करावी लागत असल्यामुळे जनतेला उपलब्ध होते. बऱ्याचशा आकडेवारीचे शास्त्रीय विश्लेषण

करवून घेतल्यांमुळे ते सर्वांना उपलब्ध होते. समितीच्या राज्यभरच्या भेटीमुळे प्रत्यक्ष परिस्थितीबद्दल समितीला अनुभव येतो. त्याबद्दलच्या नोंदीही महत्वाच्या असतात. केळकर समितीचे अनूभव आपण विचारात घेऊ. (सगळे पृष्ठ क्रमांक 'महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या उच्चस्तरीय समितीचा अहवाल', महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग मुंबई ऑक्टोबर २०१३ मधून घेतले आहेत).

अहवाल म्हणतो की महाराष्ट्र शासनाने दांडेकर समितीचा अहवाल (१९८४) स्विकारला नाही. परंतु अनुशेष दूर करण्यासाठी विवक्षित नियत वाटप केले. हे नियत वाटप अपुरे होते आणि त्याचा वापर देखील योग्य रीतीने झाला नाही म्हणून स्वतंत्र विदर्भाची मागणी पुन्हा एकदा पुढे आली. शासनाने संविधानाच्या अनुच्छेद ३७१ (२) मध्ये त्यासाठी तरतूद केल्याप्रमाणे प्रादेशिक विकास मंडळे स्थापन करणे दूरदर्शीपणाचे ठरेल असा निर्णय घेतला (भार जोडला). त्या प्रयोजनाचा ठराव दि. २६ जुलै १९८४ रोजी मांडण्यात आला. तथापी ह्या ठरावाची अंमलबजावणी जवळजवळ १० वर्षे पर्यत झाली नाही. विदर्भातील आणि मराठवाडयातील नेत्यांनी नेटाने पाठपुरावा केल्यानंतर दि. ३० एप्रिल १९९४ च्या आदेशानुसार... तीन विकासमंडळे गठीत केली गेली. (परि.१.० पृ.२२ )

समतोल प्रादेशिक विकासासाठी संविधानात १९५६ मध्येच मंडळांची तरतूद केली गेली होती. तिच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करून जेव्हा विदर्भ, मराठवाड्यातील लोकांनी त्यासाठी आंदोलन केले तेव्हा महाराष्ट्र शासनाला १९८४ मध्ये म्हणजे (२८ वर्षानंतर) ती मंडळे स्थापणे 'दूरदर्शीपणाचे' वाटावे हे किती दुर्दैवी आहे? आणखी १० वर्षे संघर्ष केल्यानंतर १९९४ मध्ये (म्हणजे तरतूद केल्यापासून ३८ वर्षांनी) ही मंडळे स्थापन केली गेली. ह्याचाच अर्थ असा की ३८ वर्षे मुळातील प्रादेशिक विषमता, घटक प्रदेशांची न्याय्य विकासाची मागणी डावलून, वाढू दिल्या गेल्या. प्रादेशिक समतोलाकरता मागास प्रदेशांतील लोकांना आपल्याच राज्यव्यवस्थेविरूध्द लढावे लागले. वैधानिक मंडळांना 'राज्यपालांची विशेष जबाबदारी' असे अनुच्छेद ३७१(२) मध्ये म्हटले गेले. मग १९५६ पासूनच्या राज्यपालांनी मागास प्रदेशांप्रती आपली संवैधानिक विशेष जबाबदारी पार पाडू शकत नाही, असे दरवर्षी राष्ट्रपतींना कळविले का? की त्यांनी कळवूनही त्या अहवालांची दखल घेतली गेली नाही?

प्रत्यक्षात वेळोवेळीच्या मुख्यमंत्र्यांनी (१) प्रादेशिक न्यायाची भरघोस आश्वासने देऊन, (२) मुंबई वगळता इतर जिल्हेही मागासलेले आहेत म्हणून जिल्हा हा नियोजनाचा घटक आहे प्रदेश नाही, असे सांगत, (३) राज्यपालांना निधी वाटपाचे अधिकार देणे म्हणजे निर्वाचित जनप्रतिनिधीच्या अधिकाराचा संकोच आहे, व (४)वैधानिक मंडळांची मागणी म्हणजे फुटीरता आहे, असे सांगत प्रादेशिक विषमतांकडे दुर्लक्ष करून एकाच (मुंबई-ठाणे-पुणे-नाशिक) महापरिसराचा विकास चालू ठेवला. केळकर समितीने असे नोंदविले आहे की ''विदर्भाच्या समस्यांकडे एकतर दुर्लक्ष केले जाते किंवा महाराष्ट्र राज्याची राजधानी मुंबईतून त्याविषयाचे निर्णय घेणाऱ्यांकडून येथील नागरिकांना दुजाभावाची वागणूक दिली जाते. असा विदर्भातील लोकांचा सर्वसाधारण समज असल्याचे प्रतिनिधिक चित्र पाहावयास मिळते.'' (२.१.१४,पृ.४८). ही

भावना नेत्यांबाबत आहे. समिती पुढे असेही नोंदविते की सरकारी अधिकाऱ्यांमधील बांधिलकीचा अभाव विचारात घेता, अविश्वासाची भावना वाढीस लागत आहे आणि त्यामुळे हितसंबंधितांमध्ये विश्वासघात झाल्याची भावना निर्माण होत आहे. महाराष्ट्रातील सर्व प्रदेशांमध्ये अशा भावना व्यक्त होत असल्या तरी त्याची तीव्रता विदर्भात कदाचित अधिक प्रबळ होती. या प्रदेशामधील ''बंध'' कमकुवत होत असल्याचे आम्हाला दिसून आले आहे (२.६.६. पृ.६४).

असे असूनही समितीला असे वाटते की संघराज्याच्या आंतराष्ट्रीय स्तरावरील अनुभवाच्या तसेच भारतीय राज्यांच्या अनुभवाच्या चष्म्यातून पाहिले असता, ही प्रादेशिक असमानता किंवा असमतोल खूप मोठा नाही. (२.१.पृ.३). दुसऱ्या बाजूने अहवाल म्हणतो की ''आम्ही विशिष्ट क्षेत्रातील (संरचनात्मक, आर्थिक, राजकीय) या बाबतच्या कारणांचा शोध घेतलेला आहे आणि चौदाव्या योजनेच्या अखेरीपर्यंत (म्हणजे २०२७ पर्यंत, म्हणजेच अहवालाच्या २०१३ ह्या वर्षापासून १४ वर्षांत) दरडोई उत्पन्नातील त्रुटी एक तृतियांशाने कमी करण्यावर आमच्या उपायात्मक शिफारसी आधारित ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे'' (२.२ पृ.५). वर उधृत केलेल्या दोन्ही गोष्टी एकमेकांच्या विरोधात आहेत असे दिसून येत. एक तृतियांश उत्पन्न-त्रुटी चौदा वर्षांत भरून निघतील असा समितीचा अंदाज रास्त मानला तरी उरलेल्या दोन तृतियांश तुटी भरून काढण्यासाठी त्या पलिकडील २८ वर्ष लागतील व त्या दरम्यान, मुळातील विषमतांमुळे नव्या विषमता तयार होतील, हे स्पष्ट आहे.

हे प्रादेशिक तुलनांचे, प्रदेशांच्या विषम विकासाचे प्रश्न निर्माण होत आहेत, कारण केवळ समान भाषेच्या एका निकषावर विभिन्न अशा प्रादेशिक अर्थव्यवस्था एका राज्यात एकत्र आणल्या गेल्या आहेत. त्या तुलनांमधून समतोलाचे कृत्रिम प्रयत्न वेगवेगळ्या समित्या नेमून महाराष्ट्रात केले जात आहेत. जेथे विषम प्रदेशांची राज्ये वेगळी केली गेली तिथे आता तुलना करण्याचे कारणच राहत नाही. उदाहरणार्थ, छत्तीसगड मध्यप्रदेश राज्यातून, झारखंड बिहार मधून, आणि उत्तराखंड उत्तर प्रदेशापासून वेगळा झाल्यापासून नव्या राज्याची जुन्या राज्याशी तुलना करणे बंद झाले आहे व नवे राज्य नव्या परिस्थितीत नव्या उमेदीने स्वत:च्या विकासाचा मार्ग तयार करते. वरील सर्व उदाहरणांमध्ये त्या राज्यांची भाषा एकच होती. त्यामुळे भाषेचा अभिनिवेश न बाळगता आर्थिक क्षमता व आवश्यकतांच्या आधारे नवी राज्ये तयार केली गेली. विदर्भाच्या बाबतीत असाच विचार करणे व्यवहारिकपणाचे ठरणार आहे.

◆◆◆

# औद्योगिकरणाच्या संदर्भात केळकर समितीच्या शिफारशी

**जे.व्ही.गायकवाड**
अर्थशास्त्र विभाग,
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय,
अमरावती.

**१) प्रस्तावना :**

महाराष्ट्र हे भारतातील प्रगत राज्यांपैकी एक राज्य म्हणून ओळखल्या जाते. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये प्रत्येक प्रदेशाचा समान विकास होणे अपेक्षित आहे. संतुलित विकास झाला नाही तर प्रादेशिक विषमता निर्माण होतात. प्रादेशिक विषमता ह्या मानवनिर्मित आणि निसर्ग निर्मित असून निसर्गाद्वारे निर्माण झालेल्या विषमतेत बदल करता येत नाही परंतू मानवनिर्मित प्रादेशिक विषमता कमी करता येते. राज्याच्या विविध विभागात विकासाच्या दृष्टीने जी तफावत निर्माण झालेली आहे त्याला प्रादेशिक असमतोल असे म्हणतात. महाराष्ट्रात प्रादेशिक असमतोलाचे स्वरूप जाणून घेण्यासाठी आतापर्यंत अनेक समित्या शासनाने नियुक्त केल्या आहेत. यामध्ये दांडेकर समिती (१९८३), राज्यनियोजन मंडळाच्या अभ्यास गटाचा अहवाल (१९९३), निर्देशांक व अनुशेष समिती (१९९७) इत्यादी. सर्वच समित्यांनी अभ्यास करून विकासाच्या बाबतीत प्रदेशात असंतुलन निर्माण झाल्याचे सांगितले. संतुलित विकासाकरिता सर्वसमावेशक धोरण ठरवून त्याची अंमलबजावणी आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासनाने ३१ मार्च २०११ रोजी डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली प्रादेशिक संतुलित विकासासाठी समिती गठित केली या समितीने आपला अहवाल ८ ऑक्टोबर २०१३ रोजी सरकारकडे सादर केला. प्रादेशिक संतुलित विकासासाठी सर्वसमावेशक धोरण ठरवून त्याची अंमलबजावणी आवश्यक आहे. महाराष्ट्राच्या संतुलित विकासासाठी मराठवाडा, विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्र असे विभाग करून त्यांचा सर्वांगीण अभ्यास केला आहे. विकासासाठी बहुआयामी प्रतिमान मांडून कृषी, उद्योग धंदे, सेवाक्षेत्र, प्रति उत्पन्न, लोकसंख्या, क्षेत्रनिहाय उत्पन्न, उद्योग धंदे, सहकार, शिक्षण-प्रशिक्षण, पर्यटन, वाहतूक-दळणवळण इत्यादी बाबतीत प्रदेशनिहाय अभ्यास केलेला आहे.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये केळकर समितीने महाराष्ट्रातील औद्योगिकीकरणाच्या संदर्भात सांगितलेल्या शिफारशीचा अभ्यास केला असून विदर्भ आणि मराठवाडा या प्रदेशाचा औद्योगिक विकास व त्यासाठी प्रभावी उपाययोजना प्रस्तुत केल्या आहेत.

**२) महाराष्ट्रातील औद्योगिकीकरण :**

भारतामध्ये महाराष्ट्र राज्य हे अग्रगण्य आणि आर्थिक व औद्योगिक विकासाचे शक्तीस्थळ मानले जाते. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी असून भारताची

आर्थिक राजधानी आणि व्यापारी केंद्र म्हणून परिचित आहे. महाराष्ट्र औद्योगिकदृष्ट्या विकसित राज्य असून देशी आणि विदेशी गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर होते. महाराष्ट्रामध्ये औद्योगिक विकास हा मुंबई-ठाणे-पूणे या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर झालेला असून या भागात मोठे-मध्यम आणि लहान उद्योग अधिक आहेत. मुलभूत सोयी-सुविधाचा विकास, पुरोगामी नेतृत्व, चांगले प्रशासन, स्पर्धात्मक कार्यसंस्कृती इत्यादी घटकामुळे महाराष्ट्र हे देशातील औद्योगिक विकासाच्या बाबतीत अग्रगण्य राज्य म्हणून ओळखले जाते. तसेच राष्ट्रीय आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांचे माहेरघर असून इंजिनिअरिंग टेक्सटाईल क्षेत्रात पारंपरिक प्रगती असून आधुनिक काळात माहिती आणि तंत्रज्ञानाच्या बाबतीत अग्रेसर राज्य म्हणून ओळखले जाते.

राज्याच्या औद्योगिक अर्थकारणात सूक्ष्म, मोठे आणि मध्यम उद्योग महत्वाची भूमिका बजावित आहेत. ज्यामुळे गुंतवणूकीत वाढ, रोजगार संधीमध्ये वाढ आणि निर्यातीमध्ये भर पडून आर्थिक विकास होतांना आढळतो. निर्यातीमध्ये सुवर्ण आणि हिरे जवाहर, रेडीमेड कपडे, पारंपारिक प्रक्रियेमधील खाद्य, तंत्रज्ञान आर्थिक सेवा याचा समावेश होतो. सरकारी उद्योगाच्या तुलनेत खाजगी उद्योगातील गुंतवणूक वाढल्याने तसेच खाजगी उद्योगाचे सार्वत्रीकरण झाल्याने औद्योगिकीकरण झाल्याचे आढळते. खाजगी गुंतवणूकीमुळे राज्यात सर्वत्र स्पर्धा वाढली. देशी व विदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित करून लघू-मध्यम व मोठे उद्योग निर्माण करण्याची स्पर्धा वाढल्याने औद्योगिकीकरण मोठ्या प्रमाणात झाले. तसेच दळणवळणाच्या क्षेत्रात सेवा क्षेत्राने तांत्रिकरित्या क्रांती घडवून आणल्याने रोजगारात प्रचंड वाढ होवून विकासास मदत झाली.

औद्योगिकीकरणाच्या प्रगतीचा अभ्यास केल्यास तो असमतोल स्वरूपाचा आढळतो. २००१ ते २०११ या काळात राज्यात औद्योगिक प्रगतीचा दर ९.८ टक्के असून उर्वरित महाराष्ट्रात वार्षिक औद्योगिक प्रगतीचा दर १०.९ टक्के होता. विदर्भ आणि मराठवाड्यात अनुक्रमे तो ८.५ टक्के व ८.१ टक्के होता. याचाच अर्थ राज्यातील प्रदेशनिहाय औद्योगिक असमतोल वाढला असून त्याचा अभ्यास करण्याची गरज निर्माण झालेली आहे. महाराष्ट्र राज्याने औद्योगिकदृष्ट्या मागास जिल्ह्यातील उद्योगाचा विकास करण्याचे धोरण स्विकारले असून 'उदारीकरणाबरोबर सरकारने गुंतवणूकदारांना आकर्षिक करण्यासाठी राजकोषीय सवलतीद्वारे विविध सवलती, देवून मागास जिल्ह्यामध्ये आकर्षित करण्याचा प्रयत्न केला. मागास जिल्ह्याचा विकास साधतांना मुलभूत तत्वामध्ये बदल न करता धोरणामध्ये वेळोवेळी बदल केले आहेत. २००६ च्या सरकारी धोरणाद्वारे मोठ्या प्रकल्पाची उभारणी आणि २०१३ मधील औद्योगिक धोरणामधील सर्व सवलती केंद्रस्थानी ठेवून उद्योगाचा विकास केला. परंतू मागास जिल्ह्यातील उद्योगाचा विकास झालेला नसून उद्योगामध्ये पर्याप्त प्रमाणात वाढ झालेली नाही. थोडक्यात औद्योगिकीकरणाच्या बाबतीत महाराष्ट्रात प्रदेशनिहाय, जिल्हानिहाय असमतोल आढळतो.

**३) औद्योगिक असमतोल :**

२०१२ च्या औद्योगिक अहवालामध्ये असे दिसून येते की गेल्या दशकात पुणे, रायगड, रत्नागिरी आणि ठाणे या ४ जिल्ह्यामध्ये ५० टक्क्यापेक्षा जास्त गुंतवणूक झालेली आहे. पुणे,

कोकण आणि नाशिक या ३ विभागामध्ये ८० प्रतिशतपेक्षा जास्त गुंतवणूक झालेली आहे. याचाच अर्थ विविध सवलती दिल्यानंतर खाजगी गुंतवणूक ही मुख्यत: कोकण, पुणे आणि नाशिक या तीन विभागात जास्त झालेली आढळते. सर्वच विभागाचा तुलनात्मक अभ्यास केल्यास औरंगाबाद, अमरावती आणि नागपूर या विभागामध्ये फारच कमी गुंतवणूक झालेली आहे. मोठ्या प्रकल्पाच्या बाबतीतही चित्र वेगळे नाही.

३१ डिसेंबर १२ पर्यंत ११४ युनिट मधून ९० युनिट हे पुणे, नागपूर, नाशिक या शहरामध्ये स्थापन झालेले असून भौगोलिकदृष्ट्या रोजगारासाठी ही शहरे आकर्षणाचे केंद्र बनली आहेत. मान्यताप्राप्त ३५० मेगा प्रकल्पातील ८५ प्रतिशत प्रकल्प कोकण विभाग आणि पुणे, नागपूर शहरामध्ये आढळतात. थोडक्यात महाराष्ट्रातील औद्योगिक विकास हा मुंबई-ठाण आणि पुणे या क्षेत्रात अधिक असून नाशिक, कोल्हापूर, नागपूर, औरंगाबाद आणि रत्नागिरी इत्यादी जिल्ह्यातील केंद्र हळूहळू औद्योगिक केंद्र म्हणून विकसित होत आहेत. इतर जिल्ह्यामध्ये विविध सवलती दिल्यानंतरही औद्योगिक विकास झालेला आढळत नाही. म्हणजेच उद्योगाच्या बाबतीत असमतोल मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला आहे. या संदर्भातील केळकर समितीने दिलेली आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

**I) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ :**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्रात औद्योगिक विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावत आहे. हे महामंडळ उद्योगाच्या वाढीसाठी सर्व प्रकारच्या सुविधा जसे पाणी, वीज, रस्ते पुरविते. ३१ मार्च २०१० पर्यंतची महामंडळाची प्रगती खालील तक्त्यामध्ये दिली आहे.

**तक्ता क्र.१**

**महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाद्वारा गुंतवणूक**

| अ. क्र. | प्रदेश | उद्योगधंदे (घटक संख्या) | गुंतवणूक (कोटीमध्ये) | रोजगार (लाखामध्ये) |
|---|---|---|---|---|
| १. | उर्वरित महाराष्ट्र | २४,७८६ | ४०,११२ | ७.३७ |
| | | (७४.३०) | (७४.६०) | (८३.८०) |
| २. | मराठवाडा | ४४७९ | ४३०३ | ०.५३ |
| | | (१३.४०) | (८.०) | (६.००) |
| ३. | विदर्भ | ४०९० | ९३७७ | ०.९० |
| | | (१२.३०) | (१७.४) | (१०.२) |
| ४. | महाराष्ट्र | ३३,३५५ | ५३,७९२ | ८.८० |
| | | (१००.००) | (१००.००) | (१००.००) |

(संदर्भ : केळकर समिती अहवाल पेज क्र. २७१)

वरील तक्त्यामध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या उद्योगाची प्रदेशनिहाय घटक संख्या, गुंतवणूक आणि रोजगार दर्शविला आहे. एकूण ३३.३५५ उद्योगापैकी उर्वरित महाराष्ट्रात ७४.३० टक्के म्हणजेच २४,७८६ उद्योग, मराठवाड्यात ४४७९ म्हणजेच १३.४० टक्के आणि

विदर्भात ४०९० म्हणजेच १२.३० टक्के आहेत. उद्योगामध्ये उर्वरित महाराष्ट्रात ४०११२ कोटी रूपये मराठवाड्यात ४३०३ कोटी रू. विदर्भात ९३७७ कोटी रू. गुंतवणूक झालेली आहे. रोजगारामध्ये ७.३७ लाख उर्वरित महाराष्ट्रातील उद्योगाद्वारे ०.५३ लाख मराठवाड्यातील उद्योगातून, ०.९० लाख विदर्भातील उद्योगातून रोजगार प्राप्त झालेले आहे.

**II) सहकारी मालकीच्या उद्योगांची स्थिती:**

रोजगाराच्या संधीत वाढ होण्यासाठी राज्यात सहकारी क्षेत्रातील उद्योगामध्ये वाढ होणे आवश्यक आहे. राज्यातील सहकारी उद्योगाची ऑक्टो-नोव्हें. २०१० मधील स्थिती खालील तक्त्यामध्ये दर्शविली आहे.

**तक्ता क्र. २**

**सहकारी उद्योगांची स्थिती**

| अ. क्र. | प्रदेश | उद्योगधंदे (घटक संख्या) | गुंतवणूक (कोटीमध्ये) | रोजगार (लाखामध्ये) |
|---|---|---|---|---|
| १. | उर्वरित महाराष्ट्र | ९६ | ८१ | ११५६१७ |
| | | (६७.६०) | (८०.२०) | (९३.३०) |
| २. | मराठवाडा | २६ | १३ | ४४६० |
| | | (१८.३०) | (१२.९) | (३.६०) |
| ३. | विदर्भ | २० | ७ | ३७९० |
| | | (१४.१०) | (६.९) | (३.१०) |
| ४. | महाराष्ट्र | १४२ | १०१ | १२३८६७ |
| | | (१००.००) | (१००.००) | (१००.००) |

(संदर्भ : केळकर समिती अहवाल पेज नं. २७१)

तक्त्यामध्ये सहकारी मालकीचे उद्योग प्रदेशनिहाय दर्शविले आहेत. महाराष्ट्रातील एकूण १४२ नोंदणीकृत उद्योगापैकी उर्वरित महाराष्ट्रांमध्ये सर्वात जास्त ९६, त्यानंतर मराठवाड्यात २६ आणि विदर्भात २० उद्योग आहेत. नोंदणीकृत उद्योगापैकी १०१ उद्योग कार्यरत असून सर्वात जास्त ८१ उद्योग उर्वरित महाराष्ट्रात तर सर्वात कमी विदर्भात ७ उद्योग आहेत. सहकारी मालकीच्या उद्योगामध्ये १२३८५७ लोकांना रोजगार प्राप्त झालेला असून उर्वरित महाराष्ट्रामध्ये अधिक उद्योगाची संख्या असल्याने त्या भागात जास्तीचा रोजगार लोकांना मिळतो आहे.

**III)प्रदेशातील विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ):**

उद्योगधंद्याच्या जलद वाढीसाठी महाराष्ट्र सरकारने 'विशेष आर्थिक क्षेत्राची निर्मिती' करण्याचे धोरण १० फेबु. २००६ मध्ये स्वीकारले. आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यासाठी महाराष्ट्रात प्रदेशनिहाय विशेष आर्थिक क्षेत्रांना मंजुरात दिली. ३१ डिसेंबर २०१० मध्ये राज्यात एकूण १४३ सेझ प्रकल्प होते. याविषयी माहिती पुढील प्रमाणे आहे.

## तक्ता क्र.३

## प्रदेश निहाय सेझ (SEZ) प्रकल्पाची स्थिती

| अ. क्र. | प्रदेश | मंजूर संख्या | कार्यरत संख्या | मंजूर प्रकल्पातील | | कार्यरत प्रकल्पातील | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | गुंतवणूक (कोटीत) | रोजगार (लाखात) | गुंतवणूक (कोटीत) | रोजगार (लाखात) |
| १. | उर्वरित महाराष्ट्र | १२१ | ४८ | १७३५३८ | ५६.१८ | ६८४१५ | १६.१७ |
| | | (८४.६०) | (७६.२०) | (९१.८०) | (८८.४०) | (८४.७०) | (७७.७०) |
| २. | मराठवाडा | १२ | ७ | ३८५५ | १.५२ | १७७५ | ०.३१ |
| | | (८.४) | (११.१०) | (२.२०) | (२.४०) | (२.३०) | (१.५०) |
| ३. | विदर्भ | १० | ८ | ११५९४ | ५.८६ | ६९४८ | ४.३२ |
| | | (७.०) | (१२.७०) | (६.००) | (९.२०) | (९.००) | (२०.८०) |
| ४. | महाराष्ट्र | १४३ | ६३ | १८८९८७ | ६३.५६ | ७७१३८ | २०.८० |
| | | (१००.००) | (१००.००) | (१००.००) | (१००.००) | (१००.००) | (१००.००) |

वरील तक्त्यामध्ये महाराष्ट्रात १४३ सेझ प्रकल्प मंजूर झालेले आहेत. उर्वरित महाराष्ट्रात मराठवाडा व विदर्भात अनुक्रमे १२ व १० प्रकल्प मंजूर झाले. मंजूर प्रकल्पापैकी उर्वरित महाराष्ट्रात ४८ प्रकल्प, मराठवाड्यात ७ प्रकल्प तसेच विदर्भात ८ प्रकल्प कार्यान्वीत झाले. १४३ मंजूर प्रकल्पामध्ये १८८९८७ कोटी रू. गुंतवणूक अपेक्षित असून त्याद्वारे ६३.५६ लाख लोकांना रोजगार मिळेल. परंतू प्रत्यक्षामध्ये १४३ पैकी ६३ प्रकल्प कार्यरत असून त्याद्वारे २०.८० लाख लोकांना रोजगार प्राप्त होत आहे. याचाच अर्थ प्रदेशनिहाय प्रकल्प निर्मिती, गुंतवणूक आणि रोजगार यामध्ये असमतोलपणा दिसून येतो.

### ४) औद्योगिक धोरणामध्ये सुधारणा :

महाराष्ट्रातील औद्योगिकीकरणामध्ये सर्वाधिक वाढ होण्यासाठी काही प्रमुख सुधारणा करण्याची गरज आहे. औद्योगिक धोरणातील सुधारणेमुळे खाजगी गुंतवणूकीचे प्रमाण वाढेल तसेच या सुधारणामुळे औद्योगिक विस्तार हा राज्यव्यापी, विभागनिहाय क्षेत्रनिहाय वाढून नवउद्योजकाच्या समोरील आव्हाने पेलण्यासाठी नवीन धोरण उपयुक्त ठरेल. नवीन धोरणामध्ये स्थानिक गरजा आणि त्याला धरून उपलब्ध असलेल्या मुलभूत सुविधाचा विचार करून ''एका छताखाली सर्व सुविधा'' हे धोरण उपयुक्त ठरेल. गुंतवणूकीमध्ये वाढ होण्यासाठी विविध करामध्ये धोरणात्मक सुधारणा करणे आवश्यक असून GST ची अंमलबजावणी आवश्यक आहे. MIDC, MAIC आणि DIC या संस्थाची आर्थिक ताकद वाढविण्यासाठी औद्योगिक धोरणामध्ये सुधारणा करण्याची गरज आहे. तसेच सुधारणामुळे मागास क्षेत्रातील औद्योगिकीकरण वाढल्यास मदत होईल. त्याच्या मध्ये खालील बाबतीत सुधार करण्याची गरज आहे.

अ) मुलभूत सोयी सुविधामध्ये वाढ करणे
ब) व्यापार, उद्योग वाढीसाठी 'एक खिडकी योजना' अंमलात आणणे
क) श्रमिका कायद्यामध्ये सुधारणा करणे
ड) विविध राजकोषीय सवलती पारदर्शकपणे राबविणे
इ) जलद गतीने ऋद्धढ बिल अंमलात आणणे
फ) कौशल्य आधारित शिक्षण-प्रशिक्षण सुविधा देणे.

**५) विदर्भातील औद्योगिक विकासासाठी धोरण :**

विदर्भातील औद्योगिक विकास जलद गतीने वाढविण्यासाठी नवीन प्रयोगाची गरज आहे. नवनवीन व्यूहरचना तयार करतांना स्थानिक घटकाचा शक्तीचा उपयोग केल्यास उद्योगाची संख्या वाढेल. विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणावर विविध खनिजे, जंगलसंपदा, कापूस, सिमेंट, बांधकामाचे साहित्य, इत्यादी. बाबी उपलब्ध आहेत. या सर्व घटकाचा अधिक वापर केल्यास रोजगारीच्या संधी वाढून आर्थिक विकास होईल. विदर्भामध्ये खालील उद्योगात, प्रकल्पामध्ये लक्ष घालून विकास साधावा.

१) विदर्भामध्ये टेक्सटाईल उद्योगाची निर्मिती करणे
२) हातमाग मिलचा विकास करणे.
३) मिहान प्रकल्पाला गती देवून तो कार्यान्वित करणे
४) वीज निर्मितीसाठी कोळशा या खनिजाचा अधिक वापर करणे. वीज शक्तीचे मुख्य केंद्र या भागाला बनविणे.
५) कृषीवर आधारित उद्योगाची संख्या वाढविणे.
६) खादी उद्योग, धातू उद्योग या पारंपारिक व्यवसायामध्ये लक्ष घालून त्याचा विकास करणे.
७) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे कार्यक्षेत्र वाढून वाशिम जिल्ह्यात सोयाबीन व कापूस प्रकल्प, गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यात खनिजावर भर देवून, वनसंपदावर भर देवून उद्योग निर्माण करणे.
८) फूड पार्कची निर्मिती करणे.
९) बांधकाम साहित्य निर्माण करून उद्योगाची उभारणी करणे.
१०) इंजिनिअरिंग ॲटोमोबाईल्स उद्योगाची उभारणी करणे
११) जंगलसंपदाचा अधिक वापर करून त्यावर आधारित उद्योगाची निर्मिती करणे.

**६) मराठवाड्यातील औद्योगिक विकासा-करिता धोरण :**

मराठवाड्यातील औद्योगिकीकरणाची सुरूवात औरंगाबाद येथे १९६० पासून झाली. चिखलढाणा येथे १९७० मध्ये औद्योगिक केंद्र सुरू होवून शेवटच्या दशकामध्ये जालना येथे औद्योगिक केंद्र उभारले. सुरूवातीच्या काळात अनेक सोयी सुविधा दिल्याने अनेक बाहेरचे उद्योग याभागात स्थापन झाले. परंतू पुढे या भागातील अनेक उद्योग बंद पडले. १९८० मध्ये पंढरपूर-वाळूज येथे औद्योगिक प्रकल्प महाराष्ट्र शासनाच्या मदतीने स्थापन झाले. ज्यामध्ये बजाज ऑटो आणि व्हिडीओकॉन या कंपन्यांनी आपले प्रकल्प उभे केले. या प्रकल्पामुळे या भागातील उद्योगामध्ये प्रचंड वाढ झाली. उद्योगाच्या उभारणीमध्ये 'जायकवाडी प्रकल्पाचे' मोठे योगदान आहे. १९९० नंतर औरंगाबाद येथून ऑटोमोबाईल आणि इंजिनिअरिंगच्या उद्योगापासून निर्माण होणाऱ्या वस्तूची निर्यात ५२ देशांमध्ये होवू लागली तसेच जगप्रसिद्ध वेरूळ, अजिंठा लेण्यामुळे औरंगाबाद हे पर्यटनाचे मुख्य केंद्र बनले. लघु-मध्यम उद्योगाच्या निर्मितीमुळे औरंगाबाद शहर प्रगतशील बनले. औरंगाबाद शहराची औद्योगिक प्रगती निरंतर चालु असल्यामुळे औरंगाबाद-जालना हे मोठ्या प्रकल्पाचे (उद्योगाचे) राज्यामध्ये केंद्रस्थान बनेल. लातूर-उस्मानाबाद-नांदेड येथे उद्योगाच्या वाढीसाठी मुलभूत सोयी सुविधाचा अभाव असल्याने औद्योगिकीकरण

कमी झाले. बीड-परभणी-हिंगोली या जिल्ह्यात कृषीवर आधारित उद्योगाची संख्या असल्याने रोजगारीच्या संधीत वाढ दिसून येत नाही. मुलभूत सोयी-सुविधावर भर देवून स्थानिक भागातील सोयी, उत्पादने, कृषीवर आधारित उद्योगाची निर्मिती करणे आवश्यक ठरते.

१) सोयाबीन प्रकल्प, कृषीवर आधारित प्रकल्प उभारणे
२) ज्वारीचा विविध उत्पादनासाठी वापर करणे.
३) दूध डेअरी प्रकल्पाची निर्मिती करणे.
४) 'औषधी निर्माण केंद्र' मराठवाड्यात औरंगाबाद येथे निर्माण करणे (देशी-विदेशी ६० कंपन्या औषधी निर्माण करीत आहे.)
५) सोलर उर्जा केंद्राची निर्मितीस मराठवाडा उपयुक्त आहे.
६) मराठवाड्याचा विकासासाठी स्वतंत्रपणे औरंगाबाद येथे क्षेत्रीय विकास प्राधीकरण स्थापन करणे - या प्राधीकरणाद्वारे रस्ते, उड्डाणपुले, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, खेळासाठी मैदाने, व्यापारी केंद्र, पर्यटन केंद्र याचा विकास करावा.
७) औरंगाबाद-जालना येथे औद्योगिक वसाहती निर्माण करून (शेंद्र-२ आणि जालना-३) औद्योगिक विकास साधता येईल.
८) परभणी-हिंगोली-वाशिम या भागाला कृषीवर आधारित उद्योग असल्याने टेक्सटाईल झोन म्हणून घोषित करावे.
९) औद्योगिक विकासासाठी मराठवाड्यामध्ये चौपदरी रस्त्याची निर्मिती करावी.
१०) संतुलित विकासासाठी तंत्रज्ञानावर आधारित उद्योग निर्माण करावे.

**सारांश :**

महाराष्ट्रामधील औद्योगिक विकास मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. लघू-मध्यम आणि मोठे प्रकल्प महाराष्ट्रात निर्माण होत असून त्याद्वारे रोजगार संधीत वाढ होत आहे. प्रतिव्यक्ती उत्पन्न वाढत असून मानवी निर्देशकांमध्ये वाढ होत असली तरी प्रत्येक प्रदेशात ती समान नाही म्हणजेच औद्योगिक विकासांच्या बाबतीत उर्वरित महाराष्ट्र अग्रेसर असून बाकीचे प्रदेश मागे आहेत. महाराष्ट्रातील संतुलित विकास साधण्यासाठी महाराष्ट्र सरकारला मोठी कसरत करावी लागत आहे. सर्व प्रदेशाचा समान विकास साधने आवश्यक आहे. भविष्यामध्ये संतुलित विकासाची उद्दीष्टे ठरवून नियोजन केल्यास ते शक्य होईल.

**संदर्भ :**

1) Govt. of Maharashtra (2013) : Report of the high level committee on balanced regional development.
२) जहागिरदार दि.व्यं. (२०१५) : प्रादेशिक समतोल विकासावरील डॉ.केळकर समितीचा अहवाल, दै. हिंदुस्थान, २३ फेब्रु.

◆◆◆

(ग्रंथ परिचय)

# महामंदी समजून घेतांना

**लेखक : अतुल कहाते**

(प्रकाशन- मनोविकास प्रकाशन, पुणे-३०, किंमत -१२० रुपये, पृष्ठसंख्या -१०८)

**राजश्री रायभोग**
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किरणनगर, अमरावती.

अतुल कहाते हे विविध विषयांवर पुस्तके लिहिणारे मराठीतील गेल्या काही वर्षातील लोकप्रिय लेखक आहेत. 'महामंदी समजून घेताना' ही त्यांची ऑगस्ट २०१५ मध्ये प्रसिद्ध झालेली 'महामंदीच्या उंबरठ्यावर' या पुस्तकाची सुधारित तिसरी आवृत्ती आहे. हे पुस्तक दहा प्रकरणांमध्ये आहे. लेखकाने प्रकरणांना नावे दिली आहेत मात्र क्रमांक दिले नाहीत.

'महामंदीची सुरुवात' या पहिल्या प्रकरणात लेखकाने अमेरिकेतील आर्थिक संकट २००८ पूर्वी दोन वर्षापासून वाढत जाऊन त्याचा शेवट या महामंदीत झाला असे म्हटले आहे. लेखकानी ओघवत्या भाषेत महामंदीच्या सुरुवातीच्या घटना रोचकपणे सांगितल्या आहेत. या महामंदीवर उपाय करताना अमेरिकेने अर्थव्यवस्थेत पैसा ओतण्याचा मार्ग स्वीकारला. क्रूगमन, जोसेफ स्टिगलिझ सारख्या अर्थतज्ज्ञांनी अशीच उपाय योजना सुरू ठेवली पाहिजे असे म्हटले. इ.स.२००८ ते २०१२ या काळात महामंदीमुळे जी गंभीर स्थिती निर्माण झाली होती ती सुधारण्यास यामुळे मदत झाली. दुसऱ्या प्रकरण तात्त्विक स्वरूपाचे आहे. ज्याला आपण अभिमतपंथी अर्थशास्त्र म्हणतो त्यातील काही मान्यता केन्सने नाकारल्यात त्याचे थोडक्यात विवेचन असून केन्सच्या अर्थशास्त्रातल्या महत्त्वाच्या संकल्पना स्पष्ट केल्या आहेत. केन्सची सीमान्त उपभोग प्रवृत्ती (MPC) कल्पना स्पष्ट करताना एका व्यक्तीच्या उत्पन्नात झालेले वाढीचे उदाहरण त्यांनी दिले आहे (पृ.२६). मात्र केन्सच्या सगळया महत्त्वाच्या संकल्पना या समष्टी (Macro) स्वरूपाच्या होत्या, उदा. अर्थव्यवस्थेतील एकूण उपभोग प्रवृत्ती, बचत, प्रवृत्ती, गुंतवणूक इ. केन्सच्या अर्थशास्त्रातील उपाय १९८० पर्यंत मान्य असले तरी त्यानंतरच्या काळात मोनॅटरिस्ट -पैसावादी विचारसरणी प्रभावी झाली व आज पैसावादी विचारसरणीने जगाच्या अर्थकारणाचा ताबा घेतला आहे असे लेखकाला वाटते.

महामंदीमागचे अर्थकारण आणि महामंदीची चिकित्सा ही दोन महत्त्वाची प्रकरणे मानली पाहिजेत. त्यात त्यांनी महामंदीची चिकित्सा करताना केन्स सोबत इर्विन फिशर, मिन्स्की या दोन अर्थतज्ज्ञांनी प्रतिपादन केलेल्या विचारांचे विवेचन केले आहे. विशेषत: फिशरच्या संकल्पना सांगताना त्यांनी कर्जाच्या डोंगराबाबत सांगितलेले मत विशद केले आहे. त्यामुळे फिशरचा लेख आजही लक्षात ठेवायला हरकत नाही असे लेखकाला वाटते. महामंदीची चिकित्सा करताना अमेरिकन अर्थव्यवस्थेतील कर्जाविषयी खूप बोलले जात

असल्याचे प्रतिपादन करून लेखकाने अमेरिकेवरील कर्ज डोंगराचा सविस्तर विचार केलेला आहे. या कर्जाला महामंदीसाठी कारणीभूत ठरवण्यापेक्षा. मंदीतून बाहेर पडण्यासाठी सरकारने योजलेल्या उपायांमुळे अमेरिकेतील कर्ज आणखी वाढेल अशी भीती व्यक्त करून सरकारी उपायांवर टीका करण्यापेक्षा कर्जाची भीती न बाळगता मंदी मोडून काढण्यासाठी सरकारी खर्च वाढविणे हा उपाय योग्य ठरतो असे दिसून आल्याचा निष्कर्ष लेखकाने काढला आहे. या दोन प्रकरणांमध्ये कर्ज व GDP विषयी जी आकडेवारी दिलेली आहे ती देताना लेखकाची चूक झाल्याचे जाणवते. अमेरिकेचे जीडीपी व कर्ज दर्शविणाऱ्या तक्यात (पृष्ठ क्र.५३) जीडीपी अब्ज डॉलर्समध्ये दर्शविले आहे. अब्ज म्हणजे १०० कोटी. परंतु अमेरिकेचे जीडीपी कोष्टकात दर्शविल्याप्रमाणे २०१३ साठी १६.९१ अब्ज नसून १६.९१ ट्रिलीयन आहे. एक ट्रिलीयन म्हणजे एक लाख कोटी.

महामंदीचे परिणाम स्पष्ट करताना त्यांनी हे परिणाम भीषण असून २००९ पर्यत त्यावर केलेले उपाय अपूर्ण होते असे म्हटले आहे. विशेष म्हणजे अमेरिकेच्या डोक्यावर असलेले कर्ज फेडण्याची बहुधा अमेरिकेला गरज लागणार नाही याविषयीचा चांगला युक्तिवाद त्यांनी केलेला आहे. विशेष म्हणजे अल्पकालीन व्याजदर शून्यावर आणून सुद्धा अमेरिकन अर्थव्यवस्था ढासळते आहे. अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हने अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणावर पैसा ओतूनही अमेरिकन अर्थव्यवस्था सुधारू शकली नाही असेच चित्र आहे. २००८ च्या अमेरिकन महामंदीचे विवेचनात युरोपातील संकट व युरोपमधील भीषण परिस्थिती या विषयावरील अन्य पुस्तकामधून वा लेखांमधून विशेषत्वाने आढळून येत नाही. युरोपच्या संकटाची पार्श्वभूमी विषद करताना 'युरो' या नव्या चलनाची माहिती देताना युरो चलन स्वीकारणे हा एकमेव महत्त्वाचा घटक संकटाची पार्श्वभूमी म्हणून लेखकाने स्पष्ट केल्यामुळे हे विवेचन फार मर्यादित झाल्याचे लक्षात येते. युरोपातील भीषण परिस्थिती ग्रीसच्या संदर्भात तसेच जर्मनी विरुद्ध अन्य धोकादायक देश यांच्या दहा वर्ष मुदतीच्या ब्रॉडस्वरचे व्याजदर याबाबत लेखकाने कोष्टकाद्वारे उपयुक्त माहिती देऊन स्पष्टीकरणही केले आहे. तेथे मंदीचा जोर कमी झाला असला तरी ती संपली नाही. २०१३ मधील बेकारीचे आकडे विशेषत: २५ वर्षाखालील तरूण-तरुणींमधील बेकारीचे दर काळजी करायला लावतात. महामंदी व भारताबाबत आता विपुल लिखाण (आकडेवारीसह) उपलब्ध आहे. भारताच्या वस्तू-सेवा शेषातील तूट आणि डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपयाची घसरण याबाबत अधिक विश्लेषण केले असते तर अभ्यासकांना व विद्यार्थ्यांनाही त्याचा उपयोग झाला असता. जागतिक महामंदी अजून संपली नसल्याचा निष्कर्ष लेखकाने अखेरीस व्यक्त केला आहे.

एखाद्या देशात निर्माण झालेल्या मंदीने जागतिक अर्थव्यवस्था तशाच प्रकारे प्रभावित करताना जी स्थिती निर्माण होते तिला महामंदी म्हणता येईल. जागतिक अर्थव्यवस्थेत जर जीडीपीमधील वाढ २ प्रतिशतपेक्षा कमी असेल तर तिला जागतिक मंदी सदृश्य स्थिती मानता येते. गेल्या ७-८ वर्षांपासून अमेरिका व युरोपियन अर्थव्यवस्थेतील मंदीचे स्वरूप सर्वांच्या चर्चेचा विषय बनले आहे. अशा स्थितीत अतुल कहाते

यांनी मराठीत लिहिलेल्या या छोटेखानी पुस्तकाचे स्वागत करायला हवे. लेखकाची भाषा सोपी व अत्यंत ओघवती आहे. लेखक आपल्याला हा तांत्रिक विषय समजावून देत आहे असेच वाटते. त्यांनी विषय सहजतेने मांडताना त्यातील शास्त्रीयता कमी होणार नाही याची काळजी घेतली आहे.

इ.स. २००९ पासून अमेरिकन मंदीच्या बाबत अनेक लेख व १-२ पुस्तके मराठीत प्रसिद्ध झाली आहेत. लेखकाने संदर्भसूचीत अनेक इंग्रजी पुस्तके व इंटरनेटवरील संदर्भ आहेत. त्यांनी काही मराठी लेख/ पुस्तकांचाही विचार करायला हरकत नसावी. विशेषत: मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या बारामती येथे झालेल्या ३३ व्या वार्षिक अधिवेशनातील डॉ. विनायक देशपांडे यांनी केलेल्या याच विषयावरील अध्यक्षीय भाषणाचा उल्लेख करायला हवा होता. असो. एखाद्या विषयावर मराठीत लिहणाऱ्यांनी त्याविषयावरील उपलब्ध लेख/पुस्तके आर्वजून पहावीत.

अतुल कहाते यांचे एक चांगले पुस्तक लिहल्याबद्दल हार्दिक अभिनंदन !

◆◆◆

---

## श्रद्धांजली

दि. १६ जानेवारी २०१६ रोजी अर्थशास्त्र विषयाचे माजी प्राध्यापक **डॉ. शंकरराव खोकले** यांचे अमरावती मुक्कामी दु:खद निधन झाले. ते आर्वी येथील महाविद्यालयात प्राध्यापक होते. डॉ. खाकले मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या अधिवेशनांमध्ये सहभागी होत होते. आजकाल ते सामाजिक संस्थांच्या कार्यात व्यस्त असत.

विदर्भ अर्थशास्त्र परिषद त्यांना श्रद्धांजली वाहत आहे.

## विदर्भ अर्थशास्त्र परिषद

### वार्षिक अधिवेशनांचे अध्यक्ष

| अ.क्र. | अधिवेशनाचे स्थळ | वर्ष | अधिवेशनाचे अध्यक्ष |
|---|---|---|---|
| १ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | १९७०-७१ | डॉ. बी.आर. ढेकणे |
| २ | एन.एम.डी. महाविद्यालय, गोंदिया | १९७१-७२ | प्रा.सु.द. बाळ |
| ३ | भारतीय महाविद्यालय, अमरावती | १९७२-७३ | डॉ. के.आर. नाणेकर |
| ४ | श्री शिवाजी महाविद्यालय, अकोला | १९७३-७४ | प्रा.ग.प्र. पिंपरकर |
| ५ | यशवंत महाविद्यालय, वर्धा | १९७४-७५ | प्राचार्य रा.ना. खर्चे |
| ६ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | १९७५-७६ | डॉ. श्री.आ. देशपांडे |
| ७ | जे.एम. पटेल महाविद्यालय, भंडारा | १९७६-७७ | प्रा.आर.एम. जोशी |
| ८ | सी.पी. ॲन्ड बेरार महाविद्यालय, नागपूर | १९७७-७८ | डॉ.ए.पी. हरदास |
| ९ | एस.पी.एम महाविद्यालय, चिखली,जि. बुलढाणा. | १९७८-७९ | प्रा. ए.एन. लोथे |
| १० | बाबाजी दाते कला वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ | १९७९-८० | प्रा.एस.आर. ओझरकर |
| ११ | धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर | १९८१-८२ | डॉ.एस.एल.लोकरे |
| १२ | आदर्श महाविद्यालय, धामणगांव रेल्वे, जि.अमरावती. | १९८२-८३ | प्रा.एस.ए.पाटील |
| १३ | सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर. | १९८८-८९ | डॉ. व्ही.एस.शेणवाई |
| १४ | महात्मा फुले महाविद्यालय, वरूड, जि.अमरावती. | १९८९-९० | डॉ.एस.व्ही.खांदेवाले |
| १५ | यशवंत महाविद्यालय, सेलू, जि.वर्धा. | १९९०-९१ | डॉ.एस.व्ही.जांवधिया |
| १६ | फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसद, जि.यवतमाळ | १९९१-९२ | प्रा.के.आर.खेरडे |
| १७ | कर्मवीर महाविद्यालय, मूल | १९९२-९३ | डॉ.डी.एस.वखरे |
| १८ | शासकीय ज्ञान विज्ञान संस्था (विदर्भ महाविद्यालय) अमरावती. | १९९३-९४ | डॉ.सौ.सुनंदा सोनारीकर |
| १९ | राष्ट्रसंत तुकडोजी महाविद्ालय, चिमूर. | १९९४-९५ | प्रा.व्ही.एस.कुळकर्णी |
| २० | जगदंबा महाविद्यालय, अचलपूर, जि.अमरावती. | १९९५-९६ | डॉ.सौ.अंजली कुळकर्णी |
| २१ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर. | १९९६-९७ | प्रा.डी.आर.अग्रवाल |
| २२ | जी.एस.कॉलेज, खामगांव, जि.बुलढाणा. | १९९७-९८ | डॉ.आर.वाय.माहोरे |

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर. | १९९८-९९ | डॉ.दि.व्यं.जहागिरदार |
| २४ | राजाभाऊ देशमुख कला महाविद्यालय, नांदगांव (खंडेश्वर), जि.अमरावती. | १९९९-२००० | डॉ.व्ही.एम.वैद्य |
| २५ | सी.पी.ॲन्ड बेरार महाविद्यालय, नागपूर. | २०००-०१ | प्रा.एस.एन.अंभोरे |
| २६ | कै.ना.अ.देशमुख महाविद्यालय, चांदूरबाजार, जि.अमरावती. | २००१-०२ | प्रा.के.ई.पाटील |
| २७ | लोक महाविद्यालय, वर्धा. | २००२-०३ | प्राचार्य एन.एफ.सुदा |
| २८ | जिजामाता महाविद्यालय, बुलढाणा. | २००३-०४ | प्राचार्य डॉ.आर.जी.भोयर |
| २९ | एस.एन.मोर महाविद्यालय, तुमसर, जि.भंडारा. | २००४-०५ | प्रा.एस.एस.देशमुख |
| ३० | श्री.म.द.भारती महाविद्यालय, आर्णी, जि.यवतमाळ. | २००५-०६ | डॉ.सौ.पुष्पा इंदूरकर |
| ३१ | बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, खापरखेडा, जि.नागपूर. | २००६-०७ | डॉ.सौ.मुक्ता जहागिरदार |
| ३२ | श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय, अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती. | २००७-०८ | प्राचार्य डॉ.पुष्पा तायडे |
| ३३ | जनता महाविद्यालय, चंद्रपूर. | २००८-०९ | प्रा.कमलाकर हनवंते |
| ३४ | कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मारेगांव, जि.यवतमाळ | २००९-१० | डॉ.एस.पी.कुळकर्णी |
| ३५ | न्यु आर्टस्, कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज, वर्धा. | २०१०-११ | प्रा.एन.ए.पिस्तुलकर |
| ३६ | आप्पास्वामी महाविद्यालय, शेंदुरजना (अढाव), जि. वाशिम. | २०११-१२ | प्राचार्य डॉ.आर.जी.टाले |
| ३७ | वसंतराव नाईक कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर. | २०१२-१३ | डॉ.आर.आर.गव्हाळे |
| ३८ | इंदिरा गांधी कला विज्ञान महाविद्यालय, राळेगाव, जि.यवतमाळ | २०१३-१४ | प्राचार्य डॉ.संजय धनवटे |
| ३९. | शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय, अर्जुनी/मोर, जि.गोंदिया. | २०१४-१५ | प्राचार्य डॉ. वनिता चोरे |
| ४०. | बी.बी.आर्टस, एन.बी.कॉमर्स आणि बी.पी. सायन्स कॉलेज, दिग्रस, जि.यवतमाळ | २०१५-१६ | डॉ. विनायक देशपांडे |